शब्द रुची

मार्च २०१४ ● मूल्य १० रुपये

कानोकानी, पानोपानी
मनोमनी उरलेला **कलंदर...**






'झोके अमेरिकेतले' या पुस्तकाच्या प्रकाशन समयी डॉ. सुनीलकुमार लवटे, सुदेश हिंगलासपूरकर, लाभसेटवार साहित्य पुरस्काराचे मानकरी राजन खान, कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. सदानंद मोरे, लेखक डॉ. अनंत लाभसेटवार आणि अनिल मेहता




विधानसभा अध्यक्ष दिलीप वळसे पाटील यांच्या हस्ते 'शोध' या पुस्तकाच्या दुसऱ्या आवृत्तीचे प्रकाशन. प्रमुख पाहुणे ना.धों. महानोर, लेखक डॉ. बी.जी. शेखर, अशोक हांडे आणि प्रभाकर भिडे

ग्रंथाली वाचक चळवळीचे मासिक

# शब्द रुची

**मार्च २०१४, वर्ष १**
**अंक दहावा, मूल्य १० रु.**

संपादक : **सुदेश हिंगलासपूरकर**
कार्यकारी संपादक : **अरुण जोशी**
मुखपृष्ठ व आतील मांडणी : **योगिता मोरे**

**कार्यालयीन संपर्क**
**कॉम्प्युटर युनिट – योगिता मोरे**
granthaliruchee@gmail.com
**जाहिरात प्रसिद्धी – धनश्री धारप**
granthaliad@gmail.com
**शब्द रुची/पुस्तक वितरण – महेश गोरेगांवकर**
granthalisales@gmail.com

**केवळ वार्षिक वर्गणी स्वीकारली जाईल.**
**वार्षिक वर्गणी १०० रुपये**
**डिमांड ड्राफ्ट, म.ऑ.'ग्रंथाली' नावे**

पत्रव्यवहार/वर्गणी पाठवण्याचा पत्ता
ग्रंथाली, वुलन मिल म्युनिसिपल स्कूल,
तळमजला, यशवंत नाट्यमंदिराशेजारी,
जे. के. सावंत मार्ग, माटुंगा (प),
मुंबई ४०००१६ ☎ २४३०६६२४/२४२१६०५०
granthali01@gmail.com
granthali02@gmail.com
granthaliruchee@gmail.com
www.granthali.com

**अंकात प्रसिद्ध झालेली मते ज्या त्या व्यक्तीची. 'ग्रंथाली' चळवळीचे 'शब्द रुची' हे व्यासपीठासमान मासिक आहे. त्यात सर्व छटांच्या विचारांना स्थान आहे. मात्र त्याच्याशी 'ग्रंथाली' विश्वस्त संस्था व तिचे विश्वस्त सहमत आहेत असे नव्हे.**

**महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने या नियतकालिकाच्या प्रकाशनार्थ अनुदान दिले असले तरी या नियतकालिकातील लेखकांच्या विचारांशी मंडळ व शासन सहमत असेलच असे नाही.**

राजधानीवर ताबा मिळवण्यासाठी राजकीय रणधुमाळी सुरू आहे. लोकसभेत मिरचीची की मिरीची पूड फेकली जाते, कोणी कोणाला नपुंसक म्हणतो तर कोणी कुणाला मुर्दाड! कुठे तोडफोड होते, कुठे गांधीगिरी चालते. मतपर्वणीचा काळ जवळ आल्यावर धनसिंचन होऊ लागतं. काही तासांत काही कोटींच्या योजना मांडल्या जातात. या साऱ्यावर उन्मत्त, आक्रस्ताळ्या चर्चा योजल्या जातात... ज्यावर वात्रटिका पोसाव्यात असा हा सुगीचा हंगाम सुरू होत असतानाच, ज्याच्या कब्जात राजधानी होती असा एकमेव मराठी पत्रकार काळाच्या पडद्याआड गेला आहे. अशोक जैन हे त्या मुशाफिराचं नाव. आर.के. लक्ष्मण यांच्या 'लक्ष्मणरेषा' ज्याच्या अक्षरांतून उमटल्या तो हा खट्याळ कलंदर. लकबी, हावभावांसह माणसं वाचणारा. त्याच्या उपहास आणि विनोदानं 'ठणठणपाळ' केला. तो कानोकानी पोचला, पानोपानी वसला, कारण त्यातली उच्च बौद्धिक पातळी आणि निरीक्षणशक्ती. त्याच्या स्पष्टवक्तेपणात तुसडेपणा नव्हता. कुणाबद्दल तुच्छभाव नव्हता. त्यामुळेच त्याची टीका व टिपणी कुणाशी व्यक्तिगत संबंधात बाधक झाली नाही. तो जगन्मित्रच होता. एकाच मानवी आर्जवानं सान-थोर साऱ्यांशी त्यानं मैत्र जपलं. म्हणूनच त्याच्या जाण्यानंतर झालेली सभा 'अ'शोकसभाच राहिली. त्याच्या आठवणींनी हास्यच उमललं. ग्रंथाली वाचक चळवळीतील 'ग्रंथाली' नावाचा हा उद्गाता त्याच्या जिंदादिलीनं मनोमनी उरला आहे.

या अंकात, 'ग्रंथाली'चे संस्थापक-सदस्य दिनकर गांगल यांनी अशोक जैन यांची अजरामर जीवनवृत्ती मांडली आहे; तर वसंत वसंत लिमये यांनी 'वॉकिंग विथ द लायन' लिहिलंय.

हा महिना महिलादिनाचा. त्यानिमित्त विशेषांक पुढच्या महिन्यात प्रसिद्ध होत आहे. नीरजा त्याचे संपादन करत आहेत. 'अर्धं आकाशा'चा त्यातला वेध आपल्याला आवडेल अशी आशा आहे.

**– अरुण जोशी**

# अशोक जैन : अजरामर जीवनवृत्ती

## दिनकर गांगल

अशोक जैन १९६६ साली पुण्याहून मुंबईत आला, तो त्याची निवड 'महाराष्ट्र टाइम्स'मध्ये ट्रेनी पत्रकार अशी झाली म्हणून. तो अरुण साधूचे शिफारसपत्र घेऊन मला भेटला. तीच त्याची-माझी पहिली ओळख. मी त्यावेळी ब्रिटिश इन्फर्मेशन सर्व्हिसमध्ये नोकरी करत होतो आणि दादरला एका लॉजमध्ये राहत होतो. माझे आणि त्याचे स्नेहबंध जुळण्यास वेळ लागला नाही. साधू त्यावेळी पुण्याला 'इंडियन एक्स्प्रेस'मध्ये नोकरीस होता व 'माणूस'साठी लिहायचा. तो तशीच काही निमित्ते काढायचा आणि शनिवार-रविवार मुंबईला यायचा. मग आम्ही तिघे धमाल करायचो. खूप भटकायचो-खायचो-प्यायचो-सिनेमे पाहायचो.

वर्षभरातच माझे लग्न झाले. साधूदेखील नोकरीसाठी मुंबईत आला आणि योगायोगाने आम्हा तिघांना कुर्ल्याच्या नेहरूनगरमध्ये जागा मिळाल्या. अशोकने त्याच्या आईवडिलांना व बहिणीला मुंबईत आणले व बिऱ्हाड थाटले. साधूचेही वर्षभरात लग्न झाले आणि आम्ही सख्खे शेजारी बनून गेलो. नेहरूनगर ही वस्ती मोठी होती. तिथे आमचे मोठे मंडळ जमले.

जैन लिहायचा खुमासदार, त्याच्या शैलीला फुलोरा होता, मात्र त्याची शब्दयोजना समर्पक असायची. तो कुठून कुठून शोधून काढल्यासारखे शब्द वापरायचा, पण त्यात सहजता व ओघ असे. त्याचा 'महाराष्ट्र टाइम्स'मधील पहिलाच कॉलम व्यक्तिपर लेखनाचा होता. जीवनाच्या मुख्यत: सांस्कृतिक क्षेत्रातील सर्वसामान्य पण असाधारण गुणविशेष असलेल्या व्यक्तींबद्दल तो लिहीत असे. तो सातशे ते हजार शब्दांत त्या त्या व्यक्तीचे गुणवर्णन अशा कमालीने करत असे की त्या त्या व्यक्तिमत्त्वाची लोभस छाप वाचकांवर पडे. 'महाराष्ट्र टाइम्स'च्या तिसऱ्या पानावर चौकटीत येणारे ते सदर लोकप्रिय झाले होते. त्यावेळी द्वा.भ. कर्णिक संपादक होते. ते सहकाऱ्यांना लिहिण्यासाठी प्रोत्साहन देत. त्यांचा अशोक जैन हा लाडका बनून गेला. त्यातूनच त्यांचे विदेशी चित्रपटांची परीक्षणे असलेले 'चित्रपश्चिमा' हे सदर निर्माण झाले. मराठीत तशा प्रकारचे ते पहिलेच सदर. अशोकला इंग्रजी पुस्तके वाचण्याचा नाद होताच, त्याचा वाचनाचा झपाटाही मोठा होता. त्यात चित्रपटांमधून त्याच्यापुढे आणखी मोठी दुनिया सखोलपणे उघड होऊ लागली. अशोकची दृष्टी व रुची चोखंदळ होत गेली.



**'ग्रंथाली'चे आरंभीच दिवस : ग्रंथप्रदर्शनात दिनकर गांगल यांच्यासमवेत अशोक जैन**

अशोक होता विलक्षण लाघवी आणि जीव लावणारा. तितकाच भावुक आणि भाबडा. अतिशय मदतशील, आणि गमतीखोर तर अफाट. एक सेकंद असा जात नसे, की तो हजरजबाबीपणाने चटपटीत काही बोलला नाही. ते बोलणे पुन्हा मार्मिक असे. त्याच्या त्या गुणांनी त्याच्या जवळ सतत गुंतून राहायला आवडे. तो करमणूक अनेक लोकांची करी, पण तो त्याच्या जगात ठरावीक लोकांच्या पलीकडे जास्त मंडळींना शिरू देत नसे. त्या ठरावीक लोकांत त्याच काळात केव्हातरी घुसले ते

श्रीकांत लागू, अनंत भावे-पुष्पा भावे, दिनेश फडके. झाले असे, की दादरची ती मंडळी शशी मेहतांच्या पुढाकाराने कुठे कुठे ट्रिपला जात, मुंबईत जमून मौजमजा करत, गाणी म्हणत. तो रसिकांचा एक  झकास ग्रूप होता. एकदा योगायोगाने, अशोक त्यांच्याबरोबर कर्नाळ्याच्या ट्रिपला सामील झाला आणि त्यांच्यातलाच एक बनून गेला. त्याने त्या रात्री हास्यविनोदाची मैफल अशी रंगवली की ट्रिपला आलेल्या त्या तीस-चाळीस जणांपैकी प्रत्येकाला अशोक प्रिय आणि घरचा झाला. त्यांमध्ये अरुण दाते, रवी दाते, यशवंत देव, माधव मनोहर, धों.वि. देशपांडे असे मातब्बर लोक होते. त्यामधून मंदार भागवत हा आणखी एक खट्याळ तरुण अशोकच्या चौकडीत सामील झाला. अशोकची हातोटी अशी होती, की तो परिचय करून घेई तो थेट स्वयंपाकघरातच पोचे. अशा तऱ्हेने, मुंबईतील दोन-पाचशे घरांतील बित्तंबातमी अशोककडे असे. त्याने त्याच पद्धतीने पुढे दिल्लीत देखील यशवंतराव चव्हाण, वसंत साठे, विठ्ठलराव गाडगीळ, मधू लिमये वगैरे मंत्र्यांची, राजकीय नेत्यांची स्वयंपाकघरे काबीज केली होती. दादरच्या त्याच्या रसिक मंडळींतूनच त्याला श्रीकांत लागू हा अभिन्नजीव मित्र लाभला.




**माधव गडकरींसमवेत बोलताना अशोक जैन**

अशोकच्या विनोदी शैलीचा विडंबन हा मर्मभेदी प्रकार असे. तो भल्याभल्यांची त्यांच्यासमोर त्या माध्यमातून टेर उडवत असे. त्याने माधव मनोहरांचे असे अनेक 'पक्षी' त्यांच्यासमोर मारले आहेत आणि अनंत भाव्यांच्या कोट्यांना पीजे न म्हणता बीजे म्हणून उडवून लावले आहे. मला आठवते, की अरुण साधूच्या 'सिंहासन' कादंबरीची डमी तयार झाली. त्याला मिलन मुखर्जीचे मुखपृष्ठ आणि वसंत सरवटे यांची हास्यचित्रे असा साज योजला होता. 'सिंहासन' कादंबरी राज्यातील राजकारणाचा ज्या तऱ्हेने वेध घेते व भेद करते त्यास ते सारे अनुरूप होते. आमच्या एका मैफिलीत तो विषय निघाला. अशोक जैनने बसल्या जागी कादंबरीचा ब्लर्ब माधव मनोहरांच्या 'पक्षी' शैलीत लिहून दाखवला. त्याच्या स्केच पेनने तो डमी मुखपृष्ठाच्या मागच्या कोऱ्या पानावर लिहिलादेखील! आमची हसता हसता पुरेवाट झाली, परंतु त्यातील मर्मभेद अचूक होता! तो त्याच्या बुद्धिप्रतिभेचाच आविष्कार! मात्र मैफिलींतील त्याच्या परफॉर्मन्समधील गंमत अशी, की तो विनोद त्याच्या लेखनात तेवढ्या परिणामकारक रीत्या उतरला नाही. ना त्याला तो त्याच्या जाहीर सभा-मुलाखतींमध्ये खुलवता आला. त्याचे 'कानोकानी' हे सदर मात्र अफाट गाजले. त्याची तेथील नेमबाजी सार्वजनिक बिंगे अचूक फोडत असे. तो विनोद निर्विष असे. जयवंत दळवींची ठणठणपाळी त्याने व्यापक पातळीवर नेली, विस्तृत केली व सदासतेज ठेवली.

अशोकला जीवनाबद्दलचे व विशेषत: त्यातील नवीनतेबद्दलचे औत्सुक्य फार. त्यासाठी वाचन, चित्रपटप्रेक्षण, गप्पांच्या मैफिली यांमध्ये तो जसा रमून जाई; तसेच, त्याला भटकायला खूप आवडे आणि तेसुद्धा खास वाहनाने. त्याला चालणे अजिबात पसंत नसे. तो तशी व्यवस्था करूनच दौऱ्यावर बाहेर पडे. त्याने भारताचे सारे भाग या प्रकारे पालथे घातलेच, शिवाय तो जगातही अनेक देशांत फिरला. नाट्यमयता हा त्याच्या जीवनाचाच भाग होता, त्यामुळे तो जिथे जाई तिथे काहीतरी घडेच; मग त्याचे ते प्रसंग रंगवून-रंगवून सांगणे सुरू होई. ते कितीदाही ऐकले तरी आम्ही त्यांत रंगून जात होतो.

अशोक 'महाराष्ट्र टाइम्स'चा प्रतिनिधी म्हणून दिल्लीला गेला आणि त्याचा गुणोत्कर्ष घडून आला. त्याने त्याचे लाघव वापरून राजीव गांधींपासून चरणसिंगांपर्यंतची दिल्ली जिंकली. तो मधू लिमये यांचा इतका लाडका झाला, की त्याने हक्काने काही मागावे आणि लिमये यांनी ते हसत त्यास द्यावे. लिमये यांनी मॉस्को पालथे घालून त्याच्या मुलीसाठी, ती लहान असताना तिला हवी तशी बाहुली आणून दिली आणि त्याने गोविंदराव आदिकांना त्यांच्या घरच्या मंडळींसाठी घड्याळे खरेदी करायची म्हणून त्यांना बरोबर घेऊन दिल्लीचा बाजार धुंडाळला. अशी शेकडो उदाहरणे. त्याच्या दिल्लीच्या घरी जाऊन भोजनप्रबंध हा मुंबई-महाराष्ट्रातील सांस्कृतिक क्षेत्रातील मान्यवर व्यक्तींसाठी एक कार्यक्रम असे. त्यात गंगाधर गाडगीळ, सरोजिनी वैद्यांपासून अनेकांचा समावेश होता. त्यामध्ये सुनीतीमुळे गिरिभ्रमण करणाऱ्या

अनेकांची भर पडे.

तो दिल्लीतून राजकीय बातम्या मार्मिकपणे, सर्व बारकाव्यांनिशी व त्याच्या वेधक शैलीत देत असे. त्याची वार्तापत्रे त्याच्या सूक्ष्म निरीक्षणामुळे गाजत. त्यावेळी तो कधीच कुणाची भीडभाड ठेवत नसे. त्याच्या अशाच लेखनामुळे रजनीश, बाबा आमटे यांचे चाहते खोल दुखावले गेले होते. त्याचा मूल्यतत्त्वे, नीतिसंकेत यांबद्दल फार कटाक्ष असे. त्याने त्या संबंधात फार खोलवर विचार केला होता असे नव्हे, किंबहुना विचारचिंतन हा त्याच्या व्यक्तिमत्त्वाचा गाभा नव्हता. तेथे होती उत्स्फूर्तता, तत्काळ प्रतिसाद. शब्द म्हणून खाली पडू द्यायचा नाही. मुंबई महापालिकेच्या निवडणुकांची मतमोजणी भायखळ्याच्या शाळेत होती. ती रात्री उशिरा, एकच्या बेताला संपली. निकालाची बातमी देऊन मी, साधू, अशोक 'महाराष्ट्र टाइम्स'च्या कचेरीत जाऊन बाकड्यांवर झोपण्यासाठी निघालो. अशोकच्या डोळ्यांत अनावर झोप होती, कारण तो पहाटेच उठत असे. तशा अर्धवट झोपेत देखील तो मध्येच डोळे उघडून आमच्या गप्पांच्या मध्ये मध्ये खोचक शेरे मारत असे. त्या अर्धवट जागृतावस्थेतील अत्यंत तल्लख अशा त्याच्या निरीक्षणांनी अचंबित व्हायला होत असे. हे लिहीत असताना अशोकच्या गप्पाष्टकांचे अनेक प्रसंग आठवत आहेत व 'ते सारे कोठून येत असे?' असेच परत परत मनात येत आहे. त्याच्या शारीर लकबी, डोळ्यांच्या चंचल हालचाली, मैलभर दूर असणाऱ्या माणसाशी टेलिफोनवरून बोलतानाही त्याचे इकडून होणारे हातवारे... सारे त्याच्यातील खळबळीचे द्योतक असे. ती खळबळ त्याच्या गप्पांत व लेखनात उतरे तेव्हा तिला आवेगी खळखळाट असे. तो त्याच्या नियमांच्या बाबतीत दुखावला गेला तर दयामाया करत नसे. त्यामुळेही त्याचे दिल्लीतील लेखन फार गाजले. त्याच्यासारखा मराठी पत्रकार दिल्लीत झाला नाही, पुढे होण्याची शक्यता नाही. पत्रकाराने कॉण्टॅक्ट कसे वाढवावे आणि त्यांचा खुबीने वापर कसा करावा याचा वस्तुपाठच त्याने दिल्लीतील त्याच्या कामगिरीने घालून दिला.

त्याने 'ग्रंथाली' दिल्लीत नेली. त्याने आरंभीच्या काळात पाचपन्नास खासदारांना 'ग्रंथाली'चे सभासद करून घेतले. तो स्वत: त्यांना पुस्तके नेऊन देई, वाचलीत का म्हणून विचारी. त्याने 'ग्रंथाली'चे दोन-तीन कार्यक्रम दिल्लीत घडवून आणले. तो 'ग्रंथाली'च्या संस्थापक मंडळींपैकी होता. त्यानेच ते शीर्षक सुचवले. पहिली काही पुस्तके रचण्यामध्ये त्याचा महत्त्वाचा वाटा होता. पण स्वभावत: त्याचा कल समूहात काम करण्याचा नव्हता. त्याचे काही हट्टाग्रह असत. पुढे, आम्ही जयंत धर्माधिकारी, श्रीपाद हळबे अशा काही मित्रांनी सृजन फिचर्स प्रा. लिमिटेड निर्माण करून छोट्या फिल्मस् बनवल्या, दूरदर्शनसाठी कार्यक्रम तयार केले, त्या ग्रूपमध्येदेखील तो अधिकृतपणे सामील होऊ शकला नाही. पण कार्यक्रम सुचवताना त्याच्या कल्पनेची भरारी एवढी मोठी असे, की आम्ही थक्क होऊन जात असू. तो प्रामाणिक, पारदर्शक, निर्मळ होता. सारे लोक तसे असतातच, पण मूल जेव्हा अंगावर कपडे घालते तेव्हा ते या जगाशी जुळवून घेते व त्या प्रकारे जुळवून घेतच जग पुढे जात असते. त्यालाच तडजोड म्हणतात. तिथे निर्मलतेला तडा जातो. तत्त्वाग्रही मंडळींना ती तडजोड नको असते. एक प्रकारे, तो आग्रह परिपूर्णतेचा असतो. अशोकला सारे असे 'परफेक्ट' लागायचे. तो परफेक्शनिस्टच होता आणि त्याच्यामधील गुण अशा प्रकर्षाचे होते, की एक नोकरी वगळता त्याला कोठे जुळवून घेण्याची गरज नव्हती. व्यक्तिगत पातळीवर गोविंद तळवलकरांसकट साऱ्या जगाला त्याच्याशी जुळवून घ्यावे लागे.

त्याला चौदा वर्षांपूर्वी पॅरॅलिसिसचा पहिला झटका आला, अपंगात्वाच्या काळातील त्याच्या मेंदूची सजगता व संपर्कशक्ती ही गोष्टच अजब ठरली. त्याने चौदा वर्षांच्या प्रकृतीचा वनवास घरात बसून काढला. त्यांपैकी शेवटची पाच वर्षे तर बिछान्यात पडून, समोरच्या खिडकीतून जेवढे आभाळ दिसेल तेवढेच अशा अवस्थेत, पण त्याला जगातील माहिती अद्यावत असे. त्यामध्ये मुंबईतील मेट्रो-मोनोवरील स्थानकांपासून न्यू यॉर्क येथील ब्रॉडवेवरील नव्या नाटकांपर्यंत सर्व गोष्टींचा समावेश असे. त्याने त्याच्या तरुणपणापासून स्वयंपाकघरात चहासुद्धा क्वचित केला, एवढ्या लाडात आई-बहिणीने त्याला वाढवले, परंतु त्याला सर्व पदार्थांच्या रेसिपी माहीत असत. पार्टी कल्चर, एटिकेट्स या बाबतीत साहेबाला लाजवेल असा चोखंदळपणा त्याच्यात होता. तो धड होता तेव्हा दूरदूरच्या हॉटेलांत जाऊन खाण्यात तो तरबेज, पण आजारी झाल्यानंतरही त्या संबंधीच्या त्याच्या माहितीत खळ पडला नाही. अशोक जैन हे अद्भुत रसायन होते. तो मारवाडी कुटुंबात जन्मला, त्या रीतीभातींत वाढला, त्याचे बालपण अत्यंत गरिबीत गेले, पण तो पुस्तके, चित्रपट यांच्या सोबतीने अतिशय संपन्न असे बौद्धिक व भौतिक आयुष्य जगला. जगण्याच्या त्या मैफिलीत त्याने सभोवतालच्या सर्वांचे आयुष्य श्रीमंत करून टाकले.

त्यानंतर अपंगावस्थेत त्याने अनेक उद्योग केले. त्याला पुरस्कार मिळाले. मुलुंडच्या महाराष्ट्र सेवा संघाने त्याचा सत्कार योजला, मुलाखत घेतली. ती त्याच्या परखड मता-निरीक्षणांनी गाजली. तो मित्रांच्या मदतीने बाहेरगावी देखील गेला. गेली पाच वर्षे बिछान्यावर त्याला उचलून बसते करावे लागे. त्यामध्ये अनेक वेळा त्याच्या वेगवेगळ्या व्याधी उपटत. त्याची पत्नी सुनीती व मुली बिल्वा आणि क्षिप्रा यांनी या काळात त्याची फार काळजी घेतली. त्यांचे मोठेपण असे, की त्यांनी त्या प्रतिकूल काळातही अशोकची लेखनशक्ती जागी ठेवली. सुनीती त्याचे डिक्टेशन संगणकावर उतरवून घेई. असे करत त्या दोघांनी त्या काळात वीस पुस्तके निर्माण केली. प्रदीप चंपानेरकर व दिलीप माजगावकर या प्रकाशकांनी त्यांना साथही तशीच तत्पर दिली. अशोक-सुनीतीच्या

स्वभावाप्रमाणे ते दोघे त्यांचे कुटुंबीय होऊन गेले. सुनीतीने स्वत:चे लेखनही त्या व्यग्रतेत जपले. तिने डॉ. रवी बापट, डॉ. तळवलकर यांच्या सहकार्याने वैद्यकीय ग्रंथ निर्माण केले. महापालिकेसाठी मोठा ग्रंथराज मराठीत आणला. ती मराठी साहित्यातील मोलाची कामगिरी ठरली.

जैन समाजाला अलिकडेच अल्पसंख्याकांचा दर्जा दिला गेला. मी एका भेटीत अशोकला त्यावरून डिवचले. तो म्हणाला, त्यांना कसल्या सवलतींची गरज नाही. घनदाट श्रीमंत आहेत ते लोक. अशोकचा ना देवाधर्मावर विश्वास होता, ना कर्मठ रूढींवर. तो मोकळाढाकळा भौतिक जीवनवादी होता. मला जैन जीवनशैलीत व परंपरेत तशा उत्तम राहणीची व तरीही संयमी उदाहरणे दिसत तेव्हा मी ती त्याला सांगत असे. त्याचा त्यांवर फार विश्वास नसे. वास्तवात मात्र त्याने व त्याची बहीण कमल हिने त्यांच्या आईवडिलांकडून मारवाडी जैन रीतिरिवाजाचे काही उत्तम गुण घेतले, घ्यायचे कमी द्यायचे जास्त... ते इतक्या चोखपणे घडे की बऱ्याच वेळा तो हिशोबीपणा जाणवे. पण आमचे कुटुंब तो भार प्रेमाने सतत पेलत आलेले आहे. अशोकने अनंत लोकांना तऱ्हतऱ्हेची अपार मदत केली आहे. तशा उदाहरणांनी लेखाची पानेच्या पाने भरतील. पुन्हा त्याने मदत केली आहे हे जराही भासू न देता ते घडे. तो त्याच्या घरातून मिळालेल्या सवयीचा भाग होता. सतत कार्यमग्न असणे, सतत दुसऱ्याच्या उपयोगी पडणे हे त्याच्या रक्तातच होते.

तो त्याच्या मृत्यूपूर्वीच्या काही महिन्यांत परराष्ट्र सचिव नटवरसिंग यांच्या 'लिव्हिंग विथ द लायन' या पुस्तकाचा अनुवाद करत होता. ते लेखन पूर्णही झाले. त्याचा श्वसनाचा त्रास त्याच काळात बळावत गेला आणि त्याला दोन-तीन वेळा रुग्णालयात जावे लागले होते, पण असल्या व्याधी त्याला त्याच्या लेखनाच्या हौशीपासून रोखू शकल्या नाहीत. त्याचा या जीवनावर, जगण्यावर व त्यामधील मौजमजा-हौस यावर पक्का विश्वास होता. एवढ्या परावलंबी आजारपणाच्या काळात त्याच्या तोंडून एकदाही 'सोडव रे बाबा'सारखा असहाय उद्‌गार आला नाही. याला कारण त्याची आनंदी प्रवृत्ती अन् दुसऱ्याला आनंद देण्याची वृत्ती. त्यामुळेच त्याचा जगण्याचा, जीवनानंद घेण्याचा आनंद चालूच राहिला. त्याला शेवटच्या वेळी रुग्णालयात न्यावे लागले, त्याच्या आदल्या दिवशी वृत्तपत्रांत बातमी आली, की कांदा फक्त पाच रुपये किलो! लगेच त्याचा फोन आला, कांदा स्वस्त झालाय! जयंतला (धर्माधिकारी) घेऊन ये. भजी खाऊया. त्याला दिवसाला बावीस गोळ्या घ्याव्या लागत, पथ्य अनेक तऱ्हेचे होते, पण ते सर्व सांभाळून सुनीती व त्यांचा सांभाळ करण्यास असलेली आरती नावाची सुगरण त्याचे खाण्याचे सर्व लाड पुरवत.

त्याच्या दीर्घकाळ चाललेल्या लढाईत मृत्यूने त्याला पराभूत केले असले तरी त्याची वृत्ती अजरामर आहे, कारण ती प्रत्येक सजीवाची अस्तित्वभावना आहे. अशोकने ती भावना सौंदर्याच्या, कलेच्या, साहित्याच्या उच्च पातळीवर नेली, म्हणून अलिकडच्या काळातील दोन्ही मोठे भूतपूर्व संपादक - अरुण टिकेकर यांनी व्यक्तिगत संभाषणात व कुमार केतकर यांनी जाहीर भाषणात त्याची विनोदबुद्धी पुलंच्या तोडीची आहे असे म्हटले. अशोकसारख्या अपवादभूतांची वृत्ती मृत्यूला नुसते तोंड देत नाही तर त्यावर मात करून जीवन निरामय, प्रफुल्लित करू पाहते.

**दिनकर गांगल**
ए/३ अजिंक्यतारा सोसायटी,
स्वस्तिक पार्क, सीएसटी रोड,
चेंबूर, मुंबई ४०० ०७१
दूरध्वनी : २५२२१६४८
dinkargangal39@gmail.com

## मासिकाच्या मालकीबद्दल निवेदन

**(रजिस्ट्रार ऑफ न्यूजपेपर्स फॉर्म ४ (नियम ८ अन्वये)**

| | | |
|---|---|---|
| प्रसिद्धीचे ठिकाण | : | ग्रंथाली द्वारा वुलन मिल म्युनिसिपल स्कूल, खोली नं. ९, तळमजला, यशवंत नाट्यमंदिराशेजारी, जे. के. सावंत मार्ग, माटुंगा (प), मुंबई ४०००१६ |
| प्रकाशन काळ | : | मासिक |
| मुद्रकाचे नाव | : | इंडिया प्रिंटिंग वर्क्स |
| राष्ट्रीयत्व | : | भारतीय |
| पत्ता | : | ४२, जी.डी. आंबेकर मार्ग, वडाळा, मुंबई ४०००३१ |
| संपादकाचे नाव | : | सुदेश राजाराम हिंगलासपूरकर |
| राष्ट्रीयत्व | : | भारतीय |
| पत्ता | : | ग्रंथाली द्वारा वुलन मिल म्युनिसिपल स्कूल, खोली नं. ९, तळमजला, यशवंत नाट्यमंदिराशेजारी, जे. के. सावंत मार्ग, माटुंगा (प), मुंबई ४०००१६ |
| मालकाचे / प्रकाशकाचे नाव | : | सुदेश राजाराम हिंगलासपूरकर |
| राष्ट्रीयत्व | : | भारतीय |
| पत्ता | : | ग्रंथाली द्वारा वुलन मिल म्युनिसिपल स्कूल, खोली नं. ९, तळमजला, यशवंत नाट्यमंदिराशेजारी, जे. के. सावंत मार्ग, माटुंगा (प), मुंबई ४०००१६ |

मी, सुदेश राजाराम हिंगलासपूरकर असे जाहीर करतो की, वरील तपशील माझ्या माहितीप्रमाणे व समजुतीप्रमाणे खरा आहे.

दि. १/३/२०१४

## महिनाभरात दुसरी आवृत्ती...

# हुमान – संगीता उत्तम धायगुडे




**मूळ किंमत ३५० रु.**
**सवलतीत २१० रु.**

संगीता धायगुडे यांचा एकूणच जीवनप्रवास एक 'हुमान' – कोडे आहे. नियतीने घातलेले. 'आंधळी' गावच्या एका डोळस मुलीचे हे आत्मकथन! केवळ शिक्षणाच्या बळावर, आपल्या परिपक्व प्रतिभेच्या सामर्थ्यावर त्या जीवनात आलेले असह्य धक्के पचवू शकल्या. हा त्यांचा मानसिक प्रवास केवळ थक्क करणारा आहे. 'हुमान'ला मानवीपणाचा स्पर्श आहे. जे जसे घडले, ते घडताना मनावर जे संस्कार उमटले... जे ओरखडे उमटले.. ते तसेच सांगण्याचा प्रयत्न संगीता धायगुडे यांनी केलेला आहे. 'हुमान' एखाद्या लोलकाप्रमाणे आपल्यासमोर फिरत राहते. सुंदरता ही केवळ कल्पना असू शकेल.. पण आयुष्य हे केवळ एक अनाकलनीय कोडेच नाही, तर कल्पितापेक्षा सुंदर आहे.. याचे प्रत्यंतर 'हुमान'ने घडवलेले आहे. एकाच वेळी ते मनाला चटका लावणारे... मनाची पकड घेणारे... कोडे घालणारे... आणि कोड्याची उकल करणारे असे झाले आहे.

**– डॉ. सिसिलिया कार्व्हालो**

# बोलावें ते आम्ही...

## श्रीकांत देशमुख




**मूळ किंमत १८० रु.**
**सवलतीत ११० रु.**

'बळिवंत' आणि 'आषाढमाती' या कवितासंग्रहाप्रमाणे याही संग्रहातील कवितेच्या केंद्रस्थानी शेतीनिष्ठ जीवन आहे. जागतिकीकरणोत्तर काळात बदललेल्या मानवी पर्यावरणाच्या कॅनव्हासवरचा शेतीनिष्ठ जीवनाचा आशय या कवितेत सर्वंकषपणानं आला आहे. 'बळिवंत' ते 'बोलावे ते आम्ही' या प्रवासातून देशमुखांच्या आत्यंतिक संवेदनशीलतेचा, वाढत्या व्यापक आशयाचा एक प्रदिर्घ पट उभा राहतो. गावगाड्याचे स्थायित्व मान्य करून गावगाड्याचा बदलता अवकाश अतिशय व्यामिश्र रूपात कवेत घेणारी ही नव्वदोत्तर कालखंडातील एक महत्त्वाची कविता आहे. कृषीजनव्यवस्थेला वेढून टाकणारी, आक्रमित आणि संस्कारीत करणारी बाह्यव्यवस्था ही देखील या कवितेच्या चिंतनाचा विषय आहे.

ही कविता शेतीनिष्ठ असली तरी खेड्याविषयीच्या आदिभावाचे प्रकटीकरण एवढाच या कवितेचा माफक हेतू नाही. लोकसंचितातले पूर्वसंस्कार पचवून, समकाळाला कवेत घेऊन आपल्या स्वत्वाची मांडणी करणारी ही कविता आपल्या संवेदनेच्या समग्र अवकाशाला हलवून टाकणारी आहे. त्यामुळेच प्रसंगी सुटीसुटी वाटणारी ही कविता प्रदिर्घ अशा आख्यानाचे रूप घेते. आपल्या सांस्कृतिक, सामाजिक पर्यावरणाला आशय आणि अभिव्यक्तिच्या नवेपणासह अंतर्बाह्य भिडून होणारे या कवितेचे प्रकटीकरण मराठी कवितेच्या परंपरेला बळ देणारे आहे. बहुस्तरीय सांस्कृतिक परिवर्तनांना कधी प्रतिसाद देत तर कधी प्रतिकार करीत भूमीत पाय घट्ट रोऊन उभ्या असणाऱ्या भूमिनिष्ठांची गाथा म्हणजे श्रीकांत देशमुखांची ही कविता होय.

# वॉकिंग विथ द लायन...

## वसंत वसंत लिमये

माझ्या पहिल्या नोकरीनिमित्त मी १९८० साली दल्ली मुक्कामी पोचलो. नवा मुलुख, नवं शहर, तसं म्हटलं तर कुणीच फारसं ओळखीचं नव्हतं. गिर्यारोहणामुळे अंगी टगेपणा होता म्हणून भीती नव्हती, पण एकटेपणाची भावना नक्कीच होती. पहिलाच आधार मिळाला तो आदरणीय पत्रकार बापूमामा लेले यांचा, मग एक लिमये दांपत्य ओळखीचं झालं. त्यानंतर दिल्लीतल्या भटकंतीत महाराष्ट्र इन्फर्मेशन सेंटरमध्ये सुनीती जैनशी ओळख झाली आणि सुनीती मैत्रीण झाली. अर्थातच सुनीतीमुळे एका कलंदर, सिंहासारख्या दिलदार माणसाशी ओळख झाली आणि त्याचं नाव 'अशोक जैन'!




मधुसूदन तथा नानासाहेब वैराळे, अनंतराव भावे, विठ्ठलराव गाडगीळ आणि अशोक जैन

१८ फेब्रुवारी, संध्याकाळी अचानक डॉ. रवी रूपवतेचा फोन आला,

''बाळ्या , अशोक गेला!''

या डॉक्टर मंडळींना बहुधा निर्विकारतेचं ट्रेनिंग देत असावेत. माझा विश्वास बसत नव्हता. गेल्या काही महिन्यांपासून या अनपेक्षित बातमीची हुरहूर नक्कीच होती. यातल्या अनपेक्षितपणाला, हा अटळतेला टाळण्याचा मनाचा हटवादीपणा होता. तसं पाहिलं तर अशोक २००० सालच्या स्ट्रोकनंतर गेली १४ वर्षं आजाराशी झगडत होता. यात त्याला भक्कम साथ होती आमच्या मैत्रिणीची. गेल्या १४ वर्षांत प्रत्यक्ष भेटी कमी झाल्या, पण फोनवर बोलणं होत असे, सुनीतीशी तर नक्कीच. २००० सालानंतर अशोकची तब्येत ढासळतच गेली. सुनीतीला आमचे गिर्यारोहक डॉक्टर मित्र रवी रूपवते आणि मिलिंद चितळे हे आश्वासक आधारस्तंभ वाटत असत. शरीराशी, आजाराशी झगडताना अशोकनं कधीच हार पत्करली नाही, औषधं घेण्याचा कंटाळा केला नाही. २००८ नंतर तर तो अंथरुणाला खिळलेलाच होता. स्वच्छंदपणे पायाला भिंगरी असलेल्या पत्रकाराला ही अघोरी शिक्षाच होती. क्वचित पथ्यपाण्याला शिव्या घालण्यापलिकडे अशोक कधीच ढेपाळला नाही. तसं पाहिलं तर दोघांनीही गेली १४ वर्षं मोठ्या जिगरीनं हा लढा दिला. अशोकचं लेखन तरीही सुरूच होतं. 'आता जगण्याचा कंटाळा आला' असा सूरही कधी उमटला नाही. त्याच कुशीवर, त्याच खिडकीतून दिसणाऱ्या तोकड्या आकाशाच्या तुकड्याकडे पाहत, नैराश्याचं सावट असतानाही, अशक्य यातनांशी झगडताना या सिंहाच्या मनाचा आंतरिक पीळ अभेद्य होता, अफाट होता, थक्क करणारा होता.

''आज रात्रीच अंत्यसंस्कार आहेत...''

फोनवर पलिकडून निर्विकार शब्द उमटले. माझ्या मनात गेल्या ३४ वर्षांतील असंख्य आठवणींचा पट उलगडत होता. मी फोन कानाशी धरून कितीतरी वेळ तसाच बसलो होतो. सुन्न झालो होतो.

मी दिल्लीत एक वर्षापुरताच होतो, पण सुनीती आणि अशोकची मैत्री मात्र घट्ट झाली. मी ऐन पंचविशीत तर अशोक तेव्हा ३७ वर्षांचा, ऐन बहरात असलेला दिल्लीतील 'महाराष्ट्र टाइम्स'चा मातब्बर पत्रकार. खादीचा बुशकोट, गळ्यात शबनम, जाड भिंगाचा चष्मा, हातात सिगारेट असं अस्सल पत्रकारी रूप.



**विठ्ठलरावांनी पुस्तक प्रदर्शनाला भेट दिली. सोबत अशोक जैन**

ते देखील न सांगता, हे नित्याचच होतं. सुनीतीनं कधीच कुरकूर केली नाही. क्षिप्रा, बिल्वाशी खेळणं आणि एकीकडे बाहेरच्या खोलीत गप्पांचा फड रंगणं हे स्वाभाविक असे. अशोककडे विषयांना तोटा कधीच नव्हता. एके दिवशी अशोक काही जुनी कागदपत्रं आवरत होता. अस्ताव्यस्त पुस्तकं, कागद, टिपणं आणि वर्तमानपत्रं यांचा बाहेरच्याला अनाकलनीय वाटणारा पत्रकारी पसारा अशोकचाही असे. एका पोतडीतून अचानक त्यानं खूप कृष्णधवल छायाचित्रांचा गठ्ठा बाहेर काढला. जुन्या हॉलिवूड आणि हिंदी चित्रपटांतील असं चेहऱ्याचा तो खजिनाच होता. सुरुवातीच्या काळात मुंबईत असताना, अशोक चित्रपट परीक्षणं करत असे. फोटो चाळताचाळता

प्रेमळ, खरखरीत आवाज, मनमुराद गडगडाटी हसणं. सुरुवातीला अशोकशी बोलताना आदरानं एक दबलेपण असे, पण अशोककडे समोरच्याला लवकरच निर्धास्तपणे आपलंसं करण्याची एक अफलातून हातोटी होती. माझ्या डोंगरी उचापतीत त्याला मनापासून रस होता. त्याचं उच्च राजकीय लीलया वावरणं मला विस्मयकारक वाटत असे. राजकीय उलाढाली आणि त्यामागची गणितं यांची त्याला उपजत अप्रतिम समज होती. त्याची राजकीय मतं तो कधीच फारशा अभिनिवेशानं मांडत नसे.पण त्याची एखादीच प्रतिक्रिया मोठी मर्मज्ञपणे बोलकी असे. समोरच्या माणसाला न घाबरवता, मग तो कितीही मोठा असला तरी त्याला न घाबरता, अशोक मोठ्या खेळीमेळीने त्याच्याशी गप्पा मारू शके. लागट न बोलता, हळूच कोपरखळ्या मारण्याची त्याची खुबी अप्रतिम होती. तो एखाद्या मोठ्या स्पंजासारखा सारं काही बिनचूकपणे शोषून घेत असे. त्याच्या पत्रकारितेमागची ही एक मोठी ताकद होती. गरज पडल्यास समोरच्या माणसाला तो अलगदपणे हरभऱ्याच्या झाडावर चढवत असे. त्याच्यात एक मस्त मिश्कीलपणा दडलेला होता. समोरचा माणूस फार काळ त्याच्याशी सावधपणे बोलूच शकत नसे. अनेकविध विषयांवरील त्याची जाण समृद्ध आणि सखोल होती. दिल्लीसारख्या राजधानीत अशोकच्या ओळखी अफाट होत्या. पक्षीय बंधनांपलीकडे सहजपणे वावरणारा दिल्लीतील तो एक जगमित्र होता. दिल्लीतील कारकीर्दीत ५/६ पंतप्रधानही त्याला 'अरे अशोक' असंच संबोधत. अशोक कधीच 'मिस्टर जैन' झाला नाही. आजकाल ज्याला पी.आर. म्हणतात तो अशोकचा निरपेक्ष, निखळ जनसंपर्क अफाट होता.

अशोकशी गप्पा ही पर्वणीच असे. माझ्या दिल्लीच्या वास्तव्यात संध्याकाळी अशोकच्या करोल बागेतल्या घरी पोचणं,

चित्रपटविश्वातील सुरस आणि रम्य कहाण्यांनी ती रात्र रंगून गेली. ८० नंतर मी ठाण्याला परतलो, पण गिर्यारोहणामुळे आणि ट्रेकिंगमुळे दिल्ली भेटी वर्षात अनेक वेळा नक्की होत असत. पहाडगंजला बृहन्महाराष्ट्र भवनात सामान टाकणं झालं, तरी बहुतेक वेळा मुक्काम करोलबागेत अशोककडे असे. मैत्रीपलीकडे अशोककडे एक चुंबकीय आकर्षण होतं. उच्च राजकीय घडामोडी आणि त्याव्यतिरिक्त अशोकमुळे भेटणारी अनेकविध माणसं याचं मला नेहमीच कुतुहल वाटत असे. अशोकची एक खासियत होती. अशोकमुळे कुठल्याही ग्रुपमधे मला, इतर मोठे आपण लहान अशी भावना कधीच जाणवली नाही. अशोकच्या मनात आणि मुख्य म्हणजे वागण्यात एक समभाव असे. त्यामुळेच अशा मैफिलीतही कधी अवघडलेपण येत नसे. पुढल्या काही वर्षांत माझा शिरकाव ग्रंथाली परिवारात झाला. दिनकर गांगल, अरुण साधू, कुमार केतकर, श्रीकांत लागू, भावे अण्णा अशा मंडळींशी ओळखी झाल्या, संपर्क वाढला. ८६ च्या सुमारास कांचनगंगा मोहिमेचे वारे वाहू लागले होते. पूर्वी हायकिंग करणारी सुनीती, आम्हा तरुण मंडळींचा उत्साह पाहून त्या प्रयत्नात अलगद ओढली गेली. सुरुवातीस अशोकला हे खटकलं होतं, पण त्याबद्दल त्यानं कधीच अढी धरली नाही. त्याच्या दिलदारपणाला ते शक्यच नव्हतं.

८७ सालचा अनुभव अविस्मरणीय होता. आम्ही ९० जणांचा ट्रेक घेऊन केदारनाथच्या दक्षिणेला, भिलंगना नदीच्या खोऱ्यात गेलो होतो. सुनीती, क्षिप्रा आणि बिल्वाही आमच्यासोबत होत्या. ट्रेकच्या मध्यावर एक अप्रिय घटना घडली. आमच्यासोबतचा डॉक्टर हिलरी आणि भार्गव तालीटॉप खालच्या जंगलात बेपत्ता झाले. प्रसंग बाका होता. मी मोहिमेचा नेता होतो. आम्ही तातडीनं हालचाल करणं गरजेचं होतं. टिहरीपर्यंतची दमछाक करणारी

मजल एका रात्रीत मारून मी दिल्लीला अशोकला खबर दिली. त्यानंतर घडलेला वृत्तांत आम्हाला नंतर समजला. अशोकनं थेट संरक्षण मंत्रालयात धाव घेतली. कांचनगंगा मोहिमेमुळे शरदराव आमच्या खास परिचयाचे होते. अशोक कुठल्याशा ऑफिसमधे पोचला, तेव्हा आर्मी आणि एअरफोर्सचे बडे अधिकारी मोठ्ठे नकाशे पसरून काहीतरी महत्त्वाच्या मसलतीत गुंतले होते. नारदाप्रमाणे अशोक सर्वसंचारी होता. त्या बैठकीत अचानक सिव्हिलियन पत्रकार आलेला पाहून अधिकाऱ्यांची तारांबळ उडाली. दोन अधिकारी वगळता इतरांनी नकाशे वगैरे आवरून दुसरीकडे तळ हलवला. अशोककडून आमच्यावर आलेल्या संकटाची नीट चौकशी करून, तातडीनं सरकारी यंत्रणा खडबडून कामाला लागली. त्याच दिवशी संध्याकाळी आणि दुसऱ्या दिवशी सकाळी, दोन हेलिकॉप्टर जोशीमठहून आकाशात झेपावली. भिलंगनेच्या खोऱ्यात या हेलिकॉप्टरनी कसून शोध घेतला. आमच्या दुर्दैवानं हिलरी आणि भार्गव कधीच सापडले नाहीत. तो साराच प्रसंग माझ्यासाठी धक्कादायक आणि हादरवून टाकणारा होता. तसं पाहिलं तर एक नागरी ग्रुप, कुठेतरी हिमालयात दुर्गम ठिकाणी संकटात सापडतो आणि जेमतेम ३६ तासांत लष्करी हेलिकॉप्टर शोधासाठी झेपावतात, ही घटनाच आपल्याकडे स्वप्नवत वाटण्यासारखी. ही सारी किमया केवळ एका माणसामुळे घडून आली होती आणि तो होता 'अशोक जैन'! नंतर कळलेला तपशील- त्यादिवशी 'ऑपरेशन लिबरेशन'च्या पूर्वतयारीची बैठक चालू होती!

कुठलाही बडेजाव न दाखवता इतरांच्या मदतीला धावून जाणं हा अशोकचा स्थायीभाव होता. दिल्लीत येणाऱ्या मराठी माणसांसाठी, सुमारे एक तपाहून अधिक काळ, अशोक जैन म्हणजे एक मदतीचा दिलासा होता. समोरच्या माणसाकडून आपल्याला काय फायदा होईल याचा सुतरामही विचार न करता, सर्वतोपरी त्याला कशी मदत करता येईल असा अशोकचा प्रयत्न असे. आणि एकदा मदत करायची ठरवल्यानंतर, अशोकनं ब्रह्मदेवालाही 'जरा पुष्पक विमान देता का हो?' म्हणून विचारलं असतं. नकार मिळाला तरी न खचून जाता सर्वतोपरी अथक प्रयत्न करणं हा त्याचा स्वभाव होता. अनेकांची अडलेली कामं, मराठी कलाकारांना मदत- साहित्यिकांचं त्याला विशेष प्रेम - आणि हे सारं करूनही त्याचा गाजावाजा नाही. कुठल्याही स्वार्थी लाभासाठी खटपट, लटपट नाही, अशासाठी माणूस संत असावा लागतो, असं त्याला म्हटलं तर त्यावर तो फक्त खळखळून हसला होता.

अशोकमधे एक लहान मूल दडलेलं होतं आणि ते पटकन कधीही डोकं वर काढी. ९० साली 'रानफूल' च्या मुळशी येथे झालेल्या पहिल्या लहान मुलांच्या शिबिराला, अशोक, दाजीकाका, भावेअण्णा यांना घेऊन एखाद्या लहान मुलाच्या उत्साहानं आला होता. त्याचा उत्साह संसर्गजन्य असायचा. ८७/८८ साली तात्या शिरवाडकरांना मिळालेल्या ज्ञानपीठ पुरस्कारानिमित्त झालेल्या विविध कार्यक्रमात दिल्लीत उत्साहाने संचार करणारा अशोक मला आठवतो. २००६ साली तब्बेत नादुरूस्त असतानाही पावसाळयात अशोक मित्रमंडळींसमवेत गरूडमाचीला आला होता. हिंडायला त्रास होत असतांनाही आषाढ सरीत चिंब झालेला अशोक मला आठवतो. त्यांच्यासारख्या मोठ्या पत्रकारानं जपलेली ही निरागसता मोहक होती.


अशोकनं पत्रकार, संपादक, लेखक अशा विविध भूमिका समर्थपणे पार पाडल्या. त्याचं वाचन जबरदस्त होतं. दिल्लीतील राजकीय, सांस्कृतिक वातावरण रूक्षपणे न मांडता, ते रसरशीतपणे सामान्य वाचकापुढे त्यानं उभं केलं. किचकट विश्लेषणापेक्षा, समर्थपणे विविध संदर्भ मांडण्याची त्याची शैली विशेष लोकप्रिय झाली. 'इंदिरा' सकट त्यानं केलेले रसाळ अनुवाद वाचकांच्या मनाला भिडले. पत्रकार असूनही त्याच्याकडे कधीही वखवखलेपण नव्हतं. त्याच्या ओळखी, पत्रकार म्हणून असलेली ताकद ह्यांचा त्यानं स्वतःसाठी कधीच गैरवापर केला नाही. लहान-थोर सर्वच व्यक्तींमधील माणसाला तो थेट भिडत असे. अनिष्टावर सडेतोड टीका केली तरी त्याचे त्या व्यक्तींशी संबंध नेहमीच मित्रत्वाचे राहिले. त्याच्या ओळखीचा अनेकांना उदंड फायदा झाला, पण अशोक मात्र अळवाच्या पानाप्रमाणे अस्पर्श राहिला. हे सारं करायला मनाचं एक उपजत मोठेपण लागतं ते अशोककडे उदंड होतं. अशोक म्हणजे  चैतन्याचा अथक निर्झर होता. त्याच्या स्वभावात एक राजस डौल होता, कुठेही हीण नव्हतं. मर्यादांचं भान ठेवून त्याची कल्पनाशक्ती अचाट भरार मरत असे. त्याचा मोठा खरखरीत आवाज, खळखळून हसणं याची समोरच्याला कधीच भीती वाटली नाही. 'यहाँका बॉस कौन है?' असं विचारत तसा किरकोळ, निरुपद्रवी वाटणारा हा माणूस सिंहासारखा कुठल्याही गुहेत शिरायला तयार असे. एकदा ठरवल्यावर त्या गोष्टीमागे झपाटून लागण्याचा त्याचा हातखंडा थक्क करणारा असे. शेवटच्या काळात हा सिंह थकला तरी त्यानं कधी गवताला तोंड लावलं नाही. लवकरच त्यानं अनुवाद केलेलं नटवरसिंह यांचं 'Walking with the Lions' हे पुस्तक प्रकाशित होणार आहे.

भविष्यातही या डौलदार, दिलदार सिंहाची कृतज्ञ आठवण ताजी राहणार आहे.या कलंदर माणसाचा सहवास माझ्यातलं हीण दूर सारणारा निर्झर म्हणून नेहमीच खळाळता राहणार आहे.

**वसंत वसंत लिमये**
ईप्सित, सर्व्हे नं. ११०/१/ए,
बळवंतपुरम, पौड रोड,
कोथरूड, पुणे ४११३०८
दूरध्वनी : (०२०) २५३९४५४०/२५३९९४८६
vasantlimaye@gmail.com

# न्या.बी.एन.

**भारत गजेंद्रगडकर**




**मूळ किंमत १०० रु.**
**सवलतीत ६० रु.**

## प्रसिद्ध झाले...

काही व्यक्ती आपल्या कामामुळे, सामाजिक बांधिलकीमुळे प्रिय असतात. मात्र प्रसिद्धीपराङ्मुखता या त्यांच्या दुर्मिळ वृत्तीमुळे समाजापुढे येत नाहीत. अशीच एक मनस्वी व्यक्ती म्हणजे न्यायमूर्ती बी.एन. देशमुख. त्यांच्या जीवनकार्याचा मागोवा घेताना मलाच त्यांच्या पाठी लागावे लागले. घरात असलेले राजकीय-सामाजिक वातावरण, त्यांचे वकिलीचे शिक्षण, त्यांनी न्यायमूर्ती म्हणून दिलेले निवाडे, सामाजिक कार्यातला सक्रिय सहभाग, अन्यायग्रस्तांमागे वकील म्हणून खंबीरपणे उभे राहण्याची आस, शेतकरी-विद्यार्थी यांच्या समस्यांना सोडवण्यासाठी दिलेले पाठबळ, अशा घटनांतून त्यांचे व्यक्तिचित्र साकारण्याचा प्रयत्न पुस्तकात केला आहे. व्यक्तिगत आयुष्यापेक्षा समाजभानाबद्दल त्यांना असलेले महत्त्व यात अधोरेखित होते. तेच त्यांचे मोठेपण आपल्याला विनम्र करते.

# हाँगकाँग सफारी

**पद्मा कऱ्हाडे**




**मूळ किंमत १२० रु.**
**सवलतीत ७० रु.**

## ताजे प्रकाशन

गेल्या पंचवीस वर्षांपासून, मध्यमवर्गीय व उच्च मध्यमवर्गीय घरातील एक मुलगी अथवा मुलगा परदेशी आहे, असे चित्र दिसते. त्यामुळे ज्येष्ठ नागरिकांचे परदेशदौरेही वाढलेले आहेत.

माझ्याबाबतीतही तसेच झाले. माझा धाकटा मुलगा हाँगकाँगमधील एका युनिव्हर्सिटीत असिस्टंट प्रोफेसर म्हणून काम करत आहे. त्यामुळे गेल्या चार वर्षांत हाँगकाँगला खूप वेळा जाणे झाले.

वानप्रस्थाश्रमातील विरंगुळा म्हणून अचानकपणे सापडलेला व जोपासलेला 'लिखाणाचा छंद' यावेळीही कामाला आला.

एखाद्या पर्यटन कंपनीसोबत जाऊन हाँगकाँगमध्ये जी पर्यटनस्थळे पाहिली जातात, त्यापेक्षा कितीतरी जास्त पर्यटनस्थळे पाहण्याचा, अनुभवण्याचा योग या हाँगकाँगच्या अनेक भेटींमध्ये आला.

त्याच सर्वांविषयीचे हे लिखाण 'हाँगकाँग सफारी' या पुस्तकाच्या रूपाने वाचकांच्या हाती देत आहे.

– पद्मा कऱ्हाडे

# लोकप्रतिनिधी : कायद्याच्या वर राहणारी जात

डॉ. अनंत पां. लाभसेटवार

आपल्या देशात चार हजारांहून अधिक जाती व पोटजाती आहेत. त्यातले सवर्णीय व काही निवडक जाती सोडल्या तर सर्वांना कुठल्या ना कुठल्या प्रकारचं आरक्षण मिळतं. परंतु राजकारण्यांच्या जातीला सर्वात जास्त सुविधा व मलिदा मिळतो हे सर्वसामान्य जनतेला ठाऊकही नसेल. निवडणुकीत हरलेली एक महिला सरकारी पैशांवर अमेरिकेत उपचारांसाठी आली. एक नामवंत खासदार माझ्या परिचयाचे आहेत. लक्ष्मी त्यांच्या घरी पाणी भरते. त्यांना हृदयविकाराचा रोग झाला. त्या उपचारांसाठी लागणारा कोट्यवधी रुपयांचा खर्च सरकारी तिजोरीतून भरण्यात आला. आपल्या लोकसभेचे अनेक सदस्य रोगग्रस्त आहेत. ते श्रीमंत असूनही त्यांना पंचतारांकित रुग्णालयात किंवा परदेशात औषधोपचारासाठी जाण्याची खास सुविधा या प्रतिनिधींनी स्वत:साठी राखून ठेवली. त्यांना उपचारासाठी खिशातून एक पैसाही भरावा लागत नाही.

अमेरिका आपल्यापेक्षा कितीतरी समृद्ध देश, पण या देशात संसदेच्या सदस्यांना अशा सुविधा मिळत नाहीत. जो आरोग्यविमा सर्वसाधारण जनतेला उपलब्ध आहे तोच त्यांनाही मिळतो. महत्त्वाचं म्हणजे, कुठलाच विमा शंभर टक्के खर्च भरत नाही. सरासरी वीस टक्के डॉक्टरांचा व रुग्णालयाचा भुर्दंड व अनेक औषधांचा खर्च त्यांना स्वत:च्या खिशातून भरावा लागतो. मग आपला देश गरीब असूनही आपल्या प्रतिनिधींना फुलासारखं का वागवतो? कारण ते नावापुरते जनतेचे प्रतिनिधी असतात. स्वत:साठी खास सुविधा मंजूर करून घेऊन ते कायद्याच्या वर राहतात. त्यांनी केलेले कायदे जनतेनं पाळावे अशी अपेक्षा असते. ते मात्र त्यापासून मुक्त असतात. याची उदाहरणं आपल्याला वारंवार वाचायला मिळतात.

ऑगस्ट २०१३ मध्ये लोकसभेचे एक नाशिकचे सदस्य (अनिल कदम) आपल्या लवाजम्यासह मुंबई–आग्रा द्रुतमार्गावर प्रवास करत होते. अर्थातच त्यांना पथकर (Toll) भरावा लागत नाही. परंतु त्यावेळी ते दिवाधारी सरकारी खटाऱ्यात मार्गक्रमण न करता स्वत:च्या गाडीनं आगेकूच करत होते. म्हणून तिथल्या सेविकेनं त्यांना पथकर मागितला व आपलं कर्तव्य बजावलं. ही मागणी म्हणजे आपला अपमान असं समजून त्या सदस्यांच्या अनुमतीनं त्यांच्या अनुयायांनी गाळ्याची (stall) नासधूस करून महिलांवर अत्याचार करण्याचा प्रयत्न केला. अशी उन्मत्त वागणूक लोकांच्या प्रतिनिधीला शोभते का? अशा वेळी त्या सेवकांच्या नोकऱ्यांवर गदा पडते. त्याचे पडसाद विधानसभेत उमटून ते उर्मट व उद्धट सदस्य निर्दोष व कर्मचारी सदोष असल्याचं विधेयक लगेच संमत करण्यात येतं. अशा स्थितीत ब्रिटिशांच्या काळात न्याय तरी मिळे. त्यापासून आता आपण वंचित झालो आहोत.

काही काही सदस्य एवढे उर्मट व उद्धट की लोकसभेत किंवा विधानसभेत त्यांचा तोल जातो. मग ते हाती येईल त्या वस्तू वक्त्याकडे भिरकावून आपला राग व्यक्त करतात. बिहारमधल्या विधानसभेत शरीरानं व्यस्त पण मनानं स्वस्त असलेल्या एका महिला सदस्येनं तिथली कुंडी भिरकावून आपली नापसंती दर्शवली. तेव्हापासून विधानसभेचं नि:शस्त्रीकरण करण्यात आलं. कुठलीच हलणारी गोष्ट तिथे आता ठेवण्यात येत नाही. आपण ब्रिटिशांच्या राज्यव्यवस्थेचं अनुकरण करून तशीच संसद दिल्लीत उभारली, पण त्यांची शिस्त व भारदस्तपणा आयात करण्याचं विसरलो.

दिल्लीत लोकसभेच्या कारभारातील गदारोळ बघितला म्हणजे आपल्या बेशिस्तीची किळस येते. ऑगस्ट २०, २०१३ या दिवशी अन्नसुरक्षा विधेयक चर्चेसाठी आलं. परंतु संसदेचं काम फक्त ३० मिनिटंच चाललं. विरोधी पक्षानं भ्रष्टाचाराच्या विषयावर जाब विचारून आकांडतांडव सुरू केलं आणि सर्व कारभार बंद पाडला. ही अपवादात्मक गोष्ट नाही. यापूर्वी या सभेत पाचव्यांदा असंच झालं. संसदेचं काम तहकूब करणं हे विरोधी बाजू, मग ती कुठल्याही पक्षाची असो शस्त्र म्हणून वापरते. हा धिंगाणा लोकसभेच्या आचारसंहितेचा एक अभिन्न भाग झाला आहे. ही कार्यनीती त्यांना अशोभनीय आहे. मजेची गोष्ट म्हणजे असं अत्यल्प काम करूनही त्यांना पूर्ण पगार व लाभ मिळतात. जनतेचं काम केलं नाही म्हणून आपण पगार घेऊ नये असे उदात्त विचार त्यांच्या मनात कधी येत नाही.

परवा इलिनॉय (Illinois) प्रांताच्या विधानसभेत शासकीय

कर्मचाऱ्यांच्या निवृत्तीवेतनावर चर्चा झाली. याचा खर्च एवढा वाढला की या प्रांताचं आर्थिक कंबरडं मोडलं. यात कपात करणं किंवा वाढीला कात्री लावणं संघटित कर्मचाऱ्यांना बिलकूल पसंत नाही. म्हणून विधानसभेत अमर्याद चर्चा होऊनही विधेयक संमत झालं नाही. ही निष्क्रियता बघून गव्हर्नरनं (आपले मुख्यमंत्री) सदस्यांचे पगार बंद केले. असं आपल्या देशात केलं तर किती पैसे वाचतील याची कल्पना देखील करवत नाही.

आमदार-खासदारांचा खर्च काही कमी नाही. या राजकारण्यांनी स्वत:साठी ज्या सुविधा मिळवल्या त्याचा गरीब जनतेला नुसता वास लागला तरी देशात क्रांती घडेल. गलेलठ्ठ पगाराशिवाय त्यांना राहायला घर फुकट, विजेचे पैसे ते कधी भरत नाहीत व प्रवासाला त्यांना वरिष्ठ वर्गानं (बिझनेस किंवा फर्स्ट क्लास) देशात कुठेही भटकता येतं. किंबहुना त्यासाठी त्यांचा खास कोटा असतो. या बाबतीत नुकतंच उघडकीस आलेलं प्रकरण महत्त्वाचं आहे. संसदेच्या कामानिमित्त वरिष्ठ वर्गानं प्रवास करण्याची सुविधा एक वेळ मान्य करता येईल. परंतु याशिवाय प्रत्येक सदस्याला दरवर्षी ३४ तिकिटं अतिरिक्त आणि तीही बिझिनेस क्लासची मोफत मिळावी ती कशासाठी? ही तिकिटं त्या सदस्याचे नातेवाईक किंवा अन्य कुणीही वापरू शकतं. यामुळे कुठली जनसेवा घडते हे मला अजून कळलेलं नाही. अर्थातच त्यांचा दुरुपयोग करण्यात येतो. ट्रॅव्हल एजंटकडून महागडी तिकिटं घेऊन ती सवलतीच्या दरात विकण्याचा धंदाच सुरू झाला. सरकार अर्थातच त्यांना मूळ किंमत देते. या जाळ्यात नुसते आमदार-खासदारच नव्हे तर नोकरशहाही अडकले आहेत असं मी टाइम्स ऑफ इंडियाच्या ऑगस्ट २०१३ च्या महाजालीन आवृत्तीत वाचलं. ब्रिटिशांनी आपलं शोषण केलं म्हणून आपण नेहमी ओरडतो, पण आपलेच प्रतिनिधी तसं करू लागले तर न्याय कुठे मागायचा?

अमेरिकन लोकशाहीत लोकांचे प्रतिनिधी जनतेपासून अलिप्त राहू नयेत म्हणून काळजी घेण्यात आली. या देशातल्या आमदार-खासदारांना राहण्यास फुकट घर मिळत नाही. तसंच त्यांना वीज वगैरे स्वत:च भरावी लागते. महत्त्वाचं म्हणजे हे प्रतिनिधी संसदेच्या कामासाठी जनता (economy) वर्गानं प्रवास करतात. मग अतिरिक्त ३४ तिकिटं मिळण्याची गोष्ट दूरच राहिली.

एकदा मी बँकेच्या बोर्डाच्या मासिक सभेसाठी वॉशिंग्टनला जात होतो. माझ्यासमोरच्या ओळीत सिनेटर कीप बाँडला (Kip Bond) बघून चकीत झालो. अमेरिकेत अधिसभेचे (Senate) सदस्य अतिशय प्रतिष्ठित व्यक्ती समजण्यात येते. भारतीय खासदारापेक्षा कितीतरी मान्यवर. पण आपल्या उपटसुंभ्यांना पहिला वर्ग मिळतो तर या समृद्ध देशात मात्र त्यांना इकॉनॉमी वर्गात बसावं लागतं. याचं कारण एकच, की आपले खासदार कायद्याच्या वर राहतात तर अमेरिकेतले प्रतिनिधी जनतेसमान राहून त्यांचं खऱ्या अर्थानं प्रतिनिधित्व करतात. जे खासदारांचं तेच मंत्र्यांचं. अमेरिकेत त्यांना सचिव (Secretary) म्हणतात. ते देखील जनतावर्गानं प्रवास करतात. एकदा मजूरमंत्री एलिझाबेथ डोल (Elizabeth Dole) आमच्याबरोबर प्रवास करताना बघितलं. उच्चपदस्थ सरकारी अधिकारी साध्या माणसाप्रमाणे विमानप्रवास करतात यालाच खरं प्रतिनिधित्व म्हणतात.

पगार व लाभ यांच्या बाबतीतही आपले सदस्य आम आदमीच्या तुलनेनं कितीतरी पटींनी वर आहेत. त्यांचा २०१०पासून पगार जरी महिन्याला ५०,००० रुपये झाला, तरी त्यांना मिळणारे लाभ व सुविधा यांचं मूल्य त्यापेक्षा जास्त आहे. फुकट घर, वीज, पाणी, प्रवास व आरोग्यसेवा या सर्वांची गोळाबेरीज केली तर एक खासदार पोसायला जनतेला ५७ लाख रुपयांचा भुर्दंड बसतो. म्हणजे सर्वसाधारण माणसाच्या कमाईपेक्षा ६८ पट जास्त. तर तेच गुणोत्तर अमेरिकेत ३५ आहे. म्हणजे आपले लोकसभाप्रतिनिधी अमेरिकेच्या सदस्यांपेक्षा महाग आहेत. समान क्रयशक्तीच्या चलनात (Purchasing Power Parity, PPP) तर ते जपान, सिंगापूरसारख्या महागड्या देशांपेक्षा जास्त बोजा समाजावर पाडतात.

या अवाढव्य संपत्तीमुळे ते संतुष्ट नाहीत. त्यांचा हावरटपणा अमर्याद आहे. ऑगस्ट २८, २०१३च्या टाइम्सनुसार महाराष्ट्राच्या आमदारांना म्हाडामध्ये घर विकत घेण्याची संधी मिळाली. प्रस्तुत चाळ मग वेश्यागिरीसाठी प्रसिद्ध झाली. ही कुप्रसिद्धी त्यांच्या नीतिमूल्यांविषयी बरीच बोलकी आहे. महत्त्वाचं म्हणजे सरकारकडून अधिकृतरीत्या एवढी कमाई होण्याची तरतूद करूनही त्यांना जास्तीचे डल्ले मारण्याचा मोह आवरत नाही. या सदस्यांनी गृहकर्जावरचं व्याज भरणं बंद केलं आणि ते माफ करण्यात यावं म्हणून मुख्यमंत्र्यांना प्रस्ताव पाठवला. अर्थातच तो त्यांनी धुडकावून लावला, पण त्यांची मजल एवढी पुढे गेलेली बघून सामान्य माणसानं तरी कर्जफेड का करावी? त्यांची कमाई तर ६८ पटींनी कमी आहे. जनतेची सेवा कशी करता येईल याची चर्चा करण्याऐवजी जास्तीत जास्त लोणी आपल्या पोळीवर कसं ओढता येईल इकडेच त्यांचं लक्ष जास्त. त्याविषयी कायदे करणं त्यांच्याच हातात असल्यामुळे ते अनिर्बंधपणे आपल्या लाभात वाढ करू शकतात.

या अधिकृत कमाईपेक्षा टेबलाखाली मिळणारा पैसा कितीतरी पटींनी जास्त. प्रत्येक लोकसभा प्रतिनिधीला २०११ पासून स्थानिक विकास करण्यासाठी ६ कोटी रुपये देण्यात येतात. काही वर्षांपूर्वी ही योजना जेव्हा सुरू झाली तेव्हा फक्त एक कोटी रुपये देण्यात येत. त्यात समाजापेक्षा वैयक्तिक हित जास्त असल्यामुळे रक्कम वाढवण्यात आली. या योजनेत सरकारी लेखापालाला अनियमितपणा सापडला तरी सदस्यांच्या औदार्याला लगाम लागला नाही.

या मलिद्यामुळे प्रतिनिधी म्हणून उभं राहण्यासाठी राजकीय पक्षाकडून जे तिकीट लागतं त्याची किंमत वाढली. त्यासाठी कोट्यवधी रुपये मोजावे लागतात हे उघड गुपित आहे. खरं म्हणजे भारतातील भ्रष्टाचाराची गंगोत्री हीच. तिकिटाची किंमत वसूल करण्यासाठी या सदस्यांना जागोजागी अवैध पैसे उकळावे लागतात. त्यापुढे अमेरिकन पद्धती कितीतरी श्रेष्ठ. त्या देशात तिकीट वाटप करण्याचा प्रकारच नाही. आपल्या देशाप्रमाणे अमेरिकेतही प्रत्येक पक्षाचे अनेक उमेदवार या पदासाठी उत्सुक असतात. म्हणून त्यातला श्रेष्ठ कोण हे प्रत्येक पक्षाच्या प्राथमिक निवडणुकीत (Primaries) ठरतं. हे सर्व मतदारांच्या हाती असून पारदर्शकता असल्यामुळे अवैध पैसे भरण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. त्यामुळे उमेदवाराची बांधिलकी पक्षश्रेष्ठींशी नसून निवडून देणाऱ्या मतदारांशी असते. हाच लोकशाहीचा खरा अर्थ नव्हे का?

या वस्तुस्थितीमुळे दोन देशांतील सदस्यांची नैतिक पातळी भिन्न आहे. आपले नुसते भ्रष्टाचारग्रस्तच नव्हे तर अनेक फौजदारी खटल्यात सदोष सापडलेले. सप्टेंबर ३, २०१३च्या 'लोकसत्ता'नुसार संसदेतील एकूण ५४३ सदस्यांमधल्या ३३ टक्के सभासदांवर फौजदारी खटले होऊन त्यात ते दोषी सापडले होते. त्यामुळे ते कारावासात कोंडले गेले पाहिजेत. परंतु पुनर्सुनावणीसाठी ते जामिनावर बाहेर राहतात. ही प्रक्रिया गोगलगाईच्या गतीनं पुढे सरकत असल्यामुळे त्यांच्यावर जेलमधली हवा खाण्याची पाळी कधीच येत नाही. शिवाय अशा लोकांजवळ अवैध पैसा खूप असल्यामुळे त्यांना न्याय विकत घेता येतो. भारतातलं सर्वोच्च न्यायालय सोडलं तर सर्व न्यायव्यवस्था इतर सामाजिक संस्थांप्रमाणे किडलेल्या आहेत हे त्यांना चांगलं ठाऊक. त्यामुळे फौजदारी खटला म्हटला की आपल्या तोंडचं पाणी पळून जातं तर हे लोक ती गोष्ट भूषणावह समजतात.

१६२ मधल्या दोषी सदस्यांमधल्या ७६ सभासदांविरुद्ध सिद्ध झालेले गुन्हे गंभीर स्वरूपाचे होते. म्हणजे त्यांनी खून, बलात्कार करून जनसेवा करण्याचा विडा उचलला होता. या बाबतीत आमदार फार मागे नव्हते. देशभरातील एकूण १२५८ आमदारांत ३१ टक्के फौजदारी खटल्यात दोषी सापडले होते. त्यातले २३ टक्के गुन्हे गंभीर स्वरूपाचे होते. तरी एकालाही राजीनामा देण्याचं सुचलं नाही. जनसेवेचं कांकण बांधण्याच्या उदात्त हेतूनं ते पछाडले गेले होते!

या भ्रष्ट परिस्थितीची अमेरिकेशी तुलना केली तर काय आढळतं? अगदी वेगळं चित्र दृष्टोत्पत्तीस पडतं. गेल्या आठवड्यातलं ताजं उदाहरण घ्या. अँथोनी विनर (Anthony Weiner) हा न्यू यॉर्कमधून निवडून आलेला खासदार. उदारमतवादी. लोकसभेत बेंबीच्या देठापासून विरोधी पक्षावर आग पाखडण्यात पटाईत. डेमोक्रॅटिक पक्षातला एक उदयोन्मुख तरुण राजकारणी म्हणून त्याचं भवितव्य उज्ज्वल होतं, पण त्याला एक खोड होती. आपल्या कमावलेल्या शरीराचे नग्न चित्र आयफोनद्वारे स्त्रियांना पाठवण्याचा त्याला छंद असल्याचं उघडकीस आलं. झालं. ते बघून त्याला निवडून देणारे मतदार आत्मघात केला म्हणून खवळले. शेवटी त्याला राजीनामा देणं भाग पडलं. त्याच्याविरुद्ध कुठल्याही प्रकारचा खटला भरण्यास आला नव्हता हे विशेष. त्याचं कृत्य बेकायदेशीर नसून असभ्य होतं एवढंच. एवढ्या तुटपुंज्या पुराव्यावरून त्याला राजकारणातून कायमचं बाहेर पडावं लागलं. आमच्या लोकसभेत तर अनेक सदस्य आयफोनवर अश्लील चित्रफिती बघताना आढळून आले. ते सुद्धा लोकसभेचा कारभार सुरू असताना. त्यांना निवडून देणाऱ्या मतदारांनी त्याची दखल देखील घेतली नाही आणि प्रसारमाध्यमांनी जांभया दिल्या.

विनर आपलं राजकीय जीवन पुनरुज्जीवित करण्यासाठी न्यू यॉर्कच्या महापौराच्या पदासाठी उभा राहिला. त्याला वाटलं, आपल्या मतदारांना त्या असभ्य वर्तणुकीचं विस्मरण पडलं असेल, पण तो प्राथमिक निवडणुकीतच पडला आणि त्याला त्या मामुली घटनेमुळे राजकीय आत्महत्येची शिक्षा मिळाली. भारतीय निकषांनुसार हा दखलपात्र गुन्हा नव्हता.

आता डॅन रॉस्टेनकॉव्हस्की नावाच्या एका मुरलेल्या आणि बलशाली राजकारण्यांचं बघा. त्यांनी अनेक वर्षे अमेरिकन लोकसभेत चांगलं काम करून त्यातलं एक अत्युच्च पद व सत्ता कमावली. ते बरीच वर्षं वेज आणि मीन्स कमिटीचे (Ways and Means Committee) अध्यक्ष होते. या समितीचं काम निरनिराळ्या योजनांसाठी पैसे वाटण्याचं. त्यामुळे त्यांच्या हातात खूप सत्ता व मान होता. परंतु सत्ता माणसाला मदांध करते हे अमेरिकेतही आढळतं. ऑफिस चालवण्यासाठी जो भत्ता मिळतो त्यात गैरवापर सापडला आणि त्यांनी नाममात्र नोकर कामावर ठेवून त्यांचे पगार खिशात घातले. या कुप्रसिद्धीमुळे ते निवडणुकीत पडले. मग चौकशी झाली आणि त्यांना अल्पकालीन का होईना कारावासाची शिक्षा झाली. त्यांचा कुठलाच गुन्हा फौजदारी स्वरूपाचा नव्हता. असं असूनही त्यांना सजा भोगावी लागली आणि आयुष्यभर काम करून कमावलेल्या प्रतिष्ठेवर पाणी सोडावं लागलं. आपल्या लोकसभेत मात्र खून केल्याचं शाबीत होऊनही त्यांचं पद अबाधित राहतं. खरी लोकशाही कोणाची हे वेगळं सांगण्याची जरुरी नाही.

अमेरिकन राज्यव्यवस्थेत स्वयंकृतीनं शुद्ध होण्याची जी मतदाराधिष्ठित यंत्रणा आहे ती आपल्या देशात सापडत नाही. त्यासाठी मतदारांचा अंकुश महत्त्वाचा असतो. नेमका तोच आमच्या लोकशाहीत अनुपस्थित आहे.

हे लोकशाहीला कलंकित करणारं भयानक चित्र बघून आपल्या सर्वोच्च न्यायालयानं फौजदारी खटल्यात दोषी

सापडलेल्यांना निवडणूक लढण्याचा अधिकार नाही असा न्याय जाहीर केला आणि सर्व राजकारण ढवळून निघालं. सगळ्या प्रतिनिधींचं धाबं तर दणाणलंच पण त्यामुळे लोकसभा व सर्व विधानसभा रिकाम्या होण्याची शक्यता निर्माण झाली. या संकटामुळे सर्व पक्षांचे खासदार जवळ आले. सध्या देश दिवाळखोरीच्या उंबरठ्यावर आहे. रुपायानं कोलांटी खाल्ल्यामुळे देशावर आर्थिक अरिष्ट ओढवलं आहे. चालू खात्यातील त्रुटी वाढत आहे. पण या संकटातून देशाची सुटका करण्यासाठी सर्व पक्ष एकत्र आले नाहीत. स्वत:चं अस्तित्व जेव्हा धोक्यात आलं तेव्हा आपसातील राजकीय फूट विसरून त्यांनी एकदम सर्वपक्षीय सभा बोलावली व सर्वोच्च न्यायालयाला बगल कशी देता येईल याची चर्चा सुरू झाली. म्हणजे वादाऐवजी संवाद प्रस्थापित झाला. वेळ पडल्यास ते स्वत:चं संरक्षण करण्यासाठी राष्ट्रघटनेत दुरुस्ती करण्यास तयार झाले. परंतु ते आरशात बघायला तयार नाहीत. केंद्रीय लोकसेवा आयोग फौजदारी खटल्यात दोषी सापडलेल्या उमेदवाराची निवड सरकारी नोकरीसाठी करत नाही, पण या कायदेकर्त्यांना मात्र ते चालतं. सर्वोच्च न्यायालयाला किंवा माणसाच्या सदसद्‌विवेकबुद्धीला डावलण्याऐवजी आपण खरोखरीच आपली नैतिक पातळी उंचावली पाहिजे हे त्यांच्या डोक्यात कधी येत नाही. या स्वार्थाला काय म्हणावं?

शेवटी लोकशाहीत जनतेला तिच्या लायकीचं सरकार मिळतं म्हणून लोकसभेत कलंकित सभासद सापडत असतील तर त्यांना निवडून देण्याची जबाबदारी मतदारांचीच नव्हे का? म्हणून राज्यव्यवस्था सुधारायची असेल तर सुसंस्कृत, दक्ष, डोळस व चिकित्सक मतदार निर्माण करणं आवश्यक आहे. तेव्हा कुठे खरी लोकशाही निर्माण होईल. तोपर्यंत हे लोकप्रतिनिधी कायद्याच्या वर राहतील.

**डॉ. अनंत पां. लाभसेटवार**
2 Second Street, Unit # 2001,
Jersey City, N.J. 07302
lalalabh@aol.com

**प्रसिद्ध झाले...**

**झोके अमेरिकेतले – डॉ. अनंत लाभसेटवार**




**मूळ किंमत २५० रु.**
**सवलतीत १५० रु.**

भारतापेक्षा मी अमेरिकेत जास्त पावसाळे काढले. तिथल्या लोकांना जवळून बघण्याची संधी मिळाली. माणूस जेव्हा कर्ज काढण्यासाठी बँकेकडे अर्ज करतो तेव्हा त्याला जीवनातल्या सर्व उलढाली उघड्या कराव्या लागतात. थोडक्यात म्हणजे तो बँकेपुढे 'नग्न' होतो. अमेरिकेन माणसाचं खरं रूप त्यावेळी कळतं. बँकेचा चेअरमन म्हणून ते मला जवळून बघायला मिळालं.

या अनुभवांमुळे मला अमेरिकन लोकांच्या सुखाचीच नव्हे तर दु:खाचीही चांगली पारख झाली. या देशातही अश्रू आहेत हे कळलं. मोठं अंगण असलेलं प्रशस्त व टुमदार घर, लठ्ठ पगाराची नोकरी, त्याहीपेक्षा भारी गाडी व घरात अनेक टीव्ही सेट असले तरी मालक आणि मालकीण अपसेट का असतात या गुढाकडे लक्ष वेधलं गेलं. या प्रत्ययकारिकेतून हा लेखसंग्रह लिहिण्यात आला.

# हिंदूविरुद्ध हिंदू

## डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी

'द हिंदूजः ॲन ऑल्टरनेटिव्ह हिस्टरी' नावाचे 'पेंग्विन' या आतंरराष्ट्रीय ख्यातीच्या प्रकाशन संस्थेने पाच वर्षापूर्वी प्रकाशित केलेले व जगभर उत्तम विकले गेलेले; ७८० पानांचे अभ्यासपूर्ण पुस्तक या संस्थेने न्यायालयीन लढाई लढण्याचे अर्ध्यातच टाळून परत घेण्याची जी घटना नुकतीच घडली त्याने पुन्हा एकदा, या देशातल्या आपण म्हणू तोच व तसाच दृष्टिकोन लादणाऱ्या सांस्कृतिक व धार्मिक वर्चस्ववादी वृत्तींना बळ दिले गेले आहे. निवडणुकांच्या तोंडावर नव्याने प्रसिद्धीच्या झोतात येण्याची नवी संधी अभिव्यक्ती स्वातंत्र्याला नख लावू बघणाऱ्या सनातनी मूल्यतत्त्ववाद्यांना आयतीच त्यामुळे मिळालेली आहे.

तस्लिमा नसरीनच्या पुस्तकाच्या निमित्ताने अथवा हुसनेच्या चित्रांच्या निमित्ताने अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर हल्ला करणाऱ्या प्रवृत्ती याहून वेगळ्या नव्हत्या; अगदी डॉ. आनंद यादवांना देखील त्यांचा माथा टेकवायला भाग पाडून; त्यांचे पुस्तकही परत घ्यायला भाग पाडणाऱ्या आणि अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी त्यांना लोकांनी निवडून देऊनही त्या पदावर त्यांना बसूच न देणाऱ्या लोकशाही विरोधी वृत्ती-प्रवृत्तीही याहून वेगळ्या नव्हत्या. 'फायर'चा सेट गंगेच्या पाण्यात बुडवणाऱ्या अथवा भांडारकर इन्स्टिट्यूटवर, माध्यम-समूहांवर हल्ला करणाऱ्या किंवा 'व्हॅलेंटाईन डे'चे निमित्त करून जागोजागीतोडफोड करणाऱ्या, विशविख्यात सूफी बँडला विरोध करणाऱ्या किंवा क्रिकेटचे पिच खोदून ठेवणाऱ्या, ते बेस्ट बेकरी असो की गोध्रा, भागलपूर वा पोचीराम कांबळे, गवईबंधू किंवा खैरलांजी या साऱ्याच घटनांचा इतिहास हा अशाच अविवेकी, असहिष्णू, स्वमताचाच आग्रह आणि परमत विषासमानच मानणाऱ्या हेकेखोर वृत्तीमुळेच निर्मिला जाणारा असांस्कृतिक व असभ्य इतिहास असतो.

हे सारे घडवणाऱ्या या केवळ एखाद्याच विशिष्ट धर्माच्या संस्था वा व्यक्ती नसतात. त्या वृत्ती, प्रवृत्ती, विचार असतात. मग त्या कोणत्याही धर्म, पंथ, संप्रदाय वा गटांच्या असोत, त्या परस्परांनाच आपल्या अशा कृत्याने बळ देत असतात. ते ज्याबद्दल जे काही करतात त्यातले मुळातून त्यांना फारसे काही ठाऊकही नसते. त्यांचा व्यक्तिशः त्या त्याबद्दलचा सखोल अभ्यास वा चिंतनही नसते. फक्त त्यांना स्वतःशिवाय अन्य कुणाचे काहीच ऐकून घ्यायचे नसते. त्यामुळे अशा संस्था, व्यक्ती, गट वा झुंडी यांना वेठीला धरुन काहीच उपयोग नसतो. प्रत्यक्षात वेठीला धरायचे तर ज्यांना अशा अवांछित वृत्ती-प्रवृत्तींना कायद्याने वेसण घालण्यासाठी आपण राज्य करायला नेमले आहे त्यांनी त्यांचे ते काम न करता व कायद्याचे राज्यच कायद्याने चालवून अभिव्यक्ती स्वातंत्र्याला अभय न देता अशा अवांछित वृत्ती-प्रवृत्तीनाच अभय लाभू दिल्याबद्दल त्यांनाच वेठीला धरुन जाब विचारणे गरजेचे आहे.

'पेंग्विन'सारख्या आतंरराष्ट्रीय ख्यातीच्या प्रकाशन संस्थेनेदेखील थातुरमातुर कारण देऊन हे पुस्तक परत घेऊन त्याच्या सर्व प्रती नष्ट करण्याची जी तडजोड कोर्टाबाहेरच स्वीकारली त्याने तर या प्रकरणी आणखीनच वेगळे प्रश्न उद्‌भवले आहेत.

आपल्या लेखकाच्या अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या बाजूने उभे राहून त्यासाठी न्यायालयीन लढाई न लढता पळ काढण्याऱ्या पेंग्विनच्या या धोरणाचा ज्योतिर्मय शर्मा आणि सिद्धार्थ वरदराजन या पेंग्विनच्याच लेखकांनी निषेध म्हणून, 'पेंग्विन'ने २००२ मध्ये प्रकाशित केलेले त्यांचे 'गुजरात : द मेकिंग ऑफ ए ट्रॅजेडी' हे पुस्तकही बाजारातून परत घेऊन 'पेंग्विन'ने त्यांच्याशी केलेला करारही रद्द करावा, आणि त्या पुस्तकाचे स्वामित्वहक्क लेखकास परत करावे असे कळवून त्यांनी जी तंबी दिली आहे, ती खरोखरच अभिनंदनीय बाब आहे. उद्या त्यांच्या या ग्रंथाबद्दलही कोणी उठून उभे झाल्यास प्रकाशक म्हणून 'पेंग्विन' त्या ग्रंथामागे ठामपणे उभे राहीलच ही शक्यता व विश्वास या घटनेमुळे पेंग्विनने गमावला आहे असे प्रकाशकाला या लेखकांनी कळवून झाले आहे. एवढ्या ख्यातीप्राप्त आंतरराष्ट्रीय दर्जाच्या प्रकाशकाचे हे वर्तन या प्रकाशन संस्थेची ख्याती धुळीला मिळवणारेच आहे.

हे जे अभ्यासपूर्ण पुस्तक 'पेंग्विन'ने कोणत्याही न्यायालयीन प्रक्रियेला तोंड न देता परस्पर कोर्टाबाहेरच तडजोड करून परत घेतले, त्याच्या लेखिका-संशोधक व शिकागो विद्यापीठातील धर्मशास्त्राच्या प्राध्यापक डॉ. वेंडी डोनियर यांनी त्यास प्रतिसाद देण्याचे कारण देताना जे म्हटले त्याचा आशय असा आहे, की

भारतातल्या अतिशय खालच्या पातळीवर चाललेल्या राजकीय वातावरणातली अभिव्यक्ती स्वातंत्र्याची एकूणच गळचेपी बघता माझ्यासारखी हिंदूही नसलेली व पुरुषही नसलेली स्त्री ही दोन्ही बाजूंनी तथाकथित शक्तींची दुहेरी बळी ठरण्याची शक्यता लक्षात घेता याशिवाय अन्य उत्तम पर्यायच नाही. या लेखिकेने असे म्हणणे हा तिच्या विनयाचा भाग असून भारतातील ते लोक कोणीही व कसेही असो, पण त्यांचा भारतीय व हिंदू म्हणून तिने राखलेला तो मानच आहे.

या साऱ्या प्रकाराविरुद्ध निषेधाच्या तीव्र प्रतिक्रिया उमटल्या असून दिल्लीच्या प्रगती मैदानावरील जागतिक ग्रंथप्रदर्शनादरम्यान या ग्रंथातल्या काही उताऱ्यांचे वाचन अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या रक्षणार्थ प्रतिकात्मक कृती म्हणून शनिवारी, १५ फेब्रुवारीला करण्यात आले होते. 'इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ मास कम्युनिकेशन'च्या काही प्राध्यापकांनी ते वाचन केले.

ज्या पुस्तकावर कायद्याने कोणतीही बंदी घालण्यात आलेली नाही त्या पुस्तकातील उताऱ्याच्या या वाचनप्रसंगी तिथे जाऊन बेकायदेशीर धुडगूस घालून काही मंडळींनी ते साधे वाचन करणाऱ्यांना देखील धमकावून, पत्रकबाजी करून जो धिंगाणा घातला, तो प्रकार निंदनीय असून तिथला अतिप्रसंग पुरेसा पोलिस बंदोबस्त असल्याने टळला हा भाग वेगळा. 'द हिंदू' वा 'टाइम्स ऑफ इंडिया' यांसारखी इंग्रजी वृत्तपत्रे वगळता अन्य भाषक वृत्तपत्रांनी एखादा अपवाद वगळता त्या वृत्तांकडेही पाठच फिरवली आहे. महाराष्ट्रातील एका मान्यवर वृत्तपत्राच्या एका स्थानिक आवृत्तीच्या संपादकाने तर त्यावरचे इतरांचे भाष्य देखील आपल्या आवृत्तीत प्रकाशित होणार नाही व त्याऐवजी दुसरा काही भरताड मजकूर कसा छापला जाईल याचीही काळजी घेतली आहे.

या वाचन उपक्रमाचे आयोजन करणाऱ्यांच्या वतीने आनंद प्रधान या प्राध्यापकाने अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या बाजूने उभे राहण्यासाठीच हा वाचन उपक्रम आम्ही केल्याचे जे ठामपणे सांगितले ती देखील अभिनंदनीय बाब आहे. त्याचवेळी 'पेंग्विन'सारख्या प्रकाशकाने तथाकथित शक्तींसमोर नमते घेऊन हे पुस्तक परत घेण्याचा जो प्रकार केला ती अतिशय लाजिरवाणी बाब असल्याचे देखील त्यांनी ज्या ठामपणे सांगितले, त्या बाजूने साऱ्याच लेखक-कलावंत व सुबुद्ध नागरिकांनी उभे होण्याची गरजच आहे. तसे अनेक लेखक, कलावंत, विचारवंत उभे झालेही आहेत. मात्र महाराष्ट्रातले मान्यवर लेखक, कलावंत, विचारवंत त्यात दिसत नाहीत. महाराष्ट्रातले संबंधित विश अशा संबंधात गेली काही दशके असेच मूग गिळून बसण्यात व त्यायोगे केवळ स्वतःला लाभदायक ठरेल अशाच भूमिका घेण्यात आपआपल्या तळ्याकाठी मग्न झालेले आहे. तरीही महाराष्ट्र हे पुरोगामी राज्य आहे असे पाठ केलेले वाक्य ते उच्चारतच असतात.

काय लिहायचे व काय वाचायचे हे लेखक-वाचक परस्पर बघून घेतील. प्रत्येक वेळी भावना दुखावण्याची सबब पुढे करून त्यायोगे आपली दहशत उभारण्याचा प्रयत्न करणाऱ्यांचा आता नवा कायदा करूनच बंदोबस्त करण्याची वेळ कशी आली आहे हेच या प्रकरणाने अधोरेखित केले आहे.

या देशाची राज्यघटना व तिने दिलेले स्वातंत्र्य आक्रमित करणाऱ्यांमुळे, ज्यांच्यावर आक्रमण होते त्यांनाही भावना असतात व केवळ त्याच दुखावल्या जात नाही, तर कायद्याच्या राज्यालाही त्यामुळे दुखापत होते. देशातील या वाढत्या असहिष्णूतेचे गांभीर्य खुद्द राष्ट्रपती प्रणव मुखर्जी ह्यांनी देखील जागतिक ग्रंथ प्रदर्शनाचे उद्घाटन करतांना फार प्रकर्षाने आपल्या भाषणात जाणवून दिले आहे. या देशात विविध तत्त्वज्ञाने व दर्शनांनी आपापले वेगवेगळे व परस्परविरोधी म्हणणे देखील शतकानुशतके अतिशय शांतपणे मांडले व त्याचा तितक्याच शांतपणे बौद्धिक, वैचारिक, सैद्धांतिक प्रतिवादही केला आहे. इथल्या संस्कृतीने वाद घालणाऱ्या भारतीयांचाच नेहमीच सन्मान केला आहे, असहिष्णू, अविवेकी भारतीयांचा नव्हे, याचेही स्मरण राष्ट्रपतींनी या ग्रंथप्रदर्शनाच्या उद्घाटनप्रसंगी जे करून दिले त्याला या पुस्तकाच्या निमित्ताने जे काही सध्या चालले आहे त्याची पोर्शभूमी निश्चितच होती.

हा देश बहुधर्मीय, बहुसांस्कृतिक, बहुआवाजी, सहिष्णू व सर्वधर्मसमभाव आणि धर्मनिरपेक्ष, लोकशाही, उदारवादी अशा साऱ्यांना सारखेच स्वातंत्र्य व संधी असणारा देश आहे. हे सारतत्त्व म्हणजेच भारत व भारतीय संस्कृती आहे आणि तिचे रक्षण व संवर्धन हेच आपले आद्य कर्तव्य आहे, ते पार पाडलेच पहिजे व तसे करताना सारे दुराग्रह, पूर्वग्रह, द्वेष यांचा त्याग करून ते दूर राखलेच पाहिजेत असा राष्ट्रपतींच्या भाषणाचा जो रोख होता तो आपला साऱ्यांचाच प्रातिनिधिकच आवाज होता.

'सहमत' या विवेकी व सहिष्णू भारताच्या निर्माणास बांधील दिल्लीतील एका महत्त्वाच्या संस्थेने देखील 'पेंग्विन'ने हे पुस्तक परत घेण्याच्या घटनेचा तीव्र निषेध करणारे पत्रक प्रसृत केले असून संस्कृति व धर्माच्या नावावर बौद्धिक, वैचारिक अभिव्यक्तीच्या स्वातंत्र्यावर जी मंडळी ठिकठिकाणी धूडगूस घालते त्यांचा वैधानिक मार्गाने बंदोबस्त करण्याची मोहीमच चालवण्याचा जो उपाय त्यांनी सुचवला आहे ती मोहीम सातत्याने चालत राहण्याची नितांत गरज आहे. 'सहमत'तर्फे प्रसृत या निषेधपत्रकावर देशातील अनेक मान्यवर लेखक, पत्रकार, विचारवंत, कलावंत, रंगभूमीवरील नट, कार्यकर्ते, अशांचा सहभाग असून त्यात डी. एन. झा, अर्चना प्रसाद, केशवन वेलुथत, के.एम. श्रीमाली, शिरेन मुसवी, उत्सा पटनायक, इरफान हबीब, सी. पी. चंद्रशेखर, राजीव गुप्ता, मिहीर भट्टाचार्य, इकदर अलमखान, मृदुला मुखर्जी, बदरी रैना, रमेश रावत, प्रभात पटनायक, अमर फारुक, सायरा हबीब, अर्जुन देव, अनिल भट्टी, शशी कुमार, इंदिरा देव, शक्ती काक, एम. के. रैना, अनलुरी मुरली, झोया हसन, जे.एम. पारेख, अनिल सद्गोपाल, राम रहमान, मधु प्रसाद,

जयंती घोष, सोहेल हाश्मी, रणबीर चक्रवर्ती, डॉ. पी. के. शुक्ला, गिरीश मिश्रा, मदन गोपाल सिंग, डॉ. विश मोहन झा, अशोक राव, डॉ. लता सिंग, मुकुल दुबे, पार्थिव शाह, विवान सुंदरम, डॉ. बिश्वमय पती व डॉ. राकेश बटबळ या मंडळींनी 'सहमत'तर्फे स्वाक्षऱ्या करून या घटनेच्या निषेधार्थ आवाज बुलंद केला आहे.

'पेंग्विन'ने हे पुस्तक परत घेऊन भारतासह जगभराच्या प्रकाशन विशालाच फक्त लाज आणली व स्वतःच्या संस्थेची कायमची अप्रतिष्ठा करून घेतली एवढ्याच पुरते हे प्रकरण मर्यादित नाही; तर असहिष्णू शक्तींचा कोणताच सामना न करता त्यांना जो अतिरेकी व अतिरिक्त आत्मविशास 'पेंग्विन'ने प्राप्त करवून दिला तो या देशातली सहिष्णू व विवेकी सांस्कृतिकतेची वीण विस्कटणाऱ्यांना बळ देणारा आहे, हा त्यातला महत्त्वाचा भाग आहे.

या घटनेचे जे तीव्र पडसाद उमटत आहेत त्यातून भारतीय दंडविधानाच्या ज्या १५३-अ व २९५-अ या कलमांचा आधार घेऊन कोणाचेही अभिव्यक्ती स्वातंत्र्य दडपण्यासाठी त्या कलमांचा सर्रास गैरवापर करण्याचे प्रकार गेली काही दशके मोठ्या प्रमाणावर वाढीस लागले आहेत, त्या कलमांमध्येच अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर ऊठसूट कोणीही आपल्याला वाटेल त्या कारणासाठी गदा आणण्याचे प्रकार थांबवणाऱ्या निःसंदिग्ध अशा कायदेशीर दुरुस्तीचीच मागणी आता केली जात आहे.

कोणत्याही समुदायांना अवमानित वाटणार नाही, कोणतीही इजा त्यांना पोचणार नाही, द्वेषभावना वाढीस लागणार नाही व सोबतच कोणाच्याही अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर, कलानिर्मितीवर, लेखन स्वांतत्र्यावर, विचारस्वातंत्र्यावर तथाकथित स्वयंघोषित संस्कृतिरक्षकांकडून अशी ऊठसूट गदा आणली जाणार नाही अशा प्रकारची काळजी घेणारी दुरुस्ती भारतीय दंड संहितेच्या ज्या कलमांचा आज भावना दुखावण्याच्या राजकारणासाठी सर्रास गैरवापर केला जातो आहे, त्यात करण्यात यावी अशी मागणी भारत सरकारकडे आणि 'पेंग्विन'ने हे पुस्तक परत घेण्याऐवजी पुस्तकाबाबतचा न्यायालयीन लढा सुरु राखावा अशा प्रकारच्या मागण्यांचे निवेदन 'पेंग्विन'कडे पाठवण्यासाठी काही मान्यवरांनी प्रयत्न चालवले आहेत. त्यात सेंटर फॉर स्टडी ऑफ डेव्हलपिंग सोसायटीचे अनन्य वाजपेयी, न्यू यॉर्कच्या कोलंबिया विद्यापीठाचे शेलडॉन पोलोक, त्याच विद्यापीठाचे पार्थ चॅटर्जी, नॉर्थ कॅरोलियॉना विद्यापीठातून लॉरी पॅटन, प्रख्यात इतिहासकार रोमिला थापर, इस्रायलच्या जेरुसलेम विद्यापीठाचे डेव्हिड शूलमन या व अशा अनेक विद्वान, विचारवंत व कार्यकर्त्यांचा समावेश असून, त्या निवेदनावर आपणही स्वाक्षरी करावी व या मोहिमेचा भाग व्हावे असे आवाहन त्यांनी केलेले आहे.

ही 'ऑन लाईन पिटिशन' http://thne.ws/1LOisfd या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. या देशात लोकशाही कायद्याने निर्माण केलेल्या संसदेने, कायदेमंडळाने, कायद्याने नेमलेल्या सेन्सॉर बोर्डाचे नियंत्रण उपलब्ध असताना व संबंधित कायदे व न्यायालये देखील त्यानंतर उपलब्ध असतांना त्या व्यतिरिक्त ऊठसूट प्रत्येक उठून उभ्या राहणाऱ्या झुंडीकडून आपले लेखन, विचार, कलाकृती, अभिव्यक्ती तपासून घेण्याची व सेन्सॉर करवून घेण्याची जी समांतर सेन्सॉरयंत्रणा निर्मिली गेली आहे ती वा अन्य कोणत्याही प्रकारची दहशत निर्मिणारी नियंत्रणे ही पूर्णपणे घटनाबाह्य व बेकायदाच असतात. मात्र त्यांच्यासाठीच ज्यांना कायद्याचे व घटनात्मक नैतिकतेचे राज्य मान्य आहे. ज्यांना कायद्याचे व या राज्यघटनेचे राज्यच नको आहे व आपण म्हणू तोच धर्म, तोच कायदा व तीच नीती एवढेच हवे आहे, देशात जे आपली स्वयंघोषित समांतर न्यायव्यवस्था व आपआपले मध्ययुगीन टोळीवजा नियम व कायदे राबवू पाहतात, ते या देशाचे खरे तर तालिबानीकरणच करत असतात. अर्थात त्यांचे उद्दिष्टच ते असते. सर्वोच्च न्यायालयाने देखील असे समांतर कायदे व न्याय व्यवस्था राबवू बघणाऱ्या 'पंचायती' करणाऱ्यांना जरब बसवणारा स्वतंत्र कायदा करण्याच्या सूचना केंद्र शासनाला करून झाल्या आहेत. मात्र शासनातले मंत्रीच असल्या 'पंचायतींना' समाजसेवी संस्थांचा, 'सांस्कृतिक' दर्जा देऊ लागले आहेत. घटनेचीच शपथ घेऊन घटनाविरोधी कृत्ये करणारी अशी सरकारे व मंत्री शेवटी लोकच निवडून देतात. अशांना निवडून दिले जाते आहे तोपर्यंत हे असेच चालत राहणार आहे. स्वतःला 'आम आदमी' म्हणवून घेणाऱ्या व 'लोकपाल' की 'जनलोकपाल' याचेच तेवढे राजकारण करणाऱ्यांनी देखील अशा 'पंचायती' प्रकरणी मात्र मूगच गिळलेले असतात. कारण व्यवस्थापरिवर्तनाच्या नावावर त्यांनाही शेवटी फक्त सत्तापरिवर्तन आणि 'त्यांना' घालवून 'यांची' सत्ता एवढाच बदल हवा असतो. अशा प्रकरणी ते देखील त्यामुळे तोंडच उघडत नाहीत. 'लोकपक्ष' म्हणवणारे पक्षही अशावेळी अभिव्यक्ती स्वातंत्रविरोधी, लोकविरोधी व खोटेच लोकपक्ष ठरतात.

खरे तर 'द हिंदू'च्या त्या विदेशी लेखिकेने धर्म-अर्थ-काम-मोक्ष या हिंदू चतुःसूत्रीत समान दर्जा व स्थान दिलेले 'काम' ही देखील नैसर्गिक बाब म्हणून हिंदूमध्ये स्वीकारणाऱ्या समाजाचा म्हणजे हिंदूंचा गौरवच केला आहे. किती उच्च दर्जाने ती बाब बघितली गेली आहे व त्या तुलनेत सेमेटिकनांनी म्हणजे ख्रिश्चन, जुडाईझम व इस्लामच्या मूळ भूभागांतील लोकांनी ज्या पद्धतीने त्याकडे बघितले त्यापेक्षा हिंदूंची त्या बाबतची दृष्टी कशी निकोप, नैसर्गिक, वेगळी आहे हे मांडले असल्याचे सांगितले जाते. त्याला हिंदूंवर, त्यांच्या धर्मावर हल्ला कसा काय म्हणता येईल?

ज्यांचे मुळातच हिंदुत्वाचे देखील आकलन पुरेसे नाही व चुकीचेच आहे तेच तेवढे असे करू शकतात. खरे तर ते त्यांच्या कडवेपणापेक्षा कितीतरी प्रचंड प्रमाणावर असणाऱ्या उदार हिंदुत्वाचा अपमानच त्या योगे करत असतात. उदार व उदात्त हिंदुत्वाला

हिंदुत्व न मानता ते कडवे करु बघणाऱ्यांना मुळात हिंदुत्वाची उदार आवृत्तीच नको आहे, हवी आहे ती ते म्हणतील तीच व तशीच कडवी आवृत्ती, हा खरा मुद्दा आहे. त्यामुळे हा संघर्ष हिंदूविरुद्ध अन्य धर्मीय असा नसून हिंदूविरुद्ध हिंदू असाच आहे. सनातनी कडवेपणा व वर्चस्व याविरुद्धची बंड उभारणाऱ्या बहुजन नायकांच्या विविध संप्रदायांनी वेळोवळी उदार केलेल्या हिंदुत्वाचा नायनाट आणि सनातनी वर्चस्ववादी कडव्या हिंदुत्वाच्या प्रतिष्ठापनेचाच तेवढा वसा घेतलेल्यांना ते म्हणतील तसेच व तेवढेच 'हिंदुत्व' व हिंदुत्वाची त्यांची आवृत्तीच तेवढी मान्य व बाकीचे सारे हिंदुत्व व हिंदू म्हणून अमान्य, हे जे त्यांना ठसवायचे आहे त्याचा प्रतिवाद शांतपणे भारतीय 'वादे वादे जायते' या वाद-विवाद पद्धतीनेच व्हायला हवा.

उदार हिंदुत्वाच्या समर्थकांनी मोठ्याने व मोठ्या प्रमाणावर धर्मचर्चा, संस्कृतिचर्चा गांभीर्याने करणे जे सोडून दिले आहे त्याचाच हा परिणाम आहे. त्या त्यांनी करायलाच हव्यात. त्यासाठी धर्माचे, संस्कृतीचे व धर्मशास्त्रांचे, धर्मतत्त्वांचे, संस्कृतिविज्ञानाचे, त्यांचे आकलन त्यांनी वाढवायला हवे. केवळ कडव्या हिंदुत्ववाद्यांना मूलतत्ववादी शिव्या-शाप देण्याने व त्यांच्या निषेधाने काहीच साध्य होणार नाही. सोबतच निर्वाचित जनप्रतिनिधींवर कायद्याच्या राज्याच्या रक्षणाचा दबाव वाढवणारी सातत्यपूर्ण जनआंदोलनेही व्हायला हवीत. त्यातून एकदा का मतदार या बाजूने उभा झाला की हे प्रश्न आपोआपच पूर्णपणे निकालात जरी निघाले नाहीत तरी त्याचे प्रमाण निश्चितच नगण्य होईल. जेव्हा जेव्हा असे झाले त्या त्या वेळी वर्चस्ववाद्यांचे अस्तित्व या देशात नगण्य करून सोडले गेले होते, हाच इतिहास आहे. मात्र असे झाले नाही तेव्हा तेव्हाच सांस्कृतिक वर्चस्ववाद्यांचेच वर्चस्व वाढले आहे. मात्र आपण ते न करता केवळ अन्य कुणीतरी हे करेल अशी वृत्ती बाळगली तर ती बाळगणारेही एक दिवस टोळीबाजांच्या तालिबानी वृत्तींचेच बळी ठरणार आहेत हे नक्की.

**डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी**
१०५, संकल्प सहनिवास, ४०, खरे टाऊन,
धरमपेठ, नागपूर ४४००१०
भ्रमणध्वनी : ९९६०४९३६२२
shripadbhalchandra@gmail.com

**नुकतीच प्रसिद्ध झालेली बेधडक कांदबरी...**




चॅनल
24 Live
समीरण वाळवेकर

राजकारणाच्या पटलावर सतत कुरघोडी करणारी प्यादी..
टीव्ही, न्यूज चॅनेल्सचं वेगवान, सतत धावणारं जग..
लोकशाहीच्या चारही स्तंभांमध्ये बोकाळलेला भ्रष्टाचार..
जागल्या बनून ज्यांनी इतर तीन स्तंभांवर अंकुश ठेवायचा,
तेच व्यवस्थेचा भाग बनले तर?
अस्वस्थ मन, निर्दयी राजकारण आणि
कॅमेऱ्यामागचं अनाकलनीय जग!
त्यात नाती, भावना, मूल्यांना काहीच स्थान नाही!
माध्यमांच्या पार्श्वभूमीवर घडणारी, अस्वस्थ करणारी
चित्रपटाप्रमाणे रंजक वेगवान काल्पनिक कादंबरी..

**मूल्य ४०० रु.**
**सवलतीत २४० रु.**

# वर्तन, वाचन आणि परिवर्तन

## सुधीर थत्ते

आपण मूलतः आनंदासाठी वाचतो. शिवाय, वाचनातून आपल्याला ज्ञानही मिळते. तसेच, लहान मुलांच्या मनावर चांगले संस्कार व्हावेत, यासाठी आपण त्यांनाही लहानपणापासून वाचनाला प्रवृत्त करतो. आता शास्त्रज्ञांनी वाचनाचे वैज्ञानिक दृष्टिकोनातून अन्वेषण आणि विश्लेषण केले आहे. त्यांचे हे संशोधन आणि आपल्या वर्तनात वाचनाने कसे परिवर्तन घडून येते याविषयी त्यांनी काढलेले निष्कर्ष वाचनप्रेमींना नक्कीच वाचनीय वाटावेत असे आहेत.

वाचनामुळे विचारांना प्रगल्भता येते, हे फार पूर्वीपासून माहीत आहे. बालवयात केलेल्या वाचनामुळे आपल्या मनावर होणारे संस्कार आयुष्यभर टिकतात, हा आपला अनुभव आहे. पण वाचनामुळे आपल्यात होणाऱ्या या बदलांचा जैविक आधार काय आहे, हे आजवर माहीत नव्हते. अटलांटातल्या एमोरी विद्यापीठातले चेतापेशीतज्ज्ञ ग्रेगरी बर्न्स आणि त्यांच्या सहकारी शास्त्रज्ञांनी अत्याधुनिक चेताविज्ञानाचा वापर करून वाचनाच्या जैविक परिणामांचा शोध घेऊन वाचनप्रेमींना आनंद होईल असा निष्कर्ष काढला आहे. केवळ मनोरंजन म्हणून वाचलेल्या कादंबरीचासुद्धा आपल्या मेंदूवर शाश्वत परिणाम होतो, असे त्यांना आढळले आहे.

आपले विचार आणि भावना यांचे उगमस्थान आपल्या चेतापेशींमध्ये (न्यूरॉन) आहे. आपल्या शरीरात सुमारे शंभर अब्ज चेतापेशी असतात. आपला मेंदू हा प्रामुख्याने चेतापेशींचाच बनलेला असतो. शिवाय, शरीरभर या चेतापेशींचे जाळे पसरलेले असते. चेतापेशींच्या या जाळ्यामध्ये विद्युतसंदेशांच्या रूपाने सतत माहितीची देवाणघेवाण होत असते. ही देवाणघेवाण चेतापेशींमधल्या अनुबंधनांमधून (सिनॅप्स) होते. जसजशी नवनवीन माहिती मेंदूमध्ये साठवली जाते, तसतशी चेतापेशींमधल्या या अनुबंधनांची संख्या वाढत जाते. पूर्ण वाढ झालेल्या व्यक्तीच्या चेतापेशींच्या जाळ्यामध्ये अशी सुमारे एक लाख अब्ज अनुबंधने (सिनॅप्स) निर्माण झालेली असतात. आणि पुढेही आयुष्यभर ती वाढतच राहतात.

कोणतीही माहिती साठवण्यात सहभागी होणाऱ्या चेतापेशींना ते कार्य करण्यासाठी कितीतरी जास्त ऊर्जेची गरज भासते. मेंदूच्या त्या भागातला रक्तपुरवठा तात्पुरता वाढवून ही ऊर्जा उपलब्ध करून देण्यात येते. एखादी बौद्धिक क्रिया घडताना मेंदूच्या कोणत्या भागाला असा रक्तपुरवठा केला जात आहे, हे कळल्यास कोणत्या चेतापेशी त्या कामात सक्रियपणे भाग घेत आहेत, हे निश्चित करता येते. यासाठी 'कार्यात्मक चुंबकीय अनुनाद चित्रीकरण' (फंक्शनल मॅग्नेटिक रेझोनन्स इमेजिंग) वापरून अशा चेतापेशींचा वेध घेता येतो.

बर्न्स आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी या चित्रणाचा वापर करून आपण वाचतो तेव्हा त्यातून मिळणारी माहिती आपल्या मेंदूतल्या चेतापेशींमध्ये कुठे, कशी आणि किती काळ साठवली जाते, याचा शोध घ्यायचे ठरवले. त्यांनी या प्रयोगासाठी त्यांच्या विद्यापीठात पदवीपूर्व शिक्षण घेणारे एकवीस विद्यार्थी निवडले. या विद्यार्थ्यांनी एकोणीस दिवस या प्रयोगामध्ये भाग घेतला. पहिले पाच दिवस आराम करत असताना या विद्यार्थ्यांच्या मेंदूचे चित्रीकरण करण्यात आले. यातून त्यांच्या मेंदूच्या प्रयोगपूर्व अवस्थेचे चित्रण उपलब्ध झाले.

नंतर त्यांनी रॉबर्ट बॅरिस यांची 'पॉंपेई' नावाची कादंबरी या विद्यार्थ्यांना वाचायला दिली. ही कादंबरी प्राचीन इटालीतल्या पॉंपेई शहराजवळच्या व्हेसुवियस टेकडीवरील ज्वालामुखीच्या स्फोटाच्या सत्यघटनेवर आधारलेली आहे. ज्वालामुखीतून येणाऱ्या वाफा आणि त्या परिसरात घडणाऱ्या घटनांवरून कादंबरीच्या नायकाला त्या ज्वालामुखीचा लवकरच स्फोट होणार असल्याची खात्री पटते. पॉंपेईत राहणारी त्याची प्रेयसी आणि शहरातले अन्य नागरिक यांना त्या स्फोटापासून वाचवण्याचा प्रयत्न तो करतो. पण अन्य नागरिक त्याच्यावर विश्वास ठेवत नाहीत आणि अखेर त्यांना स्फोटाच्या दाहक दुष्परिणामांना सामोरे जावे लागते. कादंबरीत या सर्व घटनांचे यथार्थ वर्णन करण्यात आले आहे.

शास्त्रज्ञांनी विद्यार्थ्यांना प्रत्येक दिवशी या कादंबरीतील एक विशिष्ट भाग वाचून दुसऱ्या दिवशी यायला सांगितले. त्यावर प्रश्न विचारून तो भाग त्यांनी खरोखरच वाचल्याची खात्री करून घेतली. मग विश्रांती घेत असलेल्या अवस्थेत त्यांनी त्या विद्यार्थ्यांच्या मेंदूचे चित्रीकरण केले. कादंबरी पूर्ण वाचून झाल्यानंतरही पाच दिवस शास्त्रज्ञांनी असे चित्रीकरण करणे चालू ठेवले.

नंतर त्यांनी या चित्रीकरणाचे विश्लेषण करून त्यावरून आपले निष्कर्ष तयार केले. तेव्हा त्यांना भाषेचा अन्वयार्थ लावणाऱ्या, विविध ज्ञानेंद्रियांच्या संवेदनांचे ग्रहण करणाऱ्या आणि विविध हालचालींचे नियंत्रण करणाऱ्या मेंदूतल्या चेतापेशींमध्ये कादंबरीच्या

वाचनानंतर कायमस्वरूपी अनुबंधने नव्याने निर्माण झालेली आढळली.

कादंबरीवाचनाच्या काळात विद्यार्थ्यांची मने कादंबरीतल्या पात्रांशी एकरुप झाल्यामुळे त्यातल्या घटना प्रत्यक्षात अनुभवल्यावर जे बदल मेंदूतल्या चेतापेशींमध्ये झाले असते, तसेच बदल या विद्यार्थ्यांच्या चेतापेशांमध्येही घडून आल्याचे दिसले. हे बदल काही काळानंतरही कायम राहिल्याचे आढळले.

वाचनाचा आपल्यावर होणारा परिणाम आपल्या मेंदूत कोणते जैविक बदल घडवून आणतो, ते या प्रयोगांमुळे स्पष्ट झाले. तसेच, हे बदल कायमस्वरूपी असल्याने वाचनाने आपल्यावर लहान वयात झालेले संस्कारही आयुष्यभर का कायम राहतात, तेही उलगडले. मात्र या बदलांचा अर्थ अधिक स्पष्ट होण्यासाठी चेतापेशी कशा काम करतात, याकडे आपल्याला पुन्हा एकदा वळावे लागेल.

चेतापेशी या वाचलेल्या किंवा अनुभवलेल्या विविध गोष्टींच्या आठवणींची साठवण आपल्या मेंदूतल्या स्मृतिकोशात करतात. ही गोष्ट म्हणजे जणू संगणकात साठवलेला डेटा. संगणकातला प्रोसेसर जसा दिलेल्या डेटावर प्रक्रिया (प्रोसेसिंग) करतो, त्याप्रमाणे चेतापेशीच स्मृतिकोशात साठवलेल्या विविध आठवणींवर प्रक्रिया करतात. संगणकाला डेटावर प्रक्रिया करण्यासाठी मानवाने बनवलेल्या आज्ञावलीची (प्रोग्रॅम) गरज असते. पण मानवी चेतापेशी मात्र आपल्या आठवणींच्या साठवणीवर स्वतःच प्रक्रिया करतात. ही प्रक्रिया केल्यावर त्यावरून त्या निष्कर्ष काढतात आणि हे निष्कर्षही आपल्या स्मृतिकोशात साठवून ठेवतात. या निष्कर्षांच्या आधारे, भविष्यात कसा विचार करणे किंवा कसे वागणे योग्य ठरेल हे निश्चित करून त्यासाठी लागणारी वर्तन-रीत' (बिहेवियरल-अल्गोरिदम) तयार करून आपल्या स्मृतिकोशात साठवून ठेवतात.

जर अशी अनुभवावर आधारित वर्तन-रीत उपलब्ध नसेल तर कोणत्याही नव्या गोष्टीला सामोरे जाताना मेंदू आपल्या जनुकांमध्ये गुंफलेली आज्ञावली वापरतो. जनुकांमध्ये गुंफलेली आज्ञावली प्रामुख्याने उत्क्रांतीच्या शर्यतीत आपण टिकून राहण्यासाठी बनलेली असते. म्हणूनच स्वार्थ, भय, मैथून यांसारख्या प्राण्यांच्या सहजप्रेरणा (इन्स्टिंक्ट) हा तिचा आधार असतो. अनुभवातून किंवा वाचनातून आपल्या मेंदूत जी वर्तन-रीत निर्माण होते ती या आज्ञावलीहून कितीतरी उच्च अशा सुसंस्कृत (सिव्हलाइझ्ड) पातळीवरची असते. अनुभवातून किंवा वाचनातून शहाणपण येऊन आपण सुसंस्कृत बनतो, ते याचमुळे.

मात्र, चित्रीकरणाचा वापर करून मेंदूच्या विविध भागांमधली अनुबंधनांची गुंफण कळली तरी वाचनामुळे वाचकाच्या वागण्यात खरोखरच फरक पडतो का, हा प्रश्न शिल्लक राहतो. या प्रश्नाचा शोध घेतला आहे, नेदरलँडस्‌मधल्या ॲम्स्टरडॅम विद्यापीठाच्या मथियस बल आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी.

यासाठी या शास्त्रज्ञांनी विद्यापीठात शिकणाऱ्या सत्त्याणव विद्यार्थ्यांचे दोन गट केले. यातल्या एका गटात असणाऱ्या पन्नासजणांना त्यांनी 'अंधत्व' या कादंबरीचा डच अनुवाद वाचायला दिला. एकोणीसशे अठ्ठ्याण्णवचे साहित्याचे नोबेल पारितोषिक देऊन गौरवलेले लेखक जोसे सारामागो यांच्या या कादंबरीत अचानक आलेले अंधत्व आणि त्यामुळे आलेले परावलंबित्व याची व्यथा उत्तम रीतीने मांडलेली आहे. या कादंबरीतली वर्णने वाचकांच्या भावनेला हात घालतात, अशी तिची ख्याती आहे. दुसऱ्या गटातल्या सत्तेचाळीस जणांना 'हँडेल्सब्लाद' या डच वर्तमानपत्रातले लेख वाचायला दिले. वर्तमानपत्रातले हे लेख केवळ वस्तुनिष्ठ माहितीवर आधारलेले आणि कोणत्याही भावनिक विषयाला हात न घालणारे असे होते. दोन्ही मजकुरांची शब्दसंख्या साधारणपणे समान होती. प्रयोगात भाग घेणाऱ्या विद्यार्थ्यांना वाचन करताना अधिक भावनिक तादात्म्य (इमोशनल ट्रान्स्पोरटेशन) पावता यावे म्हणून दोन्ही मजकूर त्यांना त्यांच्या मातृभाषेतून वाचायला देण्यात आले होते.

वाचनापूर्वी, वाचनानंतर लगेच आणि वाचनानंतर काही काळाने दोन्ही गटांमधल्या विद्यार्थ्यांची 'समानुभूती चाचणी' (एम्पॅथी टेस्ट) घेण्यात आली. ही चाचणी भावनिक तादात्म्याचे मापन करते. एखादी व्यक्ती दुसऱ्या व्यक्तींच्या भावभावना कितपत समजून घेऊ शकते आणि त्यानंतर ती व्यक्ती अन्य व्यक्तींशी कशी वागते, याचा शोध घेण्यासाठी वापरली जाणारी ही प्रमाण चाचणी आहे. असेच प्रयोग त्यांनी अन्य विद्यार्थ्यांवरही वेगवेगळ्या कादंबऱ्या आणि अन्य मजकूर वापरुनही केले.

या प्रयोगांमध्ये संशोधकांना असे आढळले, की कादंबरीचे वाचन करणाऱ्यांच्या समानुभूती क्षमतेत भर पडली, तर अन्य मजकूर वाचणाऱ्यांच्या समानुभूती क्षमतेत मात्र फरक पडलेला दिसला नाही. कादंबरीवाचन करणारे दुसऱ्यांच्या भावभावना अधिक चांगल्या रीतीने समजू लागले आणि त्यांच्याशी अधिक चांगले वागू लागले. तसेच, त्यांच्या वर्तणुकीतले बदल बऱ्याच काळानंतरही कायम राहिले. यावरून त्यांनी असा निष्कर्ष काढला, की चांगल्या साहित्याच्या वाचनाने वाचक अधिक चांगला वागण्यास प्रवृत्त होतो.

या दोन संशोधक गटांनी आपल्या संशोधनांमधून वाचनाचे दोन पैलू उलगडून दाखवले. वाचनाने वाचकांच्या मेंदूतल्या चेतापेशींमध्ये कायमस्वरूपी जैविक बदल घडतात आणि चांगले साहित्य वाचणाऱ्यांच्या मेंदूत झालेल्या अशा जैविक बदलांमुळे ते वाचक अधिक चांगले वर्तन करु लागतात. वाचनाने व्यक्तिमत्त्वात घडणाऱ्या परिवर्तनाचा उलगडा करणारे हे संशोधन सर्वांनाच नवनवीन, चांगले साहित्य वाचायला प्रवृत्त करणारे आहे!

**– सुधीर थत्ते**
फ्लॅट नं. ११३, टॉवर ए ६,
गोदरेज गार्डन एन्क्लेव्ह,
पिरोजशानगर, विक्रोळी (पूर्व),
मुंबई ४००० ०७९
भ्रमणध्वनी ९९८७५८८५८३
sudhirthattey@yahoo.com

## ग्रंथपान

चांगदेव काळे
संपर्क : ९८६९२०७४०३

### डॉ. रघुनाथ माशेलकर : भारतीय बौद्धिक संपदेचा उद्‌गाता – अ.पां. देशपांडे

डॉ. रघुनाथ माशेलकर यांना २६ जानेवारी २०१४ रोजी 'पद्मविभूषण ' या राष्ट्रीय पुरस्काराने सन्मानीत करण्यात आले. एका आव्हानवादी ध्येयाचा हा सन्मान आहे, बौद्धिक संपदेचा गौरव आहे. आपल्यासाठी ही अभिमानाची बाब म्हणायला हवी. परंतु त्यांना मिळालेला हा काही पहिलाच पुरस्कार नाही. लेखक अ.पां. देशपांडे यांनी लिहिलेल्या या चरित्रातील पृ.क्र.१४५ ते १६२ वरील तपशील पाहिला तर लक्षात येईल, की राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय अशा किती पुरस्कार आणि सन्मानांनी त्यांच्या कारकिर्दीत स्वतःला पावन करुन घेतले आहे. त्यांच्यातील क्रमवारीचे कुतूहल म्हणून लेखक जेव्हा चरित्रनायकालाच सवाल करतात तेव्हा ते पहिला क्रमांक देतात, 'एफआरएस' फेलोशिप ऑफ रॉयल सोसायटीला. नोबेल पुरस्कारानंतरचा सर्वोच्च पुरस्कार! त्याचे कारण ही तसेच आहे. रॉयल सोसायटीच्या साडेतीनशे वर्षांच्या इतिहासात हा सन्मान प्राप्त झालेले डॉ. माशेलकर हे एकमेव मराठी शास्त्रज्ञ आहेत!

डॉ. माशेलकरांवरील हे पुस्तक म्हणजे एका प्रवासाची गाथा आहे. हा प्रवास आहे त्यांच्या बौद्धिक पातळीचा,ज्याच्या पावलांसाठी जगाच्या ज्ञानपीठांनी आपले दरवाजे उघडे केले. हा प्रवास आहे कल्पकतेचा, ज्याद्वारे भारतीय सर्जनशीलतेला जागतिक पातळीवर स्वतःचे स्थान प्राप्त झाले. हा प्रवास आहे त्यांच्या ध्येयाचा, जे आपले आहे ते सिद्ध करण्याचा, त्याचे हक्क मिळवण्याचा, भारताला सर्जनशील भारत म्हणून ओळख देण्याचा. ज्या मातीतून आलो आहे तिचा दरवळ जगभर पसरवण्याचा. याचा प्रत्यय येतो त्यांच्या एका व्याख्येतून, इंडियातील आय हे अक्षर इमिटेशन म्हणजे नक्कल करणे अथवा इनहिबीशन म्हणजे प्रतिबंध करणे असे नसून त्याचा अर्थ आहे इनोव्हेशन म्हणजे नावीन्य,सर्जनशीलता.

पेटंट हा शब्द आज परवलीचा समजला जातो, त्यापाठी असलेली जिद्द आणि लढा हा डॉ. माशेलकरांचा आहे. ही लढाई हळदीच्या पेटंटपासून सुरु झाली. माशेलकरांनी ही लढाई सोडून दिली असती तर नुसती हळदच नाही तर परंपरेने, वारशाने हजारो वर्षे ज्या ज्ञानावर, संशोधनावर भारतीयांचा हक्क आहे, तो हक्कच दुसऱ्या देशांकडे गहाण पडण्याची शक्यता अधिक होती. आज भारताकडे जी पेटंट आहेत त्यापैकी ४० टक्के पेटंट डॉ. माशेलकरांनी त्यांच्या सीएसआयआरमार्फत मिळवलेली आहेत.

डॉ. माशेलकरांच्या ठायी असलेली जिद्द ही त्यांना त्यांच्या आईकडून मिळालेली देणगी आहे. आईने स्वतःच्या कष्टाचा वा गरिबीचा बाऊ न करता त्यांना शिक्षणाची कास धरायला लावली. पोस्ट डॉक्टरल रिसर्च करायला हवे असे सुचवले. त्याविषयी लेखक एका वाक्यात वर्णन करतो, की माशेलकरांच्या अत्युच्च शिक्षणाच्या यशाला त्यांच्या आईच्या महत्त्वाकांक्षेची रुपेरी किनार लाभली आहे. स्वतः डॉ.माशेलकर ते आजन्माचे ऋण मान्य करतात.त्याच जिद्दीने परदेशाचा मोह सोडून आपल्याच देशाला आपल्या ज्ञानाचा लाभ अर्पण करतात. एकूण ४५ वर्षांच्या कारकिर्दीपैकी ३८ वर्षे ते भारतात राहून त्याला जगाचे ज्ञानकेंद्र करण्यासाठी झटत राहतात ते याच जिद्दीने.

भारताच्या बौद्धिकतेविषयी असलेले मत जीईची दंतकथा बनलेला महान नेता जॅक वेल्च याने व्यक्त केले आहे.तो म्हणतो, 'भारत हा मला विकसित झालेला देश तर वाटतोच, त्याहीपेक्षा हा देश म्हणजे मला बुद्धिमत्तेची राजधानीच आहे असे वाटते.' या बुद्धिमत्तेच्या सर्जनशीलतेचा विकास, संशोधन आणि त्याचे हक्क याबाबतची तळमळ डॉ. माशेलकरांच्या कर्तृत्वातून व्यक्त होते. असामान्य बुद्धिमत्ता असलेल्या, कर्तृत्वाचे क्षितीज काबीज केलेल्या, आंतरराष्ट्रीय स्तरावर आपले स्थान अढळ केलेल्या व्यक्तीचे व्यक्तिमत्त्व आणि कर्तृत्व आपल्या लेखणीतून अक्षरांकित करणे सोपे नाही. ते आव्हान लेखकाने समर्थपणे पेलले आहे. अनेक महापंडितांच्या सोबतचे फोटो छापले आहेत. त्यांच्यावरुन या आव्हानाची कल्पना यावी. या चरित्रग्रंथासाठी लेखकाने भरपूर मेहनत घेतली आहे हे संदर्भसूचीवरुन लक्षात येतेच, शिवाय लेखनात आलेली माहिती आणि तपशीलही त्याची साक्ष देतात. तीही सोप्या आणि ओघवत्या लयीत. त्यामुळे हा केवळ चरित्रग्रंथ न राहता संदर्भ ग्रंथ झाला आहे. ग्रंथालीने हा ग्रंथ सुबकतेने प्रकाशित करुन आपल्या दृष्टीचा पल्ला किती अचूक आहे याचा अंदाज सार्थ ठरवला, पद्मविभूषण मिळण्यापूर्वीच. त्यासाठी ग्रंथाली आणि लेखक यांना सलाम! डॉ. माशेलकर यांचे अभिनंदन!




**डॉ. रघुनाथ माशेलकर**
**भारतीय बौद्धिक संपदेचा उद्‌गाता**
**अ.पां. देशपांडे**
**किंमत २२५ रुपये**
**सवलतीत १३५ रुपये**

ग्रंथाली

## ग्रंथपान

### जेनेटिक्स कशाशी खातात? – डॉ. उज्ज्वला दळवी

सध्या एका रोगावर सर्वांसाठी एकच उपाय ठरलेला असतो. रोगाचं निदान झालं की जनुक-तपास न करता त्या अक्सीर इलाजाचा ठरलेला डोस सर्वांसाठी लिहायचा सरधोपट शिरस्ता आहे. त्यामुळे काही रुग्णांत गंभीर दुष्परिणाम होतात. हे औषधांच्या दुष्परिणामाचं प्रमाण मोठं आहे. अमेरिकेत दरवर्षी सुमारे एक लाख लोक औषधांच्या दुष्परिणामांनी मृत्युमुखी पडतात.

'कॅन्सरसारख्या रोगात रुग्णाची जन्मकुंडली तर महत्त्वाची असतेच,पण कर्करोगाच्या पेशींना स्वतंत्र जनुकटिपणी असते. ज्या स्त्रियांच्या स्तनाच्या कॅन्सरमध्ये एचईआरटू हे जनुक अधिक व्यक्त होतं त्यांच्यात हरसेप्टीन हे एरवी प्रभावी असणारं औषध लागू पडत नाही, ते निष्प्रभ ठरतं. कॅन्सर फिरफिरुन डोकं वर काढतो. म्हणून ते जनुक आधीच तपासून पाहायला हवं.' हे आहेत अनुभवाचे बोल. डॉ. उज्ज्वला दळवी सांगताहेत जनुकाबाबतचं महत्त्व आणि त्याचं कार्य 'जेनेटिक्स कशाशी खातात?' या पुस्तकातून.

डॉ. उज्ज्वला दळवी हे वैद्यकीय क्षेत्रातलं अनुभवसंपन्न व्यक्तिमत्त्व. हिंदुजा रुग्णालयात कन्सल्टंट, डी.वाय. पाटील मेडिकल कॉलेजमध्ये वैद्यकशास्त्राच्या विभागप्रमुख. देशी-परदेशी वैद्यकीय क्षेत्रात काम केलेल्या. त्यांच्या या अनुभवाचा लाभ वाचकांना व्हावा या हेतूनं लिहिलेलं हे पुस्तक किती आशयगर्भ आहे याचा अनुभव पुस्तक वाचताना पदोपदी येत राहतो. हा केवळ स्टेथोस्कोपी सल्ला नाही. तर सोबत कलमकसबही तितकंच लीलया मोरपीसासारखं पानापानावर फिरलेलं जाणवतं. विज्ञान विषय सोपा करुन सांगण्यासाठी शब्दकोशातल्या शब्दांना वेठीला धरण्याऐवजी आपल्या प्रचलित शब्दांना कल्पनेच्या चंचीतून काढल्यामुळे. आनंदाचा डंका..मेंदूच्या बुडाशी चिंचोक्याएवढ्या ग्रंथी..भळभळत्या जखमा, अशा रचनेतून वाचनाचा वेगळाच आनंद मिळल्याचे समाधान मनात रेंगाळत राहते. याचं कारण त्याना असलेली ललित लेखनाची आवड. 'ग्रंथाली'नंच प्रसिद्ध केलेल्या त्यांच्या 'सोन्याच्या धुराचे ठसके' या लोकप्रिय पुस्तकातून, वेळोवेळी विविध नियतकालिकांतून प्रसिद्ध झालेल्या लेखनातून ही आवड वाचकांच्या भेटीला यापूर्वी आलेली आहेच.

जनुक आणि डीएनए हा विषय डॉली या मेंढीच्या क्लोनमुळे सगळ्यांच्या परिचयाचा झाला. तसे हल्ली ऊठसूट कुठल्याही गुन्ह्यासाठी डीएनएची तपासणी करण्याची बातमी नित्यनेमानं वर्तमानपत्रात वाचायला मिळतेच. त्यामुळे या विषयीचं कुतूहल प्रत्येकाच्या मनात सतत डोकावत आहे. त्यास सापेक्ष अशी कितीतरी उदाहरणं या पुस्तकात दिलेली आहेत. जनुकाच्या तपासणीतून बाहेर पडणारं सत्य हा आता न्यायालयीन निवाड्यासाठी मोठाच वैज्ञानिक आधार ठरला आहे हे त्यावरुन लक्षात येतं. तसंच कॅन्सरसारख्या आजारात या जनुकांची भूमिका किती प्रभावी असते याचं सखोल विवेचनही यात आलेलं आहे. जनुकं, पेशी, ग्रंथी आणि डीएनए यांचा शोध, तपासणी आणि कार्य यांची माहिती शास्त्रीय पद्धतीला कुठेही फाटा न देता सहजसुंदर भाषेत करुन दिली आहे.त्यासाठी भरपूर आकृत्या दिलेल्या आहेत. त्यामुळे विषयाचा आवाका आणि आकलनाशी पटकन नाळ जुळली जाते. गर्भावस्थेपासून वयाला उतार लागतो तिथपर्यंतचा जनुकाचा प्रवास थक्क करणारा आहे. त्यातली उदाहरणे पाहिल्यानंतर नकळत स्वतःच्या अनुभवांना त्याच्याशी ताडून पाहण्याचा मोह होतो. जनुकांची भानगड नसती तर युरोपचा इतिहास थोडा वेगळा झाला असता, या वाक्याला पुष्टी देणारं रशियाच्या शेवटच्या झारचा एक मुलगा अलेक्सी याचं उदाहरण दिलं आहे. त्याचा इतिहास पाहिला की जनुकाची वारसदारी किती प्रभावी आहे याची खात्री पटते.

डॉलीप्रमाणेच बीटी वांगं आणि कापूस यासारख्या अनेक पिकांच्या निर्मितीवरुन बराच गोंधळ मधल्या काळात उडाला होता. त्याचीही माहिती यात आलेली आहे. इंग्रजी शब्दांची शब्दावली आणि टीपा पुस्तकाच्या शेवटी दिलेल्या आहेत. त्यामुळे जनुक विषयावरील हे पुस्तक संदर्भग्रंथ म्हणून मोलाचं वाटतं. मेघातून अवतरलेली डॉली, बीटी वांगं आणि मेंडलचे वाटणे भरलेली थाळी आणि पीळदार शिडी असलेल्या डीएनएनं भरलेला कटोरा, काटेरी चमच्यानं उचललेला त्यातला एक तुकडा आणि खाण्यासाठी उघडलेलं तोंड, यातून पुस्तकाच्या नावाचा उखाणा घेतल्यासारखा वाटतो. त्यामुळे आशय आणि कल्पना दाखवणारं मुखपृष्ठ आकर्षक झालं आहे.




**जेनेटिक्स कशाशी खातात?**
**डॉ. उज्ज्वला दळवी**
**किंमत २५० रुपये**
**सवलतीत १५० रुपये**

## ग्रंथपान

### तांबट - प्रल्हाद जाधव

'जाडी-भरडी चोच, आखूड शेपटी, काळ्या डोळ्यांभोवती वरुन आणि खालून पिवळ्या रंगाचं अर्धवर्तुळ, मानेखाली पोटाच्या दिशेनं उतरणारे हिरव्या-पिवळ्या रंगाचे फटकारे आणि चोचीच्या बुडातून वर आलेले मिशांसारखे केस माझ्या नजरेत भरले होते. मात्र पक्षी नेमका कोणता याचा पत्ता लागत नसल्यानं अस्वस्थ झालो होतो.'

ही अस्वस्थता आहे लेखक प्रल्हाद जाधव यांची. तिचे वर्णन केले आहे 'तांबट' या पुस्तकात. ग्रंथालीने प्रकाशित केलेले हे पुस्तक म्हणजे पक्षीकोशातील एका पक्ष्याचा कोश, तांबट नावाच्या पक्षाचा. मुंबईसारख्या शहरात एका पक्षाचे निरीक्षण इतक्या तन्मयतेने करणे, ध्यास घेतला तरच शक्य होऊ शकते याचे उदाहरण म्हणजे हे पुस्तक. लेखकाने तो ध्यास घेतला, सोबत आपल्या कुटुंबालाही त्यातही सहभागी करुन घेतले. त्यातून मग सगळेच जण या ध्यासाने भारावून गेले. त्यांच्या निरीक्षणातून वेगवेगळे पैलू सापडत गेले. त्याच्या नोंदी बारकाईने करुन ठेवल्या. त्यातून आकाराला आले 'तांबट' हे पुस्तक. अर्थातच याचा मुख्य नायक आहे तो तांबट नावाचा पक्षी. वर वर्णन केलेला पक्षी. जो त्याच्या 'टुक...टुक' या नादाने लेखकाला नादाला लावतो. त्याची झाडावरची दिनचर्या, जी सकाळच्या गायनापासून सुरु होते. मग उडणे, फांदीवर बागडणे, घरटे तयार करणे, अंड्यांचे - त्यातून जन्माला आलेल्या पिलांचे रक्षण करणे, पिलांना चोंचीने भरवणे, उडायला शिकवणे, आपल्यासारखा आवाज काढायला शिकवणे, आणि एक दिवस त्या पिलांचा जोडीदारासह नवा संसार थाटणे, असा एक नाजूक, हळुवार प्रवास सुरु होतो. लेखक भान हरपून त्या प्रवासाचा सोबती होतो. सगळ्या घटनांच्या नोंदी कुतूहलाने करत राहतो, अगदी बारकाईने. त्याची प्रचिती या पुस्तकातून येते.

प्रवासाचा मार्ग ठरलेला असला तरी प्रवासात अनेक मार्ग आपोआप भेटीला येतातच, वारकऱ्याला गावकरी भेटतात तसे. लेखक तांबट या पक्ष्याच्या निरीक्षणात रममाण झाला तरी झाडावर केवळ तांबटच मुक्कामाला येतो असे नाही. इतरही अनेक पक्षी येतात. त्यात कावळा, कोकिळा, कबूतर, चिमणी, पोपट, साळुंकी, बगळा, बुलबुल, हळद्या असे काही पक्षी लेखकाचे डोळे आपल्याकडे खिळवून ठेवण्यास त्याला भाग पाडतात. त्यांची वैशिष्ट्ये नोंद करण्याच्या मोहात पाडतात. त्यामुळे या पक्ष्यांची निरीक्षणेही तरलतेने आणि तितक्याच भावूकतेने केलेली आहेत. एक पक्षी म्हटला की इतर पक्षी जसे येतात, तसे पक्षी आपला संसार थाटतात त्या वृक्षांना वगळून कसे चालेल? पांगिरा, निंब, जांभूळ, गुलमोहर, कॅशिया, वड यांसारखे वृक्ष म्हणजे, पक्ष्यांची गावे. त्यांच्या चित्रात या गावांना वगळून कसे  चालेल? त्यांचे बहरणे, पानगळ, साल, फुले, खोडाचा रंग, त्यातली ढोली यांचीही निरीक्षणे अचूकतेने टिपलेली आहेत. प्रत्येकाची वैशिष्ट्ये उलगडून सांगितली आहेत. ती वाचताना दुर्गाबाईंच्या 'ऋतुचक्र'ची आठवण येते.

पक्षीनिरीक्षणे म्हटली की डॉ.सलीम अली आणि पक्षीकोशकार मारुती चित्तमपल्ली यांची नावे चटकन ओठावर येतात. अर्थात त्यांची तपश्चर्या फार मोठी आहे. त्यांच्या निरीक्षणांशी तुलना करता येणार नाही. हे शहरी भागातले निरीक्षण आहे. जेथे सिमेंटचीच जंगले आहेत. तरी यातली निरीक्षणे कुठेही उणेपण येऊ देत नाही. उलट प्रत्येकाला असे निरीक्षण सिमेंटच्या जगंलात राहूनही करता येऊ शकेल असा विश्वास हे पुस्तक देते. भाषाही सोपी आणि सहज आहे. त्यामुळे वाचनातला ओघ आणि उत्सुकता कायम राहिलेली आहे.  सिमेंटच्या जंगलात स्वतःचा रंग हरवलेल्या माणसाचा शुभ्र चेहरा आणि त्याच्या नजरेच्या ठिकाणी तांबट पक्षाची योजना केल्याने मुखपृष्ठ उठावदार झाले आहे. तसेच मलपृष्ठावर हाच तांबट पक्षी दाखवलेला आहे. मात्र इथे तो नजरेच्या ऐवजी कापलेल्या शुष्क खोडाच्या कडेवर विसावला असून भयग्रस्त नजरेने चोच आ करुन येणाऱ्या संकटाची चाहूल घेताना दिसतो. यातून भविष्यातील संकटाचा वेध चित्रकाराने घेतलेला दिसतो. आत अनेक रेखाटने दिली आहेत, तशी रंगीत चित्रेही दिली आहेत. त्यामुळे संदर्भात आणि सौंदर्यात भर पडलेली आहे.




**तांबट**
**प्रल्हाद जाधव**
**किंमत १५० रु.**
**सवलतीत ९० रुपये**

॥ग्रंथाली॥

## ग्रंथपान

### बुद्ध परंपरा आणि बोधिवृक्ष – हेमा साने

सम्यक् दृष्टी, सम्यक् आचार, सम्यक् वाणी, सम्यक् कृती, सम्यक् उपजीविका, स्मृती आणि समाधी यांच्याद्वारे दुःखावर मात करणे. या आठ गोष्टी म्हणजे अष्टांगिक मार्ग, असे सम्यक् म्हणजे योग्य वागणारा तो ज्ञानी, जाणकार. अर्थात ज्ञानी, सम्मासम्म बुद्ध.

मैत्री, करुणा, मुदिता, उपेक्षा या चार तत्त्वांचा आधार घेतला की जीवन सुद्य होते, सुखाचा लाभ होतो. जग अनित्य आहे, जीवन संपणार आहे ही जाणीव म्हणजे प्रज्ञा, सदाचार म्हणजे शील, मनाची समतोल अवस्था म्हणजे समाधी, हे विचार, तत्त्वज्ञान ज्याला समजले, त्याने ते आत्मसात केले, तो जाणकार म्हणजे बुद्ध झाला.

बुद्ध या संकल्पनेविषयी केलेले हे विवेचन 'बुद्ध परंपरा आणि बोधिवृक्ष' या पुस्तकात आहे. त्याच्या लेखिका आहेत हेमा साने. म्हणजेच डॉ. हेमलता साने. अध्यापन आणि संशोधन क्षेत्रातले व्यासंगी व्यक्तिमत्त्व. त्यांच्या प्रकाशित ग्रंथसंपदेची यादी बरीच मोठी आहे. त्याचाच एक भाग म्हणजे 'बुद्ध परंपरा आणि बोधिवृक्ष' हे पुस्तक होय.

पुस्तकाच्या शीर्षकावरुनच त्याच्या व्यापकतेची कल्पना यावी. त्याची विभागणी सोयीसाठी दोन भागांत केलेली आहे. पहिला भाग बुद्धचरित्र ते बौद्ध वाङमयावर दृष्टिक्षेप इथपर्यंतचा आहे. तर दुसऱ्या भागात, एकूण झालेले प्रसिद्ध बुद्धपुरुष आणि ज्या वृक्षाखाली त्यांना ज्ञान प्राप्त झाले त्या बोधिवृक्षांची माहिती दिलेली आहे.

बुद्ध म्हणजे ज्ञानी गृहस्थ. सर्वपरिचित असलेले ज्ञानी पुरुष म्हणजे गौतम बुद्ध. बुद्धत्व ही परंपरा आहे आणि बुद्धवंस या ग्रंथात अठ्ठावीस बुद्धांची परंपरा दिलेली आहे. तिच्यानुसार गौतम बुद्ध यांचा क्रमांक येतो अठ्ठाविसावा. परंतु 'ललित विस्तार' व 'महावस्तू' या ग्रंथांप्रमाणे ही संख्या शंभराच्या पुढे जात असल्याचे लेखिका नमूद करतात.त्यांनी यातील पंचवीस बुद्धांची आणि त्यांच्या बोधिवृक्षांची स्थळासहित माहिती दिलेली आहे. बुद्धत्व प्राप्त करून घेण्यासाठी साधकास ज्या भूमिका पार पाडाव्या लागतात त्यांची यादी दिलेली आहे. मुदिता, शीलपारमिता, धैर्यपारमिता, वीर्यपारमिता, ध्यानपारमिता, प्रज्ञापारमिता, दुरंगमा, अचला, साधुमती आणि धर्ममेघ या त्या पायऱ्या होत.यातील पारमिता म्हणजे काही सद्गुण प्राप्त करणे. तसेच गौतम बुद्धाच्या आयुष्यातील महत्त्वाची स्थळे, लुम्बिनी, बोधिगया, सारनाथ, कुशिनगर, श्रीवस्ती, सांक्ष्या, राजगृह, वैशाली यांचीही माहिती यात दिलेली आहे.

बोधिसत्त्व म्हणजे जगाच्या कल्याणासाठी झटणारे बुद्ध. बुद्ध स्वतः प्रतिमापूजनाच्या विरोधात होता. त्याच्या परिनिर्वाणानंतर भक्ती, आराधना, प्रतीक स्वरुपात सुरू झाली. ही प्रतीके म्हणजे पदचिन्हे, बोधिवृक्ष, वज्रासन, स्तूप, आणि त्रिरत्न म्हणजे बुद्ध,धर्म आणि संघ यांचे त्रिशूलात्मक स्वरुप. पुढे बुद्धमूर्तीचा पाया घातला गेला. त्यातील वैराचन, अक्षोभ्य, रत्नसंभव, अमिताभ आणि अमोघसिद्धी हे पाच ध्यानी बुद्ध होत. बौद्ध धर्मग्रंथ हे आगम म्हणजे त्रिपिटक आणि इतर वाङ्मय अशा दोन गटांत विभागलेले आहेत. अशी कितीतरी माहिती यात आलेली आहे.

सखोल संशोधनाच्या चिंतन आणि मननातून साकारलेला हा ग्रंथ वाचनाचा आनंद तर देतोच, शिवाय या विषयानुसार आलेली स्थळे, वृक्षे यांच्याकडे पाहण्याचा दृष्टिकोनही देतो. पावन स्थळांना भेट देण्याची लालसा निर्माण करतो. बौद्ध धर्म या विषयातली जाण वृद्धिंगत करतो. ज्ञात माहिती आणि अज्ञात माहिती यात किती अंतर असू शकते त्याचा उलगडा हे पुस्तक वाचल्यानंतर होतो. तसा हा विषय मोठा आहे. त्याची भुरळ पाश्चात्य देशानाही डावलता आलेली नाही.या विषयाच्या अभ्यासकांना हे पुस्तक गाईड म्हणून नक्कीच उपयुक्त ठरु शकेल असा विश्वास वाटतो. त्यातला सुबोधपणा हे लेखिकेचे वैशिष्ट्य म्हणावे लागेल. जवळपास पंचवीस शिल्पचित्रे यात दिलेली आहेत.त्यांचा ठळकपणा आणि स्पष्टता दृष्ट लागावी अशी आहे. बोधिवृक्षांचे रंगीत फोटो दिल्याने ते ओळखण्यात सुलभता आली आहे. मुखपृष्ठावरही बोधिवृक्ष आहे.




**बुद्ध परंपरा आणि बोधिवृक्ष**
**हेमा साने**
**किंमत १५० रुपये**
**सवलतीत ९० रुपये**

# चॅनल 4 लाइव्ह कादंबरी प्रकाशन वृत्तांत

## धनंजय गांगल

'ग्रंथाली'तर्फे प्रसिद्ध माध्यमकर्मी समीरण वाळवेकर यांनी लिहिलेल्या 'चॅनल 4 लाइव्ह' या कादंबरीचं प्रकाशन पुण्याच्या एस.एम. जोशी सभागृहात २ फेब्रुवारी २०१४ रोजी झालं. ज्येष्ठ रंगकर्मी, चित्रकर्मी डॉ. जब्बार पटेल यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या समारंभात प्रसिद्ध व्यंगचित्रकार राज ठाकरे यांनी या कादंबरीचं प्रकाशन केलं, तर प्रसिद्ध साहित्यिक अरुण साधू, ज्येष्ठ पत्रकार 'एबीपी माझा'चे संपादक राजीव खांडेकर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. या समारंभाच्या निमित्तानं हे चारही दिग्गज, प्रथमच एकत्र येत होते हे विशेष.

इलेक्ट्रॉनिक माध्यमं आणि मुद्रित माध्यमांचा पंचवीस वर्षांहूनही जास्त अनुभव घेतल्यानंतर माध्यमं आणि राजकारण, समाजकारण यांच्यावर ही कादंबरी लिहावीशी वाटल्याचं सांगून वाळवेकर यांनी आपल्या लिखाणावर आणि कलाकृतींच्या घडणीवर अरुण साधू आणि डॉ. जब्बार पटेल यांचा प्रभाव असल्याचं सांगितलं. सत्तरीच्या दशकानंतरच्या माध्यमांच्या प्रवासाचा धांडोळा घेत त्यांनी आता विविध वाहिन्यांची संख्या साडेसहाशेच्या वर आणि वृत्तवाहिन्यांची संख्या पाऊणशेच्या वर गेल्याचं सांगितलं. वार्तांकन आणि राजकीय घटनांचा वेध घेण्याच्या पद्धती बदलण्याचं सांगून ते म्हणाले, की या प्रसारमाध्यमांचं जग फारसं आपल्या साहित्यातून मांडलं गेलेलं नाही. राजकारणावर अनेक कादंबऱ्या आल्या पण सामना, सिंहासन यांसारखे प्रभावी चित्रपट अभावानंच आले.

सततची स्पर्धा आणि प्रचंड वेगाचा दबाव असल्यानं समोर दिसेल आणि ऐकू येईल त्यालाच सत्य मानून त्याचं माध्यमात रेखाटन करण्यात येतं, पण ते संपूर्ण सत्य असतंच असं नाही, असं नमूद करून वाळवेकरांनी पुढे म्हटलं की अनेकदा माध्यमकर्मींकडून राजकारणी आपल्याला हवं तेवढंच आणि हवं तसंच दाखवून घेण्याचा प्रयत्न करतात. सत्य अनेकदा वेगळंच असू शकतं. 'चॅनल 4 लाइव्ह' ही कादंबरी वास्तवाचा आभास निर्माण करणारी आणि संपूर्ण काल्पनिक आहे. त्यातल्या व्यक्तिरेखांशी साधर्म्य सांगणारे अनेकजण, अनेक नेते, व्यक्तिमत्त्व प्रत्यक्षात दिसले, तरी त्या प्रवृत्तींचं चित्रण कादंबरीत परावर्तित होतं, ते खरं किंवा वास्तवाधारित नसतं. अनेक वर्षं माध्यमांद्वारे राजकारणाचं चित्रण करताना मनावर उमटलेल्या प्रतिमांची ती एक सरमिसळ असते.

या कादंबरीचं स्वरूप हे लोकशाहीच्या चार मुख्य स्तंभांच्या चित्रणाशी निगडित असल्याचं सांगून ते म्हणाले की या चारही स्तंभांमध्ये खुर्ची, सत्ता आणि लालसेची जीवघेणी स्पर्धा दिसू लागली आहे. खुर्चीचा उपभोग घेणारा सत्ताधीश या कादंबरीच्या मुखपृष्ठावर चित्रकार चंद्रमोहन कुलकर्णी यांनी रेखाटल्याचं वाळवेकर यांनी स्पष्ट केलं. चंद्रमोहन यांच्या 'माणूस आणि खुर्ची' या मालिकेतून हे चित्र घेण्यात आल्याचंही त्यांनी सांगितलं. सत्ताकारण आणि राजकारण सर्वच माध्यमकर्मींना समजतं किंवा त्याचं आकलन पूर्णपणे होतंच, असा आपला मुळीच दावा नसल्याचं सांगून ते म्हणाले की माध्यमकर्मींना इतर कोणाहीपेक्षा हे जग जवळून बघता येण्याची संधी मिळते, त्यामुळे इतर कलाप्रकारांमध्ये काही सृजनशील कलाकृती घडवताना हे अनुभव समृद्ध करतात. आपले वडील दिवंगत भावगीत गायक दत्ता वाळवेकर यांचा आणि पत्नी डॉ. वर्षा यांचाही या कादंबरी लेखनाच्या वाटचालीत मोलाचा वाटा असल्याचं त्यांनी नमूद केलं.

काहीशा पटकथेच्या अंगानं जाणाऱ्या या कादंबरीत माध्यमांमध्ये काम करणाऱ्यांच्या व्यक्तिगत आयुष्यातील चढउतार, निराशेचे क्षण, भावनिक आंदोलनं, चीड यांचं चित्रण आल्याचं सांगून वाळवेकर म्हणाले, की सत्तरीच्या दशकात आलेल्या 'सिंहासन' आणि 'मुंबई दिनांक'पेक्षा या कादंबरीतील काळ, राजकारणाची पद्धत आणि इलेक्ट्रॉनिक माध्यमं यांचं स्वरूप फार पुढे गेलेलं, बदललेलं आणि दाहक आहे. त्यामुळे सारे संदर्भच बदललेले आहेत. कॅमेऱ्यांच्या मागे घडत असलेल्या गोष्टींचं अभावानंच येणारं चित्रणही या कादंबरीत दिसेल आणि ते उत्कंठावर्धक, न अनुभवलेलं असेल.

यावेळी बोलताना राजीव खांडेकर म्हणाले, की वाळवेकर यांच्या या कादंबरीची, साधूंच्या सिंहासनशी अजिबात तुलना करता कामा नये. कारण १९९०च्या जागतिकीकरणानंतर आपलं आयुष्य, अर्थकारण, राजकारणच बदलून गेलं. या साऱ्याचं चित्रण करणारी पत्रकारिता खूप पुढे गेली, ग्लॅमरस झाली, पण पूर्वीची

प्रतिष्ठा हरवून बसली. पूर्वी बातम्या मिळवणं, छापणं यासाठी सोयीसुविधा नव्हत्या. पण आज माहिती मिळवणं, दाखवणं खूप सोपं करणारं तंत्रज्ञान उपलब्ध आहे, पण समाधान मात्र माध्यमांमध्ये काम करणाऱ्यांना मिळत नाही. पूर्वीचे राजकारणी थोड्या टीकेनं अस्वस्थ व्हायचे, आताचे निगरगट्ट झाले आहेत. लिहिणाऱ्यांच्या नैतिकतेवरही प्रश्नचिन्ह निर्माण झालं आहे. या साऱ्या बदलांचं उत्तम चित्रण वाळवेकरांच्या या कादंबरीत आलं आहे. कोणत्याही कादंबरीतून या दुनियेचं चित्रण आलेलं नव्हतं. आपले पत्रकार आणि राजकारणी यांच्यातील संबंधांचं वर्णनही वेधक पद्धतीनं आलं आहे. वाळवेकरांनी स्वत:च्या अनेक 'फँटसीज' या कादंबरीत उतरवल्या आहेत. त्यांनी माध्यमांचं बरंच जग बघितलेलं आहे, त्यामुळे काल्पनिक असलं तरी हे चित्रण रंजक झालं आहे. कादंबरीचा नायक जरी अखेरीस स्वार्थीपणे व्यवस्थेचा भाग बनला तरी सगळंच काही नैराश्यवादी नाही, त्यातूनही काही चांगलं घडू शकतं, हा आशावाद बाळगून तटस्थपणे माध्यमकर्मींनी काम केलं पाहिजे, असंही खांडेकरांनी सांगितलं.

एका वेगळ्या विश्वाचं दर्शन या कादंबरीतून धाडसानं घडवल्याबद्दल वाळवेकर यांचं अभिनंदन करून अरुण साधू म्हणाले की इलेक्ट्रॉनिक मीडिया आणि राजकारणावरची ही कादंबरी वाचताना मला जाणवलं की सिंहासन लिहिताना मी क्राइम रिपोर्टर होतो. राजकीय जग मी तितकं बघितलं नव्हतं. ही कादंबरी वाचताना मला चक्क भोवळ आली इतकं हे राजकारण आणि माध्यमं धक्कदायक आणि भीतिदायकरीत्या बदलली आहेत. मीडिया हा पहारेकरी नाही तर मध्यस्थ असला पाहिजे, जनतेच्या अडचणी सोडवण्यासाठी. तसंच सत्ताधाऱ्यांवर त्यानं लक्ष ठेवलं पाहिजे आणि जनतेला अलिप्तपणे त्याची माहिती दिली पाहिजे अशी अपेक्षा असते. पण आताची माध्यमं, तशी राहिली नाहीत. काही माध्यमांनी 'पेड न्यूज' वाढवली आणि जोपासलेली पाहायला मिळणं क्लेशकारक आहे. आज मीडियाची ताकद प्रचंड वाढून तो 'डिक्टेटर' होऊन आपला 'अजेंडा' ठरवू लागला आहे. त्याला टाळता येणं शक्य नाही. आता माध्यमं राजकारणात ढवळाढवळ करू लागली आहेत. मीडियामुळे हुकूमशाही प्रवृत्तीला अधिकाधिक उठाव मिळतोय याबाबत चिंता करण्याची वेळ आली आहे. नैतिकतेची संहिता राजकारणाप्रमाणेच मीडियानं स्वयंनियंत्रणानं आपल्या वागण्यावर आणणं गरजेचं आहे असंही साधू म्हणाले.

पुस्तकाचं प्रकाशन करून राज ठाकरे यांनी आपले आणि पत्रकारांचे जिव्हाळ्याचे संबंध असल्याचं सांगितलं आणि ते म्हणाले, समीरण वाळवेकरांची मागील काही वर्षांत जेव्हा जेव्हा भेट झाली तेव्हा त्यांच्या आतली चीड आणि राग सतत जाणवत होता. ते व्यवस्थेबद्दलचं नैराश्य कदाचित या कादंबरीत आलं असावं. पण कादंबरी लिहिणं हे खरंच अवघड आहे. कादंबरीकार हा वेगळाच विचार करतो. रोजच्या घटनांतून त्याला वेगळा कोन दिसतो आणि तो कथा रंगवत जातो. या कल्पना कशा सुचतात हे सांगता येत नाही.

आपणही आजही 'सिंहासन' चित्रपट पाहतो, कारण तशी कलाकृती जन्मालाच आली नाही. आज या कार्यक्रमात विजय तेंडुलकर इथं असायला हवे होते. त्यांनी आपल्या पटकथा-संवादांच्या रूपानं तो चित्रपट सजवला. उद्या वाळवेकर यांच्या कादंबरीवरही पुढचं 'सिंहासन' चित्रपट निघेल अशी मला आशा आहे, असंही राज ठाकरे यांनी सांगितलं.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून बोलताना ज्येष्ठ रंगकर्मी-चित्रकर्मी डॉ. जब्बार पटेल यांनी साभिनय तुफान टोलेबाजी केली. ते म्हणाले, की या कादंबरीचं स्वरूप जरी काल्पनिक आणि फँटसीचं असलं तरी ते वेधक आणि कोलाजसारखं, थ्रिलरसारखं सुद्धा आहे. त्याला प्रचंड गती आहे.

सध्या माध्यमांचं स्वरूप 'इरिटेटिंग' असल्याचं सांगून डॉ. पटेल म्हणाले की स्पर्धेच्या या युगात कुरघोडीचं राजकारणही माध्यमात घुसलंय, त्यात प्रादेशिकतेचं स्वतंत्र अस्तित्व दिसतं. आजच्या वाहिनीचे 'अँकर' प्रचंड आक्रमक, आक्रस्ताळ दिसतात, समोरच्याला दमात घेतात. मराठी वाहिन्यांमध्ये सुद्धा हे लोण पसरलं असल्याचं दिसतं. हा चेष्टचा विषय होतो. हा कोणता आवाज, कोणती पट्टी, या माध्यमांनी गाठलीय हे कळत नाही. प्रत्येक माध्यमानं एक शिस्तीची चौकट बाळगणं अत्यावश्यक आहे. ही इलेक्ट्रॉनिक प्रसारमाध्यमं 'डिग्निटी' हरवून बसली आहेत. साधूंच्या कादंबऱ्यांपेक्षा आजचं राजकारण फारसं वेगळं नाही. या राजकारण्यांना तितकंच असुरक्षित वाटतं. त्याचं उत्तम चित्रण या कादंबरीत आलंय.

प्रसिद्धीमाध्यमांनी ही डिग्निटी कधीच सोडता कामा नये असं सांगून डॉ. पटेल म्हणाले की या माध्यमांनी आक्रस्ताळेपणामुळे लोकशाहीला धक्का न लागण्याची काळजी घेतली पाहिजे. समीरण वाळवेकरांच्या कादंबरीतून माध्यमांचं वास्तव चित्रण दिसतं, जे आपल्याला विचार करायला प्रवृत्त करतं. चौथ्या स्तंभाचं काम या कादंबरीद्वारे पुढे आलं, ते निश्चित वाचावं असं आहे, असंही त्यांनी सांगितलं.

'ग्रंथाली'तर्फे या कार्यक्रमात पद्मभूषण देशपांडे यांनी प्रास्ताविक केलं. धनंजय गांगल यांनी सूत्रसंचालन केलं. बुकगंगा डॉट कॉमतर्फे या पुस्तकाच्या 'इ-आवृत्ती'चं सुद्धा प्रकाशन करण्यात आलं.

**धनंजय गांगल**
dhanjay.gangal@gmail.com

# गुन्हेगारीचा ग्लॅमरस चेहरा

**अपर्णा पाटील**

सौंदर्यस्पर्धेत भाग घ्यायचा आणि अभिनय करायचा अशी स्वप्नं पाहणाऱ्या मुलींची संख्या जगात कमी नाही. कॅटवॉक, रॅम्प यांचं कमालीचं आकर्षण आजच्या पिढीला आहे. अँजी आणि सिमॉन याही त्यांच्यापैकीच. त्यांच्या मॉडेलिंगच्या प्रवासाची सुरुवात ग्लॅमरस ठरली, पण शेवट मात्र तुरुंगात झाला.

.....

शरीराचे उभार दाखवत, थेट तुमच्या नजरेला नजर देत, चेहऱ्यावर निरागसतेचे भाव असणाऱ्या मॉडेल्स हे पुरुषांचं जग व्यापून टाकतात. अँजी आणि सिमॉनसारख्या अनेकजणी असतील ज्यांनी सेक्सिएस्ट मॉडेल म्हणून नाव कमावलं, पण या दोघींच्या ग्लॅमरस चेहऱ्यामागचा गुन्हेगार उघड होताच काही काळ खळबळ माजली.

कोलंबियातील बारंक्विलात वाढलेली अँजी व्हॅलेन्शिया ही कधी काळी क्वीन ऑफ कॉफी म्हणून ओळखली जात होती. एकविसाव्या वर्षी एक नावाजलेली मॉडेल म्हणून तिचं नाव लोकांच्या परिचयाचं झालं होतं. २०००मध्ये मिस कोलंबिया होण्याचा मान तिला मिळाला होता. त्या एका दिवसानं तिचं आयुष्यच बदललं होतं. मेक्सिकोसह अनेक देशांचे अंतर्वस्त्रांच्या जाहिरातींचे करार तिच्याकडे चालत आले. सौंदयस्पर्धांमध्ये यशस्वी झाल्यानंतर चित्रपटात येण्यास ती उत्सुक होती. अर्थात वाट्याला अभिनयाचे प्रसंग कमी आले, पण मॉडेल म्हणून ती लोकप्रिय झाली.

एक दिवस अचानक तिच्या आयुष्याला मोठा ब्रेक लागला. तो मे २०१०मध्ये तिला अर्जेंटिनामध्ये ड्रग्ज तस्करीच्या आरोपाखाली अटक करण्यात आली तेव्हा. या अटकेच्या एक वर्ष आधी इंटरपोलनं तिच्याविरोधात अटक वॉरंट काढलं होतं. ब्युनोज एरिजहून मेक्सिकोतील विमानतळावर एका एकवीस वर्षांच्या महिलेला अटक झाली होती. तिच्याकडे पंचावन्न किलो कोकेन सापडलं होतं. त्यावेळी त्या ड्रग्ज तस्करीत अँजीचा हात असल्याचं उघड झालं होतं. त्यामुळे तिच्याविरोधात ते वॉरंट निघालं होतं. तेव्हापासून ती अर्जेंटिनातील पोलिसांना चकवा देत होती.

पोलिसांपासून लपून राहण्याच्या काळात अँजी आपलं फेसबुक पेज अपडेट करत होती. याच फेसबुकवरून तिनं, सीएनएनला



अँजी व्हॅलेन्शिया

आपला या प्रकरणात काहीही हात नसल्याचं लिहिलं होतं. मीडिया एखाद्या निष्पाप व्यक्तीचं आयुष्य कसं उद्ध्वस्त करू शकतं, असा प्रश्न विचारून आपल्याविषयीच्या चुकीच्या माहितीनं आपण दुःखी झाल्याचं त्यात म्हटलं होतं. त्याही काळात आपल्याला अभिनय करून रूपेरी पडदा गाजवायचाय, असं ती सतत म्हणत होती. प्रत्यक्षात तिला आपला चेहरा लपवत राहावं लागत होतं. आपण कोलंबियन आहोत, यामुळेच आपल्याला पोलिसांनी अशा प्रकरणात अडकवायचा घाट घातलाय, असं ती म्हणत होती.

नोव्हेंबर २०१३ मध्ये तिला अटक करण्यात आली. तिची अटक ही आंतरराष्ट्रीय स्तरावरचं मोठं स्कँडल ठरलं. क्वीन ऑफ कॉफी ही क्वीन ऑफ कोकेन ठरल्याचे मथळे देऊन हे प्रकरण सनसनाटी केलं गेलं. अर्थात एखाद्या मॉडेलला ड्रग्ज तस्करी प्रकरणात अटक होणं, ही गोष्टच खळबळजनक होती. यामुळे तसं होणं साहजिकच होतं. तिच्याबरोबर चार पुरुष आणि दोन महिलांनाही त्यावेळी अटक झाली होती. अर्जेंटिना प्रशासनानं तिच्यावर दक्षिण अमेरिका आणि युरोपात फॅशन मॉडेल्सच्या मदतीनं ड्रग्ज स्मगलिंग करत असल्याचा आरोप लावला. अटक झालेल्यांमध्ये तिचा प्रियकर



सिडनी विमानतळावर अटक झालेली सिमॉन फॅरो

आणि त्याचा काका असे दोघे होते. अँजीला सहा वर्ष आणि आठ महिन्यांची शिक्षा ठोठावण्यात आली आहे. तिचा प्रियकर निकोलस आणि त्याचे काका मॉनरॉय यांनाही तिच्याइतकीच शिक्षा सुनावण्यात आली.

गेल्या वर्षी सप्टेंबरमध्ये अँजीला अर्जेंटिनानं कोलंबिया प्रशासनाच्या हवाली केलंय. तिला अर्जेंटिनात परतण्यास बंदी घातली आहे. कोलंबियात परतलेल्या अँजीनं या वर्षी फेब्रुवारी महिन्यात पहिल्यांदाच मुलाखत दिली. या मुलाखतीत आपल्यावर केलेले आरोप आणि आपली अटक हा मोठा फार्स असल्याचं म्हटलं आहे. तिच्या मते, ती निष्पाप आहे. माझ्या प्रियकरानं चूक केली आणि मी त्याच्या चुकांचे परिणाम भोगतेय. माझं त्याच्यावर प्रेम आहे, कारण मला त्याच्यासारखा कोणी कधी भेटला नाही.

अर्जेंटिनाहून मेक्सिकोला जाणं ही तिच्यासाठी मोठी चूक होती, असं ती सांगते. पण अँजीची ही काही पहिली चूक नाहीये, ज्याचा तिला पश्चात्ताप होतोय. त्यामुळे आज तिच्यावर कोणी विश्वास ठेवण्याच्या मनस्थितीत नाहीये.

ज्यावेळी तिने क्वीन ऑफ कॉफी ही कोलंबियाची सौंदर्यस्पर्धा जिंकली तेव्हाही तिनं नियम धुडकावून लावले होते. ही स्पर्धा अविवाहित महिलांसाठी असते. पण आपलं लग्न झाल्याचं तिनं लपवून ठेवलं. स्पर्धा तर जिंकली, पण दोनच दिवसांत ती विवाहित असल्याचं उघड झालं. तिचं लग्न एका मेक्सिकन ड्रग तस्कराशी झालेलं होतं. त्यामुळे तिचा क्वीन ऑफ कॉफी हा किताब काढून घेण्यात आला होता.

त्यावेळी दिलेल्या मुलाखतीत, आपल्या चंचल स्वभावामुळे आपल्या आयुष्यात खूप वाईट गोष्टी घडतात, असं तिनं म्हटलं होतं. या कबुलीमुळे तिच्या ताज्या मुलाखतीतल्या निष्पाप असल्याच्या दाव्यावर कोणी विश्वास ठेवायला तयार नाही.

अँजी जे काही बोलली, त्यापेक्षा वास्तव निराळं आहे. ब्रिटनमध्ये कोकेन स्मगल करणाऱ्या महिलांच्या गँगची ती प्रमुख आहे. खरं तर गँग म्हटलं, की विघातकी, शस्त्रधारी आणि खतरनाक इरादे असलेली मंडळी असं रूप आपल्या डोळ्यांसमोर येतं. पण अँजीच्या गँगमध्ये फक्त मॉडेलिंगमधल्या सुंदर महिलांचा समावेश आहे. त्यांच्याकडचं घायाळ करणारं सौंदर्य हेच त्यांचं शस्त्र असतं. या मॉडेल्स दक्षिण अमेरिकेतून युरोपात ड्रग्ज पोचवण्याचं काम करतात.

द मॉन्स्टर नावानं मेक्सिकोत ड्रग्ज धंद्यात कुख्यात ठरलेल्या व्यक्तीशी अँजीचं लग्न झालं होतं. दोघं विभक्त झाले तरी त्याच्याप्रमाणे स्वतःची कोकेन स्मगलिंगची गँग तिनं सुरू केली. क्वीन ऑफ कॉफी हा किताब काढून घेतल्यानंतर अँजीनं कोलंबिया सोडून अर्जेंटिनाला राहायला जाणं पसंत केलं. तिथेच तिनं स्वतःचं ड्रग्जचं नेटवर्क पसरवायला सुरुवात केली.

तिच्या गँगमध्ये असलेल्या महिलांना, लोकांच्या डोळ्यांत येऊ नये असं वागावं, अशी अपेक्षा बजावून सांगितली जायची. एंजल नावानं संबोधल्या जाणाऱ्या प्रत्येक मॉडेलला ड्रग्ज पोचवण्याच्या प्रत्येक प्रवासासाठी तीन हजार ते पाच हजार पाउंड दिले जायचे. विशेष म्हणजे तिच्या गँगमधली एक तरी महिला कोकेन घेऊन दिवसाला एकदा तरी प्रवास करायची. कँकनमधल्या मेक्सिकन कॅरिबियन रिसॉर्टवर या महिला अर्जेंटिनाहून विमानानं जात. मग तिथून त्यांनी नेलेले ड्रग्ज युरोपात पोहचवले जात.

हे सगळं सुरू असतानाच अर्जेंटिनाच्या ब्युनोज एरिजच्या विमानतळावर एका महिलेला पंचावन्न किलो कोकेन नेत असताना पकडण्यात आलं. ती महिला एकवीस वर्षांची होती. पोलीस तिची

बारा तास चौकशी करत होते. तिनं आपल्याकडचं कोकेन दडवून ठेवलेलं नव्हतं. तर ते चक्क तिच्या सुटकेसमध्ये होतं. तुला विमानतळावर कोणीही अडवणार नाही, असं सांगण्यात आलं होतं, असं तिनं पोलिसांना सांगितलं. याचाच अर्थ असा, की विमानतळावरचे कर्मचारी, अधिकारी यांच्याशीही अँजीने संधान साधलेलं होतं.

त्या महिलेला अटक झालीय हे समजताच अँजी ब्युनोज एरिजमधल्या तारांकित हॉटेलमधून गायब झाली. पण त्याचवेळी तिच्यावर ड्रग्ज तस्करीप्रकरणी अटक वॉरंट काढण्यात आलं. मेक्सिकोमध्ये ती आपल्या पॉमेरियन कुत्र्यासह राहत होती. त्या कुत्र्याच्या रजिस्ट्रेशन पेपरवरील पत्त्यावर पोलिस पोचले, पण ती तिथूनही पळाली होती. पाच ते सहा महिने ती पोलिसांना गुंगारा देत राहिली. अखेर २७ मे २०१० रोजी एका स्थानिक हॉस्टेलमधून तिला अटक करण्यात आली. त्याही पत्त्यावर ती वेगळ्याच नावानं राहत होती. तिला अटक झाली तेव्हा जगातली सगळ्यात मोठी ड्रग्ज तस्करी करणारी गँग चालवणारी महिला म्हणून तिचं नाव घेतलं गेलं.

एरवी मॉडेलिंग आणि कॅटवॉक अशा गोष्टीविषयी प्रचंड आकर्षण वाटत असतं. पण या व्यवसायाच्या नावाखाली अनेक गैरव्यवहार चालवले जातात, हे उघड करणारं हे पहिलं स्कँडल होतं. अँजीच्या अटकेचं समर्थन किंवा इन्कार या सगळ्या गोष्टी जरी बाजूला ठेवल्या तरी अनेक मॉडेल्स पैशाच्या मोहानं ड्रग तस्करीसारखा गुन्हा करण्यास सरसावल्या आहेत.

मेक्सिको आणि ड्रग्ज या गोष्टी वेगवेगळ्या करता येत नाही. या देशात ड्रग्जमुळे किती रक्तपात झालाय, किती गँग तयार झाल्या, त्याची गणती नाही. पण अँजीच्या अटकेनं ड्रग तस्करीचा धंदा ग्लॅमरस क्षेत्रात कसा सहज शिरलाय, हे उघड करणारा पुरावा ठरला. अँजी मात्र आपण आंधळ्या प्रेमाचा बळी ठरल्याचं सांगते आहे. तिच्या म्हणण्यात तथ्य आहे, यावर कोणीही विश्वास ठेवणार नाही. त्याला कारण म्हणजे सिमॉन फॅरो. तिचाही दावा असाच काहीसा आहे.

सिमॉन फॅरो या स्विमसूट मॉडेलला दोन वर्षांपूर्वी ऑस्ट्रेलियामधील सिडनीत अटक झाली होती. हॉलिवूडमध्ये स्वतःचं अपार्टमेंट असणारी सिमॉन ही बिकिनी आणि पेंटहाऊसची मॉडेल म्हणून लोकप्रिय ठरली होती. सिमॉन स्टार नावानं लोकप्रिय झालेल्या सिमॉनची स्वतःच्या मालकीची कंपनी होती. कंपनीच्या नावानं ती ऑस्ट्रेलियात अनेकदा कुरिअर पाठवत असे, जेव्हा मोठ्या प्रमाणावर अशी पार्सलं पाठवली गेली तेव्हा तिच्यावर नजर ठेवण्यात आली. सिमॉन या पार्सलमधून ड्रग्ज पाठवत असल्याचं उघड झालं होतं. त्यामुळे तिच्याविरोधात वॉरंट काढण्यात आलं. अमेरिकेतल्या तिच्या घराची झडती घेण्यात आली. सिमॉन आंघोळीसाठी वापरल्या जाणाऱ्या बाथ सॉल्टच्या पिशव्यांमध्ये ड्रग्ज ठेवून तस्करी करत असे. त्यातल्या काही पिशव्या तिच्या घरात सापडल्या. पोलिसांनी तिला संशयावरून अटक केली. तगडी रक्कम देत पण सिमॉनला जामीनावर सोडवून घेण्यात आलं. ती रक्कम कोणी देऊ केली, याची खरी माहिती दिली गेली नाही. त्यावेळच्या तिच्या प्रियकरानं ती दिली असं सांगण्यात आलं तरी ते खरं नाहीये.

कोर्टात गुन्हा सिद्ध झाला तर आपल्याला पंचवीस वर्षं कैदेत काढावी लागतील म्हणून जामीनावर सुटलेल्या सिमॉननं ऑस्ट्रेलियाला पळ काढला. कधी काळी जगातील सगळ्यात सेक्सिएस्ट मॉडेल म्हणून मिरवणारी सिमॉन अगदी स्वस्तातल्या खोल्यांत नाव बदलून राहायला लागली.

आठ महिन्यांच्या पोलिसांच्या ससेमिऱ्यांनंतर ती हाती लागली. तिला जेव्हा अटक केली तेव्हा तिनंही अँजीप्रमाणे आपण बळीचा बकरा ठरल्याचं पत्रकारांना सांगितलं. इतकंच नाही, तर आपल्या जीवाला धोका असल्यामुळे आपण लपूनछपून राहत असल्याचा कांगावा केला. सिमॉन एकोणीस खोट्या नावाने वावरत असल्याचं पोलिसांना आढळून आलं होतं.


तिच्या अटकेनंतर, हॉलिवूडमधल्या शरीरविक्रय करणाऱ्या मॉडेल्समध्ये तिचा समावेश होता, असंही उघड झालं. अनेक राजकीय नेते तिच्या क्लायंटमध्ये असल्याचंही स्पष्ट झालं. त्यात अर्नोल्ड श्वेत्झेनेगरसारख्या अभिनेता आणि राजकीय नेत्याचा समावेश होता.

विशेष म्हणजे सिमॉन ज्या अंडरवर्ल्डमध्ये वावरत होती, तेच तिचा खातमा करतील याची भीती आहे. शिवाय तिच्या अटकेमागेही काही संशयास्पद असण्याचा अंदाज आहे. सध्या सिमॉन तुरुंगात असली तरी तिचे सुटकेचे प्रयत्न सुरू आहेत. पण ती सगळ्याची नाव उघड करेल, त्यामुळे तिला जेलमध्ये राहू दे, असा पवित्रा तिच्या कधीकाळच्या क्लायंटनं घेतला असणार. अर्थात, यात खूप काही रहस्य दडलं असलं तरी ते काय आहे, हे वेगळं सांगण्याची गरज नाही.

सध्या तुरुंगात असलेली सिमॉन आणि अर्जेंटिनातून सुटका झालेला अँजी या दोघींच्या निमित्तानं, ग्लॅमरच्या जगात मॉडेलच्या शरीरापेक्षाही खळबळ उडवून देणारं बरंच काही असतं, हे उघड झालंय. तरीही संघटित गुन्हेगारीचा विळखा असा काही घट्ट बसलाय, की त्यात नवं काय असं म्हणत याकडेही दुर्लक्ष होत आहे.

**अपर्णा पाटील**
प्लॉट नं. ६०० (१०१),
गिरिजा अपार्टमेंट, खेर सेक्शन,
अंबरनाथ (पूर्व) ४२१५०१
aparna.patil1@gmail.com

## प्रसिद्ध झाले!




**प्रज्ञासूर्य डॉ. आंबेडकर**

**समग्र वैचारिक चरित्र**

**डॉ. नरेंद्र जाधव**

महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे प्रस्तुत चरित्र हे पारंपरिक नसून ते 'वैचारिक' स्वरूपाचे चरित्र आहे. वैचारिक चरित्र अशा अर्थाने की, डॉ. आंबेडकरांच्या दैनंदिन भौतिक जीवनातले सारे चढउतार, सारे फेरबदल तपशिलांसह मांडण्याऐवजी येथे प्राधान्य देण्यात आले आहे ते बाबासाहेबांच्या विचारांना, त्यांच्या बौद्धिक जडणघडणीला, राजकीय संघर्ष करताना त्यांनी वेळोवेळी आखलेल्या वैचारिक रणनीतीला, अभ्यासपूर्ण भाषणांतून त्यांनी वेळोवेळी घेतलेल्या भूमिकेला आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे त्यांनी लिहिलेल्या २२ ग्रंथांमधून व्यक्त झालेल्या प्रकांडपांडित्याला. प्रज्ञासूर्य डॉ. आंबेडकरांना खऱ्या अर्थाने समजून घ्यायचे असेल तर अशा प्रकारच्या 'वैचारिक चरित्रा'ला पर्याय नाही.

**मूळ किंमत ७५० रु. सवलतीत ६०० रु.**

## भगवान इंगळे यांच्या पुस्तकांच्या सुधारीत आवृत्त्या




आयुष्याच्या विविध टप्प्यांवर मला जे मित्र भेटले, त्यांच्या जीवनातील भयाण वास्तवामुळे अस्वस्थ झालो. काही वेळा प्रभावित झालो. अशा भिडूंची ही जीवनकहाणी!
(लेखकाच्या मनोगतातून)

# भिडू

**मूळ किंमत २५० रु.**
**सवलतीत १५० रु.**

मेलेल्या जनावरांचं कातडं चुना लावून, साल-हिरड्याच्या कसात टाकून महिना-सव्वा महिना ऊर फुटेस्तो घाम गाळून रंगविल्यास मऊ, मुलायम, टिकाऊ होतं आणि मोटा, सोंडा, चाबूक, गोफण, आसूड, बूट-चपलांच्या कामी येतं... कातडी कमावण्याचं हे काम करतो तो ढोर समाज. दुसरीकडे ढोर समाजातला एक गट शिकला आणि स्थिर झाला. अशाच एका तरुणाची ही प्रातिनिधिक कहाणी.




# ढोर

**मूळ किंमत ३०० रु.**
**सवलतीत १८० रु.**

# वृत्तपत्रे, पत्रकार आणि शासन

**भारत गजेंद्रगडकर**

समाजात वृत्तपत्रांचे खूप मोठे स्थान आहे. लोकशाहीचा हा चौथा खांब आता खऱ्या अर्थाने कोणत्या स्थितीत आहे हा वेगळा विषय आहे. शासकीय जाहिराती हा वृत्तपत्रांच्या स्थिरतेचा प्रमुख आर्थिक आधार असतो. त्यासाठी शासनाचे धोरणही असते. कोणतेही वृत्तपत्र शासनाच्या जाहिरातीसाठी असलेल्या मान्यता यादीत समाविष्ट करायचे असल्यास त्याला वृत्तपत्र निघाल्यानंतर किमान एक वर्षाने अर्ज करता येतो व त्यानंतर शासनाने त्याच्या खपाची खात्री करून घेऊन, त्या त्या वर्गवारीत, यादीत घ्यायचे किंवा नाही याचा निर्णय करायचा असतो. पण राज्यकर्ते त्या त्या काळात हे निकष धाब्यावर बसवून, मनमानी करून त्यांच्या मर्जीतील वृत्तपत्रांना केव्हाही शासनमान्यता देतात, त्यांच्या जाहिरातीचा दरही त्यांच्याच मर्जीने ठरतो.

दै. मराठवाडा हे औरंगाबाद विभागातील मराठवाड्यातील सर्वात जुने वृत्तपत्र होते. तेथे खूप वर्षांनी दै. लोकमत सुरु झाले. वर्षानुवर्षे ध्येयवादाने 'मराठवाडा' चालत होते. त्यांना त्यावेळी प्रत्येक कॉलम सेंटिमीटरला अवघा १६ रु. दर होता. पण 'लोकमत' सुरु झाले व त्याचा प्रारंभच २६ रु. दराने झाला होता. या सर्व अर्थकारणाचा परिणाम वृत्तपत्रावर किती होतो हे त्याच्याशी निगडित असणाऱ्यांना जास्त चांगले माहीत आहे. एकाच मालकाची चार-चार वृत्तपत्रे, साप्ताहिके असतात, त्यात एकच मजकूर असतो, त्यांचे खपाचे आकडेही खोटे असतात, पण तरीही अशी वृत्तपत्रे, ती नियमित निघत नसतानाही, शासनमान्य यादीत जाहिराती मिळवत असतात. खपाचे आकडे देताना त्यांनी दाखल केलेले चार्टर्ड अकाउंटंटचे प्रमाणपत्र खोटे असते त्याची चौकशी व्हावी असा ठरावच काही वर्षांपूर्वी शासननियुक्त अधीस्वीकृती समितीने केला होता. पण त्याची कार्यवाही काही झाली नाही, कारण या वृत्तपत्रांना असणारा राजकीय वरदहस्त. वृत्तपत्राची जाहिरातीसाठी जी वर्गवारी केलेली असते ती त्याच्या खपाच्या आकड्यावरुनच असते. एखाद्या वृत्तपत्राची किंमत अवघा एक रुपया असेल व त्याने २० हजार खप दर्शवलेला असेल तर त्याचे खपाचे रोज २० हजारप्रमाणे महिन्याचे ६ लाख व वर्षाचे ७२ लाख रुपये उत्पन्न केवळ वृत्तपत्र विक्रीतून होते असा त्याचा अर्थ आहे. याशिवाय शासकीय जाहिराती, खाजगी जाहिरातींचे उत्पन्न वेगळे. पण हे सर्व इन्कम टॅक्स खात्याकडे दाखवले जातच नाही. त्यामुळेच जाहिरातीच्या खपाचे आकडे चार्टर्ड अकाउंटंटच्या प्रमाणपत्रानुसार न ठरवता ते संपादकाने इन्कम टॅक्स खात्याकडे दिलेल्या उत्पन्नाच्या आकड्यावर ठरावे असा कायदा केला व या आकडेवारीवर जाहिराती दिल्या तरच खपाची खरी आकडेवारी कळेल व बोगस आकडेवारी दाखवणाऱ्यांना जो जाहिरातींचा मलिदा मिळतो तो खऱ्या गरजू वृत्तपत्रांना मिळू शकेल.

या अनुषंगाने मी बऱ्याच वर्षापूर्वी दै. महानगर, औरंगाबाद आवृत्तीत दोन लेख लिहिले होते. त्यात या सर्व प्रश्नांचा सांगोपांग विचार मांडून उदाहरणेही दिली होती. सध्या विविध जिल्हा आवृत्यांच्या प्रकाराने केवळ ४-८ पाने बदलून त्या त्या जिल्हा, विभागाच्या जाहिराती मिळवण्याच्या या प्रयत्नात वाचकाला कोणतेही वृत्तपत्र (काही अपवाद वगळता) घेतले तरी राज्याचे पूर्ण चित्र उभे राहील अशा बातम्याच वाचायला मिळत नाहीत. यासाठी अशा आवृत्यांच्या जाहिराती बंद करणे, त्यांना स्वतंत्र वृत्तपत्र म्हणून मान्यता न देणे हे शासन करू शकते.

वृत्तपत्राची माझ्या दृष्टीने चार गटांत वर्गवारी होते. जिल्हा पातळीवरचे दैनिक, विभागीय पातळीवरचे, राज्य पातळीवरचे आणि देश पातळीवरचे. पूर्वी वृत्तपत्रांच्या आवृत्त्या नसत. त्यामुळे राज्य वा विभागीय पातळीवरचे एखादे जरी दैनिक घेतले तरी त्यात राज्यातील प्रमुख बातम्या वाचायला मिळत. काळ बदलत गेला तशी वृत्तपत्रांची नियतही बदलत गेली. सुरुवातीला विभागीय पातळीवरच्या दैनिकांनी जिल्हानिहाय आवृत्त्या काढून त्यात चार पाने त्या त्या जिल्ह्यातील बातम्यांसाठी राखीव ठेवायला प्रारंभ केला. नंतर राज्य पातळीवर हेच लोण सुरु झाले व आता तर आपण नेमक्या कशासाठी या आवृत्त्या काढल्या त्याचा उद्देश ही वृत्तपत्रे विसरली आहेत की काय असे वाटू लागले आहे. विभागीय पातळीवरची वृत्तपत्रे तर आता विभागाच्या व राज्याच्या बातम्या २५ टक्के व उर्वरीत ७५ टक्के त्या जिल्ह्याच्या बातम्या इथपर्यंत पोहोचली आहेत. लोकमत, सकाळ ही त्याची उत्तम उदाहरणे आहेत. त्यामुळे जिल्हा पातळीवरच्या वृत्तपत्रात काहीच अंतर राहिलेले नाही आणि वाचकांना एक जिल्हा वा विभागीय पातळीवरचे आणि दुसरे राज्य पातळीवरचे अशी दोन दैनिके घेतल्याशिवाय राज्याचे व देशाचे दैनंदिन चित्र स्पष्ट होत नाही ही वस्तुस्थिती आहे. त्यामुळे जिल्हा दैनिकांना या स्पर्धेत टिकण्यासाठी

पाने, छपाईची गुणवत्ता आणि पुरवण्या, रंगीत पुरवण्या या सगळ्या बबातीत विभागीय वृत्तपत्रांशी स्पर्धा करणे व त्यात टिकणे केवळ अशक्य झाले असून ही वृत्तपत्रे बंद पडण्याच्या स्थितीत आली आहेत. जिल्हा दैनिकही एक-दोन रुपयाला मिळते आणि विभागीय दैनिकही त्यांच्या अंतर्गत स्पर्धेमुळे तेवढ्याच किमतीला मिळते, हा विरोधाभासही लोकांना अनुभवायला मिळत आहे. विशेष म्हणजे वृत्तपत्रांच्या ज्या विविध संघटना आहेत त्या वा शासन या संदर्भात कसलीही कारवाई मात्र करायला धजत नाही कारण या लोकशाहीच्या तथाकथित चौथ्या स्तंभाचे उपद्रवमूल्य प्रचंड असल्याने त्यांच्या क्षेत्रात आपण बळी जायला नको म्हणून सर्वच राजकीय पक्ष हात राखूनच हे पाहत आहेत. हे सर्व चिंताजनक असून आता लोकांनीच त्याविरुद्ध आवाज उठवणे गरजेचे झाले आहे.

पूर्वी वृत्तपत्रात शासकीय योजनेच्या संदर्भात, अधिकारी, कर्मचाऱ्यांच्या संदर्भात एखादी बातमी असली तर त्याची कात्रणे शासनाचे माहिती कार्यालय संबंधितांना पाठवत असे व त्याची दखल घेऊन चौकशीही केली जात असे, खुलासा मागवला जात असे, वृत्तपत्रात तो दिला जात असे. आता हे सगळे बंद झाल्यात जमा आहे. कारण वृत्तपत्रांचीच तेवढी विश्वासार्हता राहिलेली नाही. त्यातच पेड न्यूजचा नवा प्रकार उदयाला आला आहे. निवडणुकीच्या काळात तर उमेदवारांच्या असलेल्या व नसलेल्या कर्तृत्वाचे पानपान लेख, त्यांच्या खास प्रतिनिधीनी घेतलेल्या मुलाखती यांचे पेव फुटले होते. महाराष्ट्रातील एका अग्रगण्य साखळी वृत्तपत्राने तर 'मला आमदार व्हायचंय' या मुलाखतीसाठी ५ हजार रुपये देणाऱ्या कोणाच्याही मुलाखती घेण्याचे आपल्या कर्मचाऱ्यांना इ-मेलवर आदेशच दिले होते.

यातूनच वृत्तपत्रात एक अनिष्ट प्रथाही सुरु झाली आहे. वृत्तपत्रांच्या अनेक संघटना आहे, संपादकांच्याही आहेत. ज्याची सर्व प्रमुख वृत्तपत्रे सदस्य असतात, त्यात साखळी वृत्तपत्रेही असतात. पण असे असतानाही वृत्तपत्रातील ही अनिष्ठ प्रथा काही या संघटना थांबवू शकलेल्या नाहीत. सुरुवातीला १ रुपया किंमत असलेले वृत्तपत्र दरवेळी टप्प्याटप्प्याने किंमत वाढवत आता ३ रुपये झाले आहे. हे दर वाढवताना वाढती महागाई, वृत्तपत्रीय कागदांचे वाढते दर, छपाईखर्च, कर्मचाऱ्यांचे पगार इत्यादी कारणे दिली गेली होती. मग अचानक एका साखळी वृत्तपत्राने मराठवाड्यात गेल्या ३/४ महिन्यांपासून अंकाची किंमत १ रुपया कशी केली असेल? या काळात महागाई कमी झाली का, सगळे दर कमी झाले? दुसऱ्या एका बलाढ्य, तितक्याच तुल्यबळ साखळी वृत्तपत्राच्या कार्यक्षेत्रात हे घडल्याने त्यांनीही मग त्या वृत्तपत्राच्या बालेकिल्यात म्हणजे थेट पुण्यात आपला अंक एक रुपयाला विकायला सुरुवात केली. यापूर्वी मुंबई-पुण्यात जे युद्ध इंग्रजी दैनिकांत चालले ते आता मराठी वृत्तपत्रांत आले. हे सगळे कोणत्या संकेतात बसते? आम्ही स्वत:ला पत्रकार म्हणवून घेणारे, कोणत्या अधिकाराने लोकांना आता व्यावसायिक नीतीमत्तेचे धडे देणार आहोत? मला वाटते या सगळ्याचा समाजाने गंभीरपणे विचार करण्याची वेळ आता आलेली आहे.

वृत्तपत्रांना पूर्वी संपादक असल्याने ते वर्षानुवर्षे सेवानिवृत्तीपर्यंत कायम असत. त्यांच्या स्थिरतेच्या खात्रीने त्यांना अनिश्चिततेची भीती नसे, त्यामुळे ते निर्भयपणे काम करत असत, पण आता तसे राहिले नाही. एक बड्या राजकीय नेत्याच्या कुटुंबाच्या मालकीच्या एका मोठ्या साखळी वृत्तपत्राने मध्यंतरी संपादकासह अनेक ज्येष्ठ उपसंपादकांना, पत्रकारांना काढून टाकले; तेही कसलेही कारण नसताना. ही काही वृत्तपत्रक्षेत्रासाठी चांगली घटना नाही. एवढी अस्थिरता जर एखाद्या मोठ्या वृत्तपत्राच्या संपादकाची असेल तर हजेरीपटावर असणाऱ्या उपसंपादक, इतर बातमीदार, जिल्हापातळीवरील बातमीदारांचे भवितव्य काय? जिल्ह्यात काम करणाऱ्या छोट्यामोठ्या वृत्तपत्रांच्या प्रतिनिधी, बातमीदारांचे काय? आणि कोणत्या तोंडाने समाज, लोकप्रतिनिधी आम्हा पत्रकारांना निर्भयपणे, निर्भीडपणे पत्रकारिता करण्याचा सल्ला देतात? ज्या वृत्तपत्रसमूहाने हे ज्येष्ठ पत्रकार एका झटक्यात काढून टाकले किंवा त्यांना राजीनामा देण्यास भाग पाडले त्या पत्रकारांच्या बाजूने एक तरी पुढारी, राजकीय पक्ष, सामाजिक कार्यकर्ता ठामपणे उभा राहिलेला दिसला नाही ही दुर्दैवाची बाब म्हणायला हवी.

हे घडण्याचे समजलेले प्रमुख कारण म्हणजे पूर्वी वृत्तपत्रात काम करणाऱ्या पत्रकारांना (निदान हजेरीपटावर असणाऱ्या) 'वर्किंग जर्नलिस्ट ॲक्ट' लागू होता. वृत्तपत्रांच्या मालकांनी त्यातून पळवाट काढून आता संपादकासह सर्वांना कॉन्ट्रॅक्ट पद्धतीत आणले आहे. घर जसे ११ महिन्यांच्या कराराने घेतले जाते तसे आता संपादक, पत्रकारही ११ महिन्यांच्या कराराने नेमले जातात. त्यामुळे ते या सर्व प्रकाराविरुद्ध आवाज उठवू शकत नाहीत. यासाठी शासनानेच आता कायदा करून पत्रकारांना वर्किंग जर्नालिस्ट ॲक्टनुसार नेमणूक करण्यास वृत्तपत्रांना भाग पाडले पाहिजे व या कॉन्ट्रॅक्ट पद्धतीवर बंदी घातली पाहिजे. तरच पत्रकारांना कायद्याचे संरक्षण मिळू शकेल.

वृत्तपत्रक्षेत्रात हे सर्व जे चालले आहे ते खरोखर खूपच चिंताजनक आहे. त्यासाठी ज्यांना ज्यांना लोकशाहीचा चौथा स्तंभ टिकावा असे वाटते त्यांनी तरी या अनिष्ट प्रथा रोखण्याचा प्रामाणिक प्रयत्न करायला हवा. एकीकडे राजकीय पक्षातही सुंदोपसुंदी, काही संघटना, पक्षांची अघोषित सेन्सॉरशिप, इलेक्ट्रॉनिक मीडियाचा बेजबाबदारपणा या सगळ्या गदारोळात वृत्तपत्राचाही जर बळी गेला तर लोकांना प्रतिक्रिया व्यक्त करायलाही जागा राहणार नाही हा प्रमुख धोका संभवतो. निदान त्यासाठी तरी वृत्तपत्र स्वातंत्र्य, पत्रकारांचे स्वातंत्र्य, त्यांच्या नोकरीची शाश्वती यासाठी समाजानेच पुढाकार घेणे अत्यंत गरजेचे वाटते.

**भारत गजेंद्रगडकर**
'पद्मजा', व्यंकटेश कॉम्प्लेक्सच्या मागे,
विद्यानगर, बार्शी नाक्यासमोर,
उस्मानाबाद-४१३५०१
भ्रमणध्वनी : ९४०४६७६४६१
bharat.1946@yahoo.in

संवेदनशील व शिस्तबद्ध रेषांचा

# व्यंगचित्रकार अजित निनान

**प्रभाकर वाईरकर,** व्यंगचित्रकार



सोनाराच्या निखाऱ्याचे चटके बसल्याशिवाय सोनं जसं उजळून निघत नाही त्याचप्रमाणे सृजनशील माणसाची सृजनशीलता त्याच्यावर अन्याय वा अडचणीची परिस्थिती निर्माण झाल्याशिवाय उफाळून येत नाही. ब्रिटिशांनी शिक्षा म्हणून लोकमान्य टिळकांना ब्रह्मदेशातील मंडालेच्या तुरुंगात टाकले आणि माणसाचे आयुष्य सफल होण्यासाठी निर्भयता, नीतीमूल्यं, बंडखोरी, विद्या, परोपकार वगैरेंचा आरसा 'गीतारहस्य' लिहून जगासमोर ठेवला. त्याच वेदनेतून 'ओरायन' लिहून ग्रह-ताऱ्यांचे रहस्य जगासमोर टिळकांनी उघडून दाखवले.

स्वातंत्र्यवीर सावरकरांनी अंदमानच्या सेल्युलर जेलच्या भिंतीवर खरडलेली स्वातंत्र्याची चूड पेटवणारी गीतं आणि कविता, गजल आजही अभिमानानं छाती दडपून टाकत आहेत. नाशिकच्या कारागृहातून सानेगुरुजींनी प्रसवलेली 'श्यामची आई', बंडखोरी, वर्णभेद उच्चाटन, संवेदनशीलता, सुसंस्कृत, संस्कारमय पिढी निर्माण करण्याचं कार्य आजही करत आहे.

पंडित नेहरूंनी अहमदनगरच्या कारागृहात 'आतल्या' तळमळीतून 'डिस्कव्हरी ऑफ इंडिया' लिहून अंतरंगातील भारत जगासमोर साकारला आणि असाच काहीसा प्रकार एका व्यंगचित्रकाराच्या बाबतीत झाला.

शाळेमध्ये शिकत असताना आपल्याच शिक्षकावर व्यंगचित्रं काढल्यानं त्याला शिक्षा म्हणून नेहमीच वर्गाच्या बाहेर काढले जायचे. त्या मुलाचे सृजनशील मन त्याला शाळेच्या लायब्ररीतील 'पंच' व 'न्यू यॉर्कर' मॅगझिन्समधील व्यंगचित्रांमध्ये गुंतवून ठेवू लागले. एक प्रकारे आपल्यावर झालेल्या अन्यायाचे परिमार्जन म्हणून तो ती व्यंगचित्रं अभ्यासू लागला. त्यातूनच एक जगप्रसिद्ध व्यंगचित्रकार जन्माला आला. त्याचं नाव व्यंगचित्रकार अजित निनान.

अजित निनान मॅथ्यू यांचे वडील ए.एम. मॅथ्यू आणि आई ॲनी मथ्यू. मूळचे केरळचे. १०० टक्के मल्लू (अजित यांच्या शब्दात). त्यामुळे केरळी संस्कार. अजित यांचा जन्म १५ मे १९५५. हैदराबाद येथे, मल्लू असल्यानं इतर मल्लूप्रमाणे (केरळी) इंजिनीयर, डॉक्टर अशा प्रकारचे उच्च शिक्षण अजितनं घ्यावं अशी आईवडिलांची ठाम इच्छा. परंतु अजितचा कल अभ्यासापेक्षा चित्रकलेकडेच जास्त. हैदराबाद पब्लिक स्कूलमध्ये प्राथमिक शिक्षण.

अजित नेहमीच एका वहीमध्ये मोटारी, पंप, मशिन्स यांची तांत्रिकतेचं भान असलेली चित्रं काढायचा. अगदी बारीकसारीक बारकावे असलेली. परंतु वडिलांना त्याच्या या छंदाचा तिटकारा होता. आई मात्र अजितच्या या छंदाला गुपचूपपणे प्रोत्साहन देत राहिली.

विद्यालयातील शिक्षण त्यांनी चेन्नईच्या मद्रास ख्रिश्चन कॉलेज, थम्बाराम येथून १९७७ साली पूर्ण केले आणि ते बी.ए., एम.ए. झाले. पोलिटिकल सायन्सची डिग्रीही संपादन केली.

व्यंगचित्रकार का व्हावेसं वाटलं असं विचारताच ते म्हणाले, मी गणितामध्ये 'ढ' होतो. त्यामुळे चित्रकलेकडेच लक्ष देऊ लागलो. प्रोफेसर होऊन कॉलेजमध्ये शिकवावं अशी जबरदस्त इच्छा होती. कारण दुपारपर्यंत विद्यार्थ्यांना शिकवावं व नंतर मस्त झोपता येईल अशा भावना पण ते जमलं नाही.

पहिलं चित्र प्रसिद्ध झालं त्याबद्दल ते सांगतात, १९६८-६९च्या दरम्यान मुलांसाठी असलेल्या 'शंकर्स विकली' नियतकालिकाच्या शेवटच्या अंकामध्ये त्यांचं पहिलं चित्र प्रसिद्ध झालं. माझ्याच व्यंगचित्रामुळे ते नियतकालिक बंद पडलं असं ते गंमतीनं म्हणतात. तरीही त्या नियतकालिकानं त्यांना दहा रुपयांची मनिऑर्डर पाठवली. त्याचा त्यांना एवढा आनंद झाला की त्यातील आठ रुपयांचे शाळेत घालण्यासाठी बूट खरेदी केले.

शाळेनं दिलेल्या 'शिक्षेनं' त्यांची गाठ 'पंच' आणि 'न्यू यॉर्कर' या प्रसिद्ध मॅगझिनमधील व्यंगचित्रकार जेम्स थर्बर व अरनॉल्ड रॉथ यांच्या व्यंगचित्रांशी पडली व ते त्यांचे स्फूर्तिस्थान बनले.

भारतीय व्यंगचित्रकारांमध्ये व्यंगचित्रकार मारियो मिरांडा व

अबू अब्राहम हे त्यांचं स्फूर्तिस्थान-गुरू. अबू अब्राहम हे त्यांचे काका. त्यांनी त्यांना बहुमूल्य सल्ला दिला, ''व्यंगचित्रकाराकडे उच्च प्रतीची बुद्धिमत्ता पाहिजे. समोर घडत असलेल्या परिस्थितीचं योग्य आकलन व त्यानंतर त्या संबंधीची सुयोग्य कल्पना (visulatization) हवी. केवळ पुष्कळ माणसं काढता येतात म्हणून जास्त माणसं काढायची नाहीत.''

मद्रास येथील F.D. Stewarts या जाहिरात संस्थेमधून अजित यांनी आपला नोकरीचा प्रवास सुरु केला व त्यानंतर त्यांची बदली दिल्ली येथे झाली.

इंडिया टूडे समूहाच्या 'टार्गेट' या मुलांसाठी असलेल्या मासिकासाठी त्यांची व्यंगचित्रं प्रसिद्ध होऊ लागली. हळूहळू त्यांच्या व्यंगचित्रं व चित्रांना वाचकांची मान्यता मिळू लागली व त्याचा परिणाम म्हणजे त्याच समूहानं त्यांना इलेस्ट्रेटर व व्यंगचित्रकार म्हणून कायमची नोकरी दिली. आता त्यांची व्यंगचित्रं इंडिया टूडे, बिझिनेस टूडे व टार्गेटमध्ये प्रसिद्ध व्हायला लागली. त्याची परिणती म्हणजे, 'आउटलूक' या मासिकामध्ये त्यांची व्यंगचित्रं पानंच्या पानं व्यापू लागण्यापूर्वी इंडियन एक्स्प्रेस वर्तमानपत्रामध्ये १९९२ साली वाचकांचा 'ब्रेन वॉश' करु लागली.

अजित यांची व्यंगचित्र रेखाटण्याची पद्धत, भूमिती रेखाटण्याच्या अंगानं जाणारी वाटते. वर्तुळ, चौकोन, त्रिकोण, उभ्या-आडव्या-तिरक्या रेषा अगदी काटेकोरपणे काढलेल्या, अतिशय सुबक आणि मोजून-मापून चितारल्यासारख्या. कुठेही आकार बिघडल्याचा भासही होत नाही. गायक जसा मोजून-मापून स्वरांची रचना करतो तरीही मनसोक्त स्वरांची उधळण करतो, तशी.

रंगीत चित्र चितारताना फक्त तीन-चार 'फ्लॅट टोन्स'चा वापर. हाफटोन अगदी कमी प्रमाणात. फक्त बॅकग्राउंड भरण्यासाठीच. ड्रॉईंगच्या भाषेत ते 'परफेक्शनिस्ट' वाटतात.

याचं कारण असावं, की त्यांनी बाल्यावस्थेपासून रेखाटलेली तांत्रिकतेचा भरपूर वापर केलेली नाविन्यपूर्ण मशिन्स, मोटारी, पंप, इंजिन वगैरेंची रेखाटनं. त्याच रेखाटण्याचा परिणाम म्हणजे त्यांच्या रेषा उगाचच कुठेही भरकटत नाहीत वा अवास्तवही वाटत नाहीत. प्रत्येक फटकारा वा रेषा आवश्यकच वाटते. रेषा बोलतात, आपल्याशी संवाद साधतात आणि गुदगुल्याही करतात. परस्पेक्टिव्हचा पुरेपूर योग्य वापर, चित्रामध्ये (डेप्थ) खोली, सृजनशीलतेचा कल्पक वापर व कोणतंही चित्र घाईगर्दीनं काढलेलं वाटत नाही. सर्व चित्रं एकाच मुशीतून बाहेर पडलेली. ॲनॉटोमीचा पक्का वापर असलेली.

नवनवीन मशिन्सची रेखाटनं केल्यामुळेच त्यांची प्रसिद्ध व्यंगचित्रमालिका 'डिटेक्टिव्ह मूछवाला ॲन्ड पूँछ' यामध्ये मूछवाला नावीन्यपूर्ण वेगवेगळी उपकरणं वापरतो. त्याचं कारणही तांत्रिकतेनं नटलेली नावीन्यपूर्ण रेखाटनं असं अजितना वाटतं.




१. डिटेक्टिव्ह मूछवाला याच्या मिश्या त्रिकोणाच्या आकारात रेखाटलेल्या. डोक्यावर कमीत कमी केस, जाडसा, हातामध्ये हायटेक मोबाईल, अतिशय बोलकं व्यक्तिचित्र. तर त्याचा साथीदार कुत्रा, लांब कानाचा, क्यूट, तुटलेली शेपटी (poochh), पांढरा. कोणताही आडपडदा न ठेवता अजित 'मूछवाला' ही व्यक्तिरेखा प्रसिद्ध ब्रिटिश व्यंगचित्रकार 'डेव्हिड लो' यांच्या 'कर्नल ब्लिम्प' या व्यक्तिरेखेवरुन सुचली याची कबुली देतात. तसंच उद्योगधंद्यातील व्यक्तिरेखा चितारताना डोकं मोठं व शरीर लहान ही जगप्रसिद्ध व्यंगचित्रकार 'ल्युरी' याची पद्धत वापरतो. केवढा हा मोठेपणा. (नाहीतर काहीजण कॉपी करुनही 'ते' क्रिएशन माझं म्हणून ढोल बडवतात.)



२. कॅरिकेचर्स (अर्कचित्रं) करणं यामध्ये अजित यांचा हातखंडा आहे. सोबतचं डॉ. अब्दुल कलाम यांचं कॅरिकेचर पाहा. ते म्हणतात, कॅरिकेचर करताना ते प्रथम नाक चितारून बाकीचे अवयव नंतर चितारतात. अब्दुल कलामांचे निरागस हास्य, त्यांच्या पांढऱ्या जाडजूड भुवया आणि मिस्किल डोळे, कलाम आपल्यासमोरच आहेत याचा भास निर्माण करतात. कलाम आपल्या लेखणीतून समाजामध्ये सुसंगती निर्माण होण्यासाठी सतत कार्यरत असतात. हे दाखवण्यासाठीच पेन म्हणजेच सितार व त्यातून मानवी सुसंगतीची स्वरनिर्मिती.

३. SAME TO YOU या व्यंगचित्रामध्ये अमेरिका आपल्या मित्र राष्ट्र पाकिस्तानला आर्थिक आणि शस्त्रात्रांची मदत करते व तीच मदत पाकिस्तान बेईमानी करुन अमेरिकेच्या विरुद्ध कशी वापरते हे दाखवण्यासाठी अतिशय कल्पक रचना सादर केली आहे. अगदी 'सटल' पद्धतीनं.




४. इजिप्तचे राष्ट्राध्यक्ष इजिप्तमधील हिंसक आंदोलनामुळे राजीनामा देण्याच्या मन:स्थितीत असून ते सोनिया गांधींकडे सल्ल्यासाठी आले आहेत. सोनिया गांधी आपल्या कचकडीच्या बाहुलीचा (मनमोहन सिंग) खेळ दाखवून अतिशय मार्मिक सल्ला देत आहेत, ''हुस्न मुबारकजी सत्ता सोडण्याची गरज नाही, सत्ता सोडल्यासारखं दिसलात म्हणजे झालं.''

सोनिया गांधी यांनी पंतप्रधानपद नाकारुन सत्ता नाकारण्याचा देखावा केला व आपल्याच मुठीत असलेल्या डॉ. मनमोहन सिंग यांना पंतप्रधान नेमून सत्ता आपल्याकडे नाहीच असा दांभिकपणा केला, हे दाखवण्यासाठी अजित यांनी रेखाटली मनमोहन सिंग यांना निर्जीव बाहुली व त्यांना हलतेबोलते करण्यासाठी सोनियांच्या हातात दोरी. अतिशय मार्मिक उदाहरण. या चित्रामध्ये - परस्पेक्टिव्हचा वापर, मनमोहन सिंग यांची हतबलता, सोनियांच्या चेहऱ्यावरील दांभिकतेचा भाव आणि हुस्न मुबारकला एक चांगला सल्ला मिळाल्याचं त्यांच्या चेहऱ्यावर दिसणारे आश्चर्य. सर्वच लाजबाब!

अजित हे नेहमीच बॅकग्राउंडसाठी, मुख्य चित्राला उठाव देण्यासाठी, काळ्या रंगाच्या असंख्य ठिपक्यांचा वापर करतात. हे एक त्यांच्या चित्राचं वैशिष्ट्य. हे सर्व नाटक चाललं आहे, हे दर्शवण्यासाठी बॅकग्राउंडला नाटकाचा पडदा दाखवला आहे. समतोल चित्राची मांडणी हा त्यांच्या चित्राचा आत्मा. कॉम्प्युटरचा एक 'माध्यम' म्हणूनच ते वापर करतात.

अजित यांच्या चित्रांचा आणखी एक पैलू- व्यंगचित्रामध्ये अतिशय परिणामकारक कल्पना व त्यासाठी लागणारी समर्पक शब्दरचना. काही व्यंगचित्रकारांमध्ये ही दोन्ही वैशिष्ट्यं सापडतीलच असं सांगता येणार नाही.

राजकीय व्यंगचित्रकारानं बातमी कानी पडताच त्यावर विचार करायला पाहिजे, दुसऱ्या दिवशीच्या त्या संबंधीच्या हेडलाइनवर विसंबून राहता कामा नये, असा अजित यांचा आग्रह आहे.

त्यांच्या संपूर्ण वाटचालीत लोकांच्या धार्मिक भावना दुखावल्यामुळे दोन पावलं आपल्या व्यंगचित्रामुळे मागे यावं लागले. १) राजीव गांधी पोपच्या वेशात, त्यांच्या सभोवती अनेक काळ्या बकऱ्या (Black sheep) आणि त्यामध्ये व्ही.पी. सिंग हे एक पांढरी बकरी व त्यांनी जो अंगरखा घातला आहे त्यावर 'क्रॉस'ऐवजी



काँग्रेसचा 'हात' दाखवला. २) भारताचा नकाशा गणपतीच्या रुपात दाखवून गुजरात व पूर्वेकडील राज्यं त्याचे कान वगैरे दाखवली. त्यामुळे हिंदूंच्या भावना दुखावल्या.

व्यंगचित्रांच्या विसंगतीपूर्ण वातावरणात अनेक वर्षं त्यांची वाटचाल सुरु आहे – राजकारण्यांचे कान ओढण्यासाठी, सामान्यांच्या अन्यायाला वाचा फोडून त्यांना सजग करण्यासाठी. जागतिक पातळीवर त्यांचे अनेक मानसन्मान करण्यात आले–

जागतिक विश्व परिषदेनं 'जागतिक व्यंगचित्रकार' म्हणून रियो (RIO) येथे त्यांना पुरस्कृत केलं.

जागतिक वसुंधरा समिट, १९९२, व्हिएन्ना, जागतिक मानवी हक्क समिट, १९९३, कैरो, जागतिक लोकसंख्या समिट, १९९४, कोपनहेगन, जागतिक सामाजिक समिट, १९९५, बिजिंग, जागतिक महिला समिट, याही संस्थांनी त्यांना पुरस्कृत केलं. २०११ साली 'जीवनगौरव पुरस्कार' माजी राष्ट्रपती डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या हस्ते देऊन त्यांना गौरवण्यात आलं.

डिटेक्टिव्ह मूछवाला, इंडिया टूडे बुक ऑफ कार्टून्स, अजितस् फनी वर्ल्ड, सीईओ टून्स, लाईक दॅट ओन्ली २ पुस्तकं, टाइम्स ऑफ इंडिया १७५ वर्षे – कार्टुन्स बुक, आयडियाज आणि फन प्लानर अशा पुस्तकांची मेजवानी व्यंगचित्रं–रसिकांसमोर अजित निनान यांनी ठेवली आहे.


व्यवसायात अतिशय व्यस्त राहूनही स्वयंपाक करणं व इतर व्यंगचित्रकारांच्या चित्रांचा आस्वाद घेण्यासाठी फावल्या वेळाचा ते उपयोग करत आहेत. या संपूर्ण घोडदौडीसाठी त्यांची सुविद्य पत्नी एलिझाबेथ (स्कूल प्रिन्सिपॉल), दोन मुली– संयुक्ता (इतिहासाच्या शिक्षिका) व अपराजिता (पेंग्विन आर्ट डायरेक्टर) यांचं त्यांना सहकार्य असून अनीतीमध्ये बरबटलेल्या राजकीय आणि सामाजिक परिस्थितीवर व्यंगचित्रांच्या माध्यमातून आसूड ओढण्यासाठी व योग्य दिशा दाखवण्यासाठी अजित यांच्यामध्ये त्या सतत ऊर्जेचा स्रोत निर्माण करत आहेत.

**प्रभाकर वाईरकर**
कावेरी, बी–४०५, वाकोला ब्रीज,
सांताक्रुझ (पूर्व), मुंबई–४०० ०५५
भ्रमणध्वनी : ९८२०५४३०८९
prabhakarwairkar@rediffmail.com

**प्रसिद्ध झाले...**

# सोल्जर इन मी (Soldier In Me)

## शिल्पा जितेंद्र खेर




ही कादंबरी म्हणजे एक जीवनप्रेरणा आहे. आजच्या तरुण पिढीसाठीच नव्हे तर जी व्यक्ती अभिमानाने मी भारतीय आहे असं म्हणते त्या सर्वांसाठी राष्ट्रप्रेम जागवणारी, जीवनसंघर्षात सफल होण्यासाठी लिहिलेली, सर्वांनी वाचावी व अनुकरण करावी अशी आधुनिक 'भगवत्‌गीता' आहे.

हे पुस्तक वाचून सर्व भारतीयांमध्ये एक नवीन विचार, नवी ऊर्जा, नवीन स्फूर्ती निर्माण होईल अशी आशा वाटते.

HUNDRED GUN SALUTE!
**– मेजर सुभाष गावंड**

**मूळ किंमत २५० रु.**
**सवलतीत १५० रु.**


# जतन जंगलांचे

## शुभदा पटवर्धन

पर्यावरण की विकास या कळीच्या मुद्यावरून विकासाचे विरोधक आणि समर्थक यांच्यात कायमच युद्ध पेटलेले असते आणि दोन्हीही गट आपापल्या परीने आपापले मुद्दे रेटत असतात. निसर्ग आणि माणूस यांच्यातील तेढ वाढत गेली ती याच मुद्यावरून. वाढती लोकसंख्या, नागरीकरण, औद्योगिकीकरण, शेती, भोगवादी संस्कृती याचा फटका बसलेला निसर्गाचा एक महत्त्वाचा भाग म्हणजे जंगल. रस्त्यांचे जाळे विस्तारत जात असताना, औद्योगिक प्रगती होत असताना जंगलतोड ही अपरिहार्य ठरते. ही गोष्ट खरी असली, तरी आज मूलभूत अनेक गरजांसाठी माणसाचे आयुष्य जंगलाशीच बांधले गेले आहे आणि त्यामुळे जंगलांचे जतन करणे हेही तितकेच महत्त्वाचे आहे. एके काळी विकासालाच अमर्याद महत्त्व दिले गेल्यामुळे वनजमिनींवर मानवी अतिक्रमण झाले. मोठ्या प्रमाणावर जंगलांचा ऱ्हास झाला. अपरिमित वृक्षतोड झाली. नियोजनाच्या नावाने तर आनंदीआनंदच होता. यामुळे जंगलेच्या जंगले उद्‌ध्वस्त झाली. विकासाचे भूत मानगुटीवर बसलेल्या माणसाला त्याची फिकीर नव्हती. आपल्याच मस्तीत धुंद असणाऱ्या आणि महासत्तेचे स्वप्न बघणाऱ्या माणसाला या बेबंदशाहीच्या भविष्यकालीन परिणामांचा विचार करण्याइतपतही सवड नव्हती. वनभूमीसंपन्नतेत महाराष्ट्र राज्याचा क्रमांक पाचव्या स्थानावर होता, पण फॉरेस्ट सर्व्हे ऑफ इंडियाच्या अहवालातील आकडेवारी पाहिली तर आपण केवढे प्रचंड वनक्षेत्र नष्ट केले आहे, याची कल्पना येते.

हिमाचल प्रदेश, उत्तराखंड, अरुणाचल प्रदेश, मध्यप्रदेश, केरळ, कर्नाटक, आणि सह्याद्रीचा परिसर यांमध्ये विपुल वनसंपदा आहे आणि वन्यभूमी हे जैवविविधतेचे भांडार, पण अतिक्रमण, वृक्षतोड, शिकार आणि इतर कारणांसाठी मुद्दाम लावल्या जाणाऱ्या आगी, शिकारी, पाळीव प्राण्यांची चराई, बेकायदा खाणी, बांधकामे अशा अनेक समस्यांनी उग्र रूप धारण केल्यामुळे जंगलांचे अस्तित्व धोक्यात आले. वनक्षेत्र कमी होण्याचा परिणाम जैवविविधतेच्या भांडाराला ओहोटी लागण्यात झाला. पशू-पक्षी-कीटक-फुलपाखरे-वनस्पती यांच्या अनेक प्रजातींनी निरोप घेतलेला असून, अनेक त्या मार्गावर आहेत. जंगलतोडीमुळे पक्ष्यांच्या अधिवासावर संक्रांत आली. प्राणी आणि पक्षी परिस्थिती अनुकूल नसेल तर प्रजोत्पादन करत नाहीत. त्यामुळे पशु-पक्ष्यांची संख्या रोडावते आहे.

वन्य प्राण्यांनी जंगलात राहायचे आणि मानवाने नागरी वस्तीत ही एकेकाळची ठळक सीमारेषा कालौघात धूसर होत चालली आहे. शहरांचा अनिर्बंध विस्तार जंगलापर्यंत जाऊन पोहोचला आहे. या विस्ताराला वेळीच रोखले न गेल्यामुळे टेकड्या नेस्तनाबूत झाल्या, नद्यांची पात्रे आटली, डोंगर उघडेबोडके झाले आणि जंगलांवरही गदा आली. मानवाने जंगलावर अतिक्रमण केल्यामुळे उजाड झालेल्या जंगलातून वन्य जीवांची पावले नागरी वस्तीकडे वळली आहेत. वाघ-बिबट्या मानवी वस्तीत दिसणे नेहमीचेच झाले आहे. वाघाने मुलाला मारले, चित्त्याने बाईला ओढून नेले या बातम्या नित्यनियमित वाचायला मिळतात. कोकण आणि दक्षिण महाराष्ट्रात हत्तींचे हल्ले वारंवार होत असतात. सिंह-गेंड्यासारखे प्राणीही त्यांच्या पावलावर पाऊल टाकायला लागले आहेत. त्यामुळे मानव-प्राणी संघर्षाची धारही दिवसेंदिवस वाढतच चालली आहे. यामागची खरी कारणे माहीत असूनही शहरी भागात दहशत पसरवणाऱ्या आणि धुमाकूळ घालणाऱ्या या प्राण्यांनाच दोषी धरले जाते. त्यांच्या गुन्ह्याखातर त्यांना ठार







अशातला भाग नाही, तर तिवरांच्या जंगलांचे परिसंस्थेतील महत्त्वच लक्षात न घेतल्यामुळे त्यांचे चक्क 'डंपिंग ग्राऊंड' करून टाकले आहे आणि शहरातला टनावारी कचरा तिथे नेऊन टाकला जातो आहे. दारुचे अड्डे उभे राहिले आहेत. नव्या मुंबईतील प्रस्तावित विमानतळासाठी लाखो हेक्टर जमिनीवरील खारफुटीची कत्तल होणार आहे. हे सारे

मारले जाते आणि यात आपण काही गैर करतो आहोत असेही माणसाला वाटत नाही.

हीच बेजबाबदार मानसिकता तिवरांच्या जंगलाबाबतही दिसून येते. तिवरांच्या जंगलांच्या मुळावर उठली आहे ती बिल्डर लॉबी. उपलब्ध इंच आणि इंच जागेवर बांधकाम करण्याच्या हव्यासापायी त्यांनी तिवरांच्या जंगलांनाही सोडलेले नाही. खाडीपरिसरातील तिवरांच्या जंगलांची बेसुमार कत्तल करून, तिथे भराव टाकून जमीन तयार करण्यात आली आणि अशा रीतीने तयार केलेल्या जमिनींवर अनेक ठिकाणी अनधिकृत बांधकामे उभी राहिली आहेत. तिवरांची कत्तल केली जाऊ नये, तिवरांच्या जंगलांपासून २०० मीटरपर्यंतच्या परिसरात बांधकामे करू नयेत, या हायकोर्टाच्या फतव्यांचे अस्तित्व केवळ कागदोपत्री राहिले आहे. खरे तर, अशा अनधिकृत बांधकामांना सुरुवात झाली तेव्हाच यातील धोका लक्षात घेऊन त्याला प्रतिबंध करण्याची गरज होती. कारण पूरनियंत्रण आणि खाडीतून समुद्राकडे वाहून जाणाऱ्या सांडपाण्यावर नैसर्गिकरीत्या प्रक्रिया करण्याचे काम तिवरांचे जंगल वर्षानुवर्षे करत होते. तिवरांची जंगले समुद्राचे पाणी भूभागात शिरण्याला प्रतिबंध करतात. तसे न झाल्यास पुराची शक्यता वाढते, त्याचप्रमाणे भूभागातील गोड्या पाण्याचे साठेही खारे होण्याची शक्यता असते. तिवरांमुळे किनारपट्टीची धूपही होत नाही. त्सुनामीसारख्या संकटाला तोंड देण्यासाठी तिवरांचे जंगल राखण्याची गरज आहे. तिवरांच्या जंगलांवर घाला घातल्याचा काय परिणाम होतो, याची एक झलक २००५ साली आलेल्या महापुराने दाखवलीही. तरीही दुर्दैवाने शहाणपणा आलेला नाही तो नाहीच. तिवरांची कत्तल खुलेआम सुरू आहे. न्यायालयाने तिवरांच्या जागेवर झालेली बांधकामे तोडली जावीत असा आदेश काढला होता, त्याचे काय झाले कुणास ठाऊक? जुन्या बांधकामांना धक्काही लागलेला नाही, उलट नवीन नवीन बांधकामे मात्र होताना दिसताहेत. तिवरांच्या जंगलाला फक्त बांधकामांचा विळखा पडला आहे

कमी पडले म्हणून की काय, पण आता मिठागरांच्या जमिनीवरही इमारती उभ्या राहणार आहेत. म्हणजे पर्यायाने तिवरांवरील संकट अधिकच वाढणार आहे.

तिवरांप्रमाणेच गवताळ प्रदेशांची गणनाही पडीक जमिनीतच होते. कारण जंगलाबद्दल एक ठरावीक चित्र रंगवले जाते. म्हणजे उंचच उंच हिरवीगार झाडे, त्यांना छेदणाऱ्या पायवाटा, खळाळणारे झरे वगैरे. या चौकटीत जे बसत नाही ते जंगल नाही, असे मानले जाते. वास्तविक जंगलाचे अनेक प्रकार आहेत. गवताळ कुरणे, पाणथळीच्या जागा हेही एक प्रकारचे जंगल असते, विशिष्ट पशू-पक्षी-कीटकांना याची गरज असते, हेच लक्षात घेतले जात नाही. त्यामुळे गेल्या कित्येक वर्षांत अशा 'पडीक' जमिनीचे 'उत्पादक' जमिनीत रूपांतर करण्याच्या दृष्टीने अनेक प्रयत्न हाती घेतले गेले. जैवइंधनासाठी लागणाऱ्या वनस्पतींची लागवड करण्यात आली. वृक्षारोपण केले गेले. शेती केली गेली. त्यामुळे पुन्हा निसर्ग आणि विकास यांच्यात गल्लत झाली. कारण वृक्षारोपणाची, शेतीची, जैवइंधनाची आज गरज असली तरी परिसंस्था, परिसंस्थेतील घटकांमधील परस्परसंबंध यांचा अभ्यास करून विकासकामे केली असती तर त्याचा वाईट परिणाम होण्याऐवजी फायदा झाला असता. तसे न होता, हा विकास या परिसंस्थेतील अनेक जीवांच्या मुळावर उठला. आता यावर कित्येकजण असा मुद्दा उपस्थित करतात की समजा गेले हे पशू-पक्षी तर काय मोठे बिघडणार आहे? पण इथेच तर चूक होते. कारण निसर्गातील प्रत्येक घटकाचा काही ना काही तरी उपयोग असतोच. शिवाय या सगळ्या घटकांचे सहजीवन असते. त्यामुळे काही घटक नामशेष झाले की त्याचा परिणाम निसर्गसाखळीवर होतो.

जंगलांचा ऱ्हास होण्याचे आणखी एक महत्त्वाचे कारण म्हणजे वणवे. उन्हाळ्यात अतिउष्णतेमुळे वणवे लागण्याचे प्रमाण वाढते. पण आता वणवे केवळ वाढलेल्या तापमानामुळेच लागतात असे म्हणण्याची सोय राहिलेली नाही. कारण उन्हाळ्याखेरीज इतर ऋतूंतही

वणवे लागण्याचे प्रमाण वाढले आहे. तेंदूपत्त्याचे संकलन किंवा मोहाची फुले गोळा करणे हे कोट्यवधींची उलाढाल असणारे अणि रोजगार पुरवणारे महत्त्वाचे व्यवसाय. आगीच्या उष्णतेमुळे तेंदूपत्त्याचा आकार मोठा होतो आणि मालाला उठाव येतो अशा समजामुळे तेंदूपत्ता संकलन करण्याच्या काळात हमखास वणवे लावले जातात. त्याचप्रमाणे मोहाची फुले वेचण्याच्या काळातही वणवे पेटवले जातात. कारण अंधारातच ही फुले गोळा करावी लागतात आणि वणव्यामुळे काळ्या पडलेल्या जमिनीवरील ही पांढरीशुभ्र फुले गोळा करणे सोपे जाते. याशिवाय तस्करीसाठी, शिकारींसाठीही वणवे लावले जातात. जमिनीची सुपीकता आगीमुळे वाढते, अशा गैरसमजुतीही यास कारणीभूत आहेत. वणवा पेटल्यानंतर ही आग आटोक्यात आणणे अशक्यप्राय असल्यामुळे कित्येक हेक्टर वनक्षेत्र नष्ट होते आणि मोठ्या प्रमाणावर वनसंपदेची हानी होते. सरपटणारे प्राणी, तृणभक्षी प्राणी, छोटे-मोठे कीटक, फुलपाखरे, वनस्पती, वनौषधी जळून खाक होतात. झाडे आगीच्या भक्ष्यस्थानी पडतात. या झाडांचा आसरा घेऊन अनेक पक्ष्यांनी घरटी बांधलेली असतात. ती घरटी नष्ट होतात. परिसंस्थेचा नाश झाल्याने अन्नाचा तुटवडा निर्माण होतो. प्राण्यांच्या प्रजननक्षमतेवर परिणाम होतो. दुर्मिळ प्राणी-वनस्पती नामशेष होतात. निसर्ग म्हणजेच एकमेकांवर अवलंबून असलेल्या अनेक घटकांचा एकत्रित समुच्चय असल्याने या सगळ्याचा एकत्रित परिणाम निसर्गसाखळीला धोका निर्माण होण्यात होतो.

खाणी ही जंगलपरिसरासाठी एक प्रचंड मोठी डोकेदुखी आहे. या बेकायदा खाणींपायी जंगलांचा ऱ्हास झाला, डोंगर सपाट झाले,  मग जाग आली आणि अभयारण्ये, राष्ट्रीय उद्याने यांच्याभोवतीचा परिसर पर्यावरण संवेदनशील म्हणून घोषित करून या डोकेदुखीचा बंदोबस्त करण्याच्या हालचालींना वेग आला.

गेल्या काही वर्षांत ज्या जंगलपर्यटनाने आपले पाय घट्ट रोवले ते जंगलपर्यटनही जंगलांच्या मुळावर उठले आहे. वास्तविक उत्तम वनवैभव लाभलेल्या आपल्या देशात जंगलपर्यटन, विशेषत: व्याघ्रपर्यटन हा विकासाचा मार्ग झाला आहे. जंगलपर्यटनाने स्थानिक रहिवासी, आदिवासींना रोजगाराच्या चांगल्या संधी उपलब्ध करून दिल्या. जंगलपर्यटनाशी संबंधित अनेक व्यवसाय निर्माण झाले. वनविभागासाठी अर्थिक स्रोत निर्माण झाला. व्याघ्रदर्शनाला येणाऱ्या परदेशी पर्यटकांचा ओघ वाढला आणि भारताचे नावही उंचावले. तोपर्यंत अभ्यासू निसर्गप्रेमींपर्यंत मर्यादित असणारे जंगलपर्यटन किंवा वन्यजीवपर्यटन सर्वसामान्य पर्यटकांपर्यंत पोहोचले. त्यामुळे जंगलपर्यटनाला घेऊन जाणाऱ्या संस्थांच्या संख्येत लक्षणीय वाढ झाली आणि हौशी पर्यटकांची संख्याही प्रचंड वाढली. जंगलपर्यटनाच्या संकल्पनेस बाळसे चढावे अशीच ही सारी प्रगती. पण झाले उलटेच. जंगलपर्यटनात घुसलेल्या बेबंदशाहीने एका चांगल्या संकल्पनेची विधुळवाट लागल्याचे दिसून येते. जंगल बघायचे असते, शांतपणे अनुभवायचे असते, निरीक्षणातून वाचायचे असते, हे जंगलपर्यटनाला येणाऱ्या हौशी पर्यटकांच्या फारसे गावीही नसते. जंगलात जायचे तर फक्त वाघ बघायला आणि वाघ दिसला तरच जंगलात जाणे सार्थकी लागले अशा चुकीच्या आणि विचित्र कल्पना या पर्यटकांच्या मनात असतात. त्यामुळे 'वाघासाठी कायपण' अशाच मानसिकतेत ते असतात आणि त्यांच्या या मानसिकतेमुळे जंगलातले गाईडही फक्त वाघ दाखवण्यावरच भर देतात. यामुळे वाघाच्या शोधात गाड्या वाट्टेल तशा घुसवणे, जोराजोरात फिरवणे, नियम तोडणे, वाघाला घेरणे, हे प्रकार सर्रास होताना दिसतात. पर्यटकांना तर या जंगलपर्यटनाचा खरा अर्थच समजला नसल्यामुळे बेलगाम वागणे, कचरा करणे, घाण करणे, अस्वच्छता, गैरवर्तन, नियमांची पायमल्ली हे सारे प्रकार जंगलातही ते टाळू शकत नाहीत. या साऱ्याचा परिणाम म्हणून शेवटी वन्यजीवपर्यटनावर निर्बंध आले. आज किती पर्यटकांना प्रवेश द्यायचा यावर बंधने आली असली तरी सुरुवातीच्या पर्यटकांचा अमर्याद ओघ वाढल्यामुळे अनेकांनी वाहत्या गंगेत हात धुऊन घेतले. पर्यटकांसाठी या नावाखाली बघताबघता रिसॉर्ट उभी राहिली. या अनियंत्रित बांधकामांमुळे पुन्हा जंगलसंपत्तीचाच वापर केला गेला आणि नुकसान झाले ते जंगलांचेच. कित्येक रिसॉर्ट तर जंगलांमध्ये आहेत. पर्यटन-संस्कृतीपासून दूर असणाऱ्या पर्यटकांची संख्या खूप मोठी असल्याने 'जिथे जाऊ तिथे मजा करू' या पलीकडे ते विचारच करत नाहीत. परिणामी, मोठमोठ्यांदा गाणी लावणे, धांगडधिंगा घालणे, दारू पिणे, यामुळे जंगलातील शांततेला तडा जातो आहे, जंगलाचे पावित्र्य भंग करतो आहोत, वन्य जीवांच्या जीवनशैलीवर याचा विपरीत परिणाम होतो, असे विचार या पर्यटकांच्या खिजगणतीतही नसतात. ज्यांना अशा प्रकारच्या सुखासीन पर्यटनाची आवड आहे, त्यांनी जंगला-बिंगलाच्या भानगडीतही पडू नये, कारण अशी 'मजा' करण्यासाठी अगणित ठिकाणे आहेत. पण जंगलपर्यटन हीही एक फॅशन झाल्यामुळे ते जंगलात जातात आणि मनमानी करतात. पर्यटकांचा ओघ सांभाळण्याबाबत वनखात्याच्या मर्यादा, भ्रष्टाचार आणि पर्यटकांचा बेशिस्तपणा या अनागोंदीत जंगलांचा पाय अजूनच गाळात रुतत चालला आहे, ही गंभीर बाब आहे.

दिवसेंदिवस गंभीर होत चाललेल्या परिस्थितीमुळे जागृतीची गरज भासू लागली आणि २१ मार्च हा दिवस 'जागतिक वन्य दिन' म्हणून साजरा केला जाऊ लागला. जंगलांचा झपाट्याने होणारा ऱ्हास थांबवणे आणि त्यासाठी जनजागृती करणे हा त्यामागचा उद्देश. सुदैवाने, नूतनीकरण करता येऊ शकते अशी जी नैसर्गिक संसाधने आहेत, त्यात जंगलाचा समावेश होतो आणि पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी जंगलांचा ऱ्हास रोखणे गरजेचे आहे.


**शुभदा पटवर्धन**

भ्रमणध्वनी : ९८९०४५२०८०

shubhadey10gmail.com

## दुसरी आवृत्ती




डॉ. बी.जी. शेखर यांनी पोलिसदलात कर्तव्य बजावताना प्रत्यक्ष अनुभवलेल्या व अन्वेषण केलेल्या सत्यकथांचा हा संग्रह! 'प्रत्येक गुन्ह्याचा तपास तडीस नेणे' हे त्यांचे ब्रीद! पोलिसदलातील गंभीर व कठीण प्रसंगांची उकल करताना वापरलेले छोटे-छोटे दुवे, क्लृप्त्या वाचकांची उत्कंठा वाढवितात. प्रत्येक प्रसंग तारखा, घटना व त्यातील व्यक्तींच्या उल्लेखांसह लिहिल्यामुळे पुस्तकाला दर्जेदारपणा प्राप्त झाला आहे. पोलिसदलातील सकलांना, सर्व क्षेत्रातील वाचकांना आणि रसिकांना या काळोखी वाटांचा 'शोध' निश्चित आवडेल याची मला खात्री आहे.''


**– पदमश्री. ना. धो. महानोर (कवीवर्य)**

# शोध

**डॉ. बी.जी. शेखर** **मूळ किंमत १५० रु.** **सवलतीत ९० रु.**

## ताजे प्रकाशन

# ग्रामीण बोलीचा शब्दकोश – डॉ. द.ता. भोसले




**मूळ किंमत २०० रु.**
**सवलतीत १२० रु.**

जसे वापरात नसलेले शस्त्र गंजते, तसा वापरात नसलेला शब्द गंजतो, निरुपयोगी होतो आणि कालांतराने विस्मरणात जातो. भाषेची श्रीमंती आणि रसवत्ता तिच्यातील शब्दांतून प्रकट होत असते. शब्दांना असलेल्या तरल अर्थच्छटा; समर्पकता, पर्यायी शब्दांची विपुलता आणि नवीन शब्दांची निर्मिती यातून ती व्यक्त होत असते. तसेच, ही श्रीमंती परभाषेतील उसन्या घेतलेल्या शब्दांपेक्षाही आपल्या बोलीभाषेत असलेल्या अर्थपूर्ण आणि टवटवीत शब्दांतून अधिक निर्माण होते. मराठीच्या सर्व बोली या कमालीच्या श्रीमंत आहेत. कमालीच्या समृद्ध आहेत. त्यांचा वापर व्हावा, त्यातून मराठी समृद्ध व्हावी आणि नव्या पिढीला ही समृद्धी ज्ञात व्हावी, या भावनेने अतिशय अर्थवत्ता असलेल्या पण वापरात नसलेल्या शब्दांचा हा संग्रह वाचकांना आनंद देईल असे वाटते.

**– डॉ. नागनाथ कोत्तापल्ले**

# काय काय दडलेले असते...

## रविप्रकाश कुलकर्णी


कुठल्याही गोष्टीला काहीतरी निमित्त लागते. सत्याऐंशीवे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन सासवडला होणार हे जाहीर झाले तेव्हाच सासवडला जायचे नक्की केले. एरवी देखील शक्यतो या साहित्य संमेलनाला जायचा पायंडा मी ठेवला आहेच.

पण सासवडचे कारण थोडेसे वेगळे.

साहित्य संमेलन जेथे भरते त्या ठिकाणचे वा आसपासचे त्यानिमित्ताने 'साइट सिइंग'ही होते. अर्थात प्रत्येक ठिकाणी हे घडतेच असे नाही.

सासवडचे असे कुठलेही आकर्षण जाहीर झाले नव्हते. त्यामुळे कुणाच्याच हिशोबात हा दृष्टिकोन नव्हता ह्यात काहीही आश्चर्य नाही.

तरीसुद्धा माझ्या लेखी सासवडचे आकर्षण होते.




एरवी सासवड म्हटले की सोपानकाकांची समाधी. पुण्याहून वारी निघाली की पहिला पालखीतळ सासवडचा असतो. त्याहीपेक्षा सासवड मनात ठसले ते आचार्य अत्रे ह्यांच्यामुळे. अत्र्यांचे हे जन्मगाव. अत्र्यांची सुरुवातीची वर्षे सासवडच्या कऱ्हा नदीच्या संगतीने गेली. पण हे कौतुक, अभिमान अत्र्यांनी अभिमानाने तर मिरवलाच, शिवाय ते वज्रलेप केले ते त्यांनी आपल्या आत्मचरित्राला 'कऱ्हेचे पाणी' हे नाव देऊन!

'कऱ्हेचे पाणी' – 'मराठा'च्या रविवार पुरवणीतून क्रमश: सुरू झाले. सुरुवातीपासूनच ह्या आत्मकथनाने वाचकांची पकड घेतली. पण त्याच्याही आधी लक्ष वेधले जायचे ते त्यावरील चित्राने – विस्तृत नदीभोवतालचा चिरेबंदी घाट. त्यावर असलेले पायऱ्या पायऱ्यांचे देऊळ आणि सभोवतालची वनश्री... आणि ह्या चित्राच्या एका कोपऱ्यात लफ्फेदार सही– प्रल्हाद केशव अत्रे.

तेव्हापासून सासवड म्हटले की हे डोळ्यांपुढे येत गेले आणि वाटायचे – एकदा डोळेभरून हे पाहिले पाहिजे...

तसे पाहायला गेले तर पुण्यापासून तास–सव्वा तासाच्या अंतरावर सासवड म्हणजे फार दूर नाही.

पण जाणे होत नव्हते हेच खरे.

शेवटी निमित्त झाले साहित्य संमेलनाचे आणि मी सासवड मुक्कामी दाखल झालो.

'सासवडदर्शन' हा हेतू कुणाला सांगायचे कारणच नव्हते. ते फारसे कुणाच्या हिशोबातच देखील नसणार असे पण वाटले. फक्त गुलाबराव सपकाळ यांना मात्र हे सांगितले होते कारण काही काळ त्यांचा सासवडशी घनिष्ठ संबंध होता असे त्यांनीच कधीतरी सांगितले होते म्हणून.

त्यांनीसुद्धा, तुम्हाला योग्य माणूस गाठून देतो अशी खात्री दिली. संमेलनाच्या दुसऱ्या दिवशी त्यांनी अविनाश क्षीरसागरांची गाठ घालून दिली. ते मूळचे सासवडचे. शिक्षक म्हणून निवृत्त झाल्यावर साप्रंत मुक्काम हडपसर.

ते म्हणाले, ''आता जायचं का?''

''जाऊ या. त्याला काय होतंय...'' मी सहजपणे म्हटले. भर उन्हाचे आम्ही दोघे निघालो. बऱ्यापैकी चालल्यावर म्हटले, ''अजून किती लांब आहे?''

''आलंच आता बघा. इथे रिक्षा नाही. त्यामुळे चालायला जरा लांब वाटतं.'' त्यांनी जणू खुलासा केला.

वाटेत थांबून ते म्हणाले, ''हा पुरंदरेवाडा. एरवी बंद असतो, पण साहित्य संमेलन आहे म्हणून उघडा ठेवला आहे. पूर्वी इथे शाळा भरायची. माझं प्राथमिक शिक्षण इथल्या ठिकाणीच झालं.''

आतमध्ये सगळे ढासळलेले. कुठलाही वावर न भासणारे भकासपण पुरेपूर प्रत्ययाला येत होते...

फार आत गेलोच नाही.

मात्र वाड्याच्या बाहेर जाणवला तो कडेकोटातला बंदिस्तपणा आणि त्याचा भरभक्कमपणा. कुठेतरी वाचले होते की पुढे इंग्रजांनी ह्या वाड्यावर तोफांनी मारा केला, पण कोटाचा कपचा देखील उडाला नाही...

तेथून बोळातून खालच्या बाजूने उतरलो. छोटी छोटी देवळे पार करत मग एका फाटकातून आत गेलो.

क्षीरसागर म्हणाले, ''पहिले पेशवे बाळाजी विश्वनाथांची ही समाधी.''

त्यावर बाळाजी विश्वनाथांचा छोटा पुतळा. त्याच्यामागे पूर्वीपासून मनात ठसलेला आणि नंतर 'कऱ्हेचे पाणी'च्या मुखपृष्ठावर चितारलेला तो घाट, ती देवळे, तो परिसर माझ्या डोळ्यांसमोर होता!

नीरव शांतता. वाटले तेथेच बसावे.

पण तो मोह टाळला. टळटळीत ऊन होते आणि तेवढेच चालत जायचे होते!

परतताना परत पुरंदरेवाडा लागला. वरच्या सज्ज्यात एक खिडकी कशीतरी सांभाळून लोंबकळताना दिसली. मुळातून हे किती सुंदर असेल ह्याची कल्पना त्यातून येत होती. पण त्याच वेळेला हे कोणत्याही क्षणी कोसळेल असे वाटून झटकन पुढे सरकलो...

पुढे आलो आणि एक चिंचोळा – जेमतेम एक माणूस जाईल न जाईल एवढाच रस्ता-बोळ होता. त्याला लागूनच दुसरा वाडा होता. जाताना हे लक्षात आले नव्हते.

''हा कुंजीरवाडा.'' क्षीरसागर सांगत होते. आता क्षणार्धात वीज चमकावी तसे मला वाटले!

एरवी वाडे एक तर एकमेकाला खेटून तरी असतात किंवा मध्ये पुरेसा बोळ असतो. मग इथे एवढे नावाला अंतर ठेवून हा वाडा कसा?

एका सुडाची ही कहाणी होती-

कसला सूड?

हा काळ कोणता? ह्या आसामीची ओळखदेख, इतिहास, आता काहीही माहीत नाही. इतिहासाच्या पानांत कुठेतरी असेल-असणार.

एक पुरंदरे सरदार आणि एक कुंजीर सरदार ही दोन पात्रे एवढेच माहीत.

कुंजीर सरदार पुरंदऱ्यांचा दुस्वास करत असत. त्यांनी एकदा ठरवले ह्या पुरंदऱ्यांच्याच वाड्याच्या बाजूला आपण वाडा बांधायचा आणि त्यांची जिरवायची देखील.

ते देखील कसे?

कुंजीर सरदारांनी वाडा बांधायचे ठरवले आणि तो पूर्ण झाल्यावर त्यांनी योजलं होतं की आपल्या वाड्याच्या कोटावरुन पुरंदऱ्यांच्या वाड्यावर मुतायचं – सभ्य भाषेत लघुशंका! ते करता यावे म्हणून दोन वाड्यांत एवढेसे अंतर ठेवलेले...!

ह्या कुंजीर सरदाराच्या मनात काय काय खदखदत असणार? पण ह्या वाड्याचा शेवट वेगळाच आहे.

कुंजीर सरदारने 'असा' वाडा बांधायला सुरुवात तरी केली पण तो पूर्ण व्हायच्या आधीच तो निर्वतला!

म्हणजे त्याची इच्छा अपुरीच राहिली...

अशा अतृप्त आत्म्याच्या कहाण्या ऐतिहासिक किल्ले-गड्यांना वेढून असतात. वाड्यांच्या आधीच असलेल्या गुढतेत असल्या गोष्टींनी भर पडत असते.

सुदैवाने असले काही ऐकायला मिळाले नाही. दोन सरदारांत वितुष्ट होते एवढेच कळले..

परतताना आचार्य अत्रे यांचा विषय होता. तेव्हा क्षीरसागरांनी एक वेगळी हकीगत सांगितली. लहानपणी प्रल्हाद केशव कऱ्हेच्या डोहात बुडत होते तेव्हा एकाने त्यांना वाचवले.

ही आठवण आचार्य अत्रे यांनी कायम जपलीच, शिवाय तो इसम हयात असेपर्यंत अत्रे त्याला मराठा मोफत पाठवत असत! मनात आले, समीक्षक, नवयुग अत्र्यांनी का पाठवले नाही? ह्या माणसाचे नाव शोधले पाहिजे असे वाटले.

संमेलनस्थळ ग्रंथनगरीत 'कऱ्हेचे पाणी' हातात घेतले. पाहून आलेले कऱ्हेचे चित्र आणि मुखपृष्ठावरचे चित्र – केवढे सारखे – प्रत्ययकारी होते!

कुणाचे मुखपृष्ठ म्हणून बघितले.

कुणाचं असेल?

विश्वास बसणार नाही, हे मुखपृष्ठ रघुवीर मुळगांवकरांनी केलेले आहे!

एरवी मुळगावकर म्हटलं की गुळगुळीत चेहरे आणि उत्कृष्ट रंगसंगती हे ठरलेले.

पण हे 'कऱ्हेचे पाणी'चे मुखपृष्ठ वेगळेच.

काळाच्या पोटात काय काय दडलेलं असते नाही?


**रविप्रकाश कुलकर्णी**

३, स्वप्नसाकार,

धं.वां. चौधरी हायस्कूलजवळ,

डोंबिवली (पूर्व) – ४२१२०१

भ्रमणध्वनी : ९२२४८७२८७०

ग्रंथाली
द्वारा वुलन मिल म्युनिसिपल स्कूल, यशवंत नाट्यमंदिराशेजारी, जे.के. सावंत मार्ग, माटुंगा (प.), मुंबई-४०००१६
दूरध्वनी : २४३०६६२४/२४२१६०५० ● granthali01@gmail.com, granthali02@gmail.com
वेळ : सकाळी ११ ते ६

# दोन ग्रंथसंच योजना

## सूची

**सोबतच्या यादीतील सुटी पुस्तके हवी असल्यास ४0% सवलतीत मिळतील.
चेक/डी.डी./म.ऑ. 'ग्रंथाली' नावे पाठवावा.**

**२१0 पुसतके संच क्रमांक १ मूळ किंमत २९७३५ सवलतीत संचाची किंमत १३000 रु.**

१. **खेळ साडेतीन टक्क्यांचा**
लक्ष्मण माने ● १६० रु.
२. **राजकीय पक्षनिष्ठा मानसिक-बौद्धिक गुलामी**
दि. म. संत ● ८० रु.
३. **अंधश्रद्धा निर्मूलन-प्रश्नचिन्ह आणि पूर्णविराम**
संदीप जावळे ● १२० रु.
४. **प्रर्वतन**
संदीप जावळे ● १२० रु.
५. **विचारवेध**
डॉ. विजय/जयश्री जोशी ● १८० रु.
६. **विचारवेध : भाग ३**
डॉ. विजय/जयश्री जोशी ● २५० रु.
७. **अर्वाचीन पाश्चात्त्य तत्त्वज्ञान-अनुभववाद**
दि.य. देशपांडे ● २०० रु.
८. **अर्वाचीन पाश्चात्त्य तत्त्वज्ञान प्रज्ञावाद**
दि.य. देशपांडे ● १८० रु.
९. **अर्वाचीन पाश्चात्त्य तत्त्वज्ञान-कांट**
दि.य. देशपांडे ● १२० रु.
१०. **विवेकवाद**
दि.य. देशपांडे ● १०० रु.
११. **रिल्केची दहा पत्रे**
अनिल कुसुरकर ● १०० रु.
१२. **मी हिंदू झालो!**
डॉ. रविन थत्ते ● १०० रु.
१३. **विज्ञानाचे तत्त्वज्ञान**
संपादक : शरद देशपांडे, प्रदीप गोखले, सदानंद मोरे ● ३०० रु.
१४. **नेगल - (भाग १)**
विलास मनोहर ● १२० रु.
१५. **नेगल -(भाग २) हेलकशाचे सांगाती**
विलास मनोहर ● १२० रु.
१६. **एक पूर्ण-अपूर्ण**
नीला सत्यनारायण ● १२५ रु.
१७. **सत्तरीचे बोल...**
डॉ. पी. एस. रामाणी ● १०० रु.
१८. **पथदर्शी**
भारत गजेंद्रगडकर ● १०० रु.
१९. **जे देखिले...**
भारत गजेंद्रगडकर ● १०० रु.
२०. **एक दिवस (जी)वनातला**
नीला सत्यनाराण ● २०० रु.
२१. **ध्यास आणि प्रवास**
सुलभा वर्दे ● २०० रु.
२२. **माझ्या वकिलीची पन्नासी**
एस.आर. चिटणीस ● १६० रु.
२३. **आमचा बान आन् आम्ही - स्वरूप आणि समीक्षा**
संपा. शैलेश त्रिभुवन ● ४०० रु.
२४. **झपाटलेली झाडे**
सरोज जोशी ● २५० रु.
२५. **चिं.त्र्यं. खानोलकर**
(ललित चरित्र)
दीपक घारे ● १८० रु.
२६. **व्हिन्सेंट व्हॅन गॉच्या आठवणी**
अनिल कुसुरकर ● १२५ रु.
२७. **गुन्हेगारांच्या मागावर**
यशवंत व्हटकर ● १५० रु.
२८. **सद्रक्षणाय खलनिग्रहणाय**
यशवंत व्हटकर ● २५० रु.
२९. **नृत्यसौदामिनी दमयंती जोशी**
प्रा. सुहासिनी पटवर्धन ● १०० रु.
३०. **पालावरचं जग**
लक्ष्मण माने ● १४० रु.
३१. **बंद दरवाजा**
लक्ष्मण माने ● १८० रु.
३२. **उद्ध्वस्त**
लक्ष्मण माने ● १०० रु.
३३. **भटक्याचं भारूड**
लक्ष्मण माने ● १५० रु.
३४. **नियतीशी करार**
संदीप जावळे ● ३०० रु.
३५. **घटना नारायणपूरची**
शशी देशपांडे,
अनु. मोहिनी दातार ● १०० रु.
३६. **हॅरिसबाई**
कृ.ना. कुडाळकर ● १२० रु.
३७. **स्वदेश**
भूषण केळकर ● १६० रु.
३८. **टकिला टकाटक**
भूषण केळकर ● ३०० रु.
३९. **संघर्ष नागरी निवाऱ्याचा**
संपा. जयंत धर्माधिकारी,
अमरेंद्र धनेशर ● १२५ रु.
४०. **गुडबाय कॅन्सर**
विद्या मुडगेरीकर ● १०० रु.
४१. **अधुरी एक कहाणी**
अंजली ठाकूर,
दिनकर आजगावकर ● २५० रु.
४२. **विकासाची रूपरेषा - परिसंवादांच्या अनुभवातून**
सु.गो.तपस्वी ● ३०० रु.
४३. **क्षितिजावरील शलाका**
शारदा साठे ● २०० रु.
४४. **मुलगी झाली हो...**
ज्योति म्हापसेकर ● ६० रु.
४५. **ही आपलीच माणसं**
मंगला खाडिलकर,
गजानन सबनीस ● २५० रु.
४६. **कोहम् धाबा**
अनुवाद-संजीव दहिवदकर ● १०० रु.
४७. **पैलूंविना हिरकणी**
सुधा सोनाळकर ● ८० रु.

४८. **जग जनुकांचे**
डॉ. हेमा पुरंदरे ● १०० रु.
४९. **वृद्धत्वाची शान**
पद्‌माकर नागपूरकर ● १२५ रु.
५०. **मनातलं काहीसं**
सुधा सोमण ● १२० रु.
५१. **पानीकम**
संजय पवार ● १०० रु.
५२. **वारस होऊ अभिमन्यूचे**
अनुराधा गोरे ● ३०० रु.
५३. **न्यायालयीन व्यवहार आणि मराठी भाषा**
(यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्या सहकार्याने) ● ४०० रु.
५४. **सोन्याच्या धुराचे ठसके**
डॉ. उज्ज्वला दळवी ● २७५ रु.
५५. **सौदीच्या अंतरंगात**
पद्मा कऱ्हाडे ● २०० रु.
५६. **मौन होई बोलके**
रोहिणी लिमये ● २०० रु.
५७. **गांगल ७० ग्रंथाली ३५**
संपादन सुदेश हिंगलासपूरकर ● ३०० रु.
५८. **संकल्प**
संपादन संजीव खांडेकर ● ३०० रु.
५९. **भिडू**
भगवान इंगळे ● २५० रु.
६०. **पंखाविना भरारी**
प्रसादची आई (शरयू घाडी) ● २०० रु.
६१. **स्वास्थ्यवृत्त**
डॉ. शरदिनी डहाणूकर ● १०० रु.
६२. **कानोसा**
डॉ. राणी बंग ● २५० रु.
६३. **आयुर्वेदातील स्त्रीविज्ञान**
शुभदा वेलणकर ● ४०० रु.
६४. **अंगणातले आभाळ**
यशवंत पाठक ● ३०० रु.
६५. **आभाळ माझं**
विमल कुलकर्णी ● १०० रु.
६६. **गोष्ट झऱ्याची**
सुधा वर्दे ● १५० रु.
६७. **कोल्हाट्याचं पोर**
किशोर शांताबाई काळे ● १०० रु.
६८. **आमचा बाप आन् आम्ही**
(१६१ आवृत्ती)
नरेंद्र जाधव ● १२० रु.
६९. **बलुतं**
दया पवार ● १०० रु.
७०. **उपरा**
लक्ष्मण माने ● १०० रु.
७१. **आयदान**
उर्मिला पवार ● २२० रु.
७२. **हृदयस्थ**
डॉ. अलका मांडके ● २५० रु.
७३. **ताठ कणा**
डॉ. पी.एस. रामाणी ● २५० रु.
७४. **मैत्र जीवाचे**
विदुर महाजन ● २०० रु.
७५. **पाचट**
योगीराज बागूल ● २५० रु.
७६. **जगायचंय प्रत्येक सेकंद**
मंगला केवळे ● ८० रु.
७७. **वन फॉर सॉरो**
अनुराधा कुलकर्णी ● १२५ रु.
७८. **उदई**
प्रकाश चव्हाण ● १६० रु.
७९. **जय हो**
कमल देसाई ● ३०० रु.
८०. **क्लोरोफॉर्म**
डॉ. अरुण लिमये ● २०० रु.
८१. **असुरेंद्र**
ना.बा. रणसिंग ● ४०० रु.
८२. **फोडणी**
रामदास फुटाणे ● १०० रु.
८३. **एका शहराच्या खुंटीवर**
चंद्रशेखर सानेकर ● ७५ रु.
८४. **पाऊस**
अरुण शेवते ● ६० रु.
८५. **शोधवर्तन**
नरेंद्र बोडके ● ८० रु.
८६. **बावनकशी**
हॅमेलिआ ● ६० रु.
८७. **सफिया बेगम**
अरुण शेवते ● १०० रु.
८८. **सत्ता**
चंद्रशेखर भुयार ● ७५ रु.
८९. **एका ऊन्हाची कैफियत**
चंद्रशेखर सानेकर ● ६० रु.
९०. **कॉमन मॅन**
हेरंब कुलकर्णी ● ८० रु.
९१. **स्वत:तील अवकाश**
ज्ञानेशर मुळे ● १२५ रु.
९२. **मितवा**
उषा मेहता ● ५० रु.
९३. **निरंतर**
उषा मेहता ● २०० रु.
९४. **संशयास्पद टिपणे आणि इतर कविता**
संजीव खांडेकर ● ६० रु.
९५. **चॅनेल : डी–स्ट्रॉयरी**
श्रीधर तिळवे ● १२५ रु.
९६. **काही अनुभव काही आठवणी...**
रणजीत शहा ● ५० रु.
९७. **शांती अवेदना...**
पुष्पाग्रज ● ८० रु.
९८. **बदलत गेलेली सही...**
अंजली कुलकर्णी ● १२० रु.
९९. **उरल्यासुरल्या जगण्याचं रिमिक्स**
गोविंद काजरेकर ● ७५ रु.
१००. **या दशकाचा सातबारा कोराच राहील**
शंकरराव दिघे ● ८० रु.
१०१. **आईच्या कविता**
अरुण शेवते ● ७० रु.
१०२. **...माझ्या काळाचा अनुवाद**
चंद्रशेखर सानेकर ● ८० रु.
१०३. **कवितेच्या कविता**
अरुण शेवते ● ७० रु.
१०४. **सनद**
नारायण सुर्वे ● १०० रु.
१०५. **वाटेवरच्या कविता**
अशोक नायगावकर ● ५० रु.
१०६. **सैतानाची खुशी**
राकेश भडंग ● ८० रु.
१०७. **बाईच्या कविता**
किरण येले ● ८० रु.
१०८. **प्रत्ययपर्व**
मनोहर जाधव ● ७० रु.
१०९. **सुगंध उरले, सुगंध उरले**
अरुणा ढेरे ● १६० रु.
११०. **गारुड गझलचे**
सदानंद डबीर ● १२० रु.
१११. **अन्वय**
उषा मेहता ● १०० रु.
११२. **नोबेलनगरीतील नवलस्वप्ने–२००५**
सुधीर थत्ते, नंदिनी थत्ते ● ८० रु.
११३. **नोबेलनगरीतील नवलस्वप्ने–२००८**
सुधीर थत्ते, नंदिनी थत्ते ● ८० रु.
११४. **नोबेलनगरीतील नवलस्वप्ने–२००९**
सुधीर थत्ते, नंदिनी थत्ते ● ८० रु.
११५. **नोबेलनगरीतील नवलस्वप्ने–२०१०**
सुधीर थत्ते, नंदिनी थत्ते ● ८० रु.
११६. **उर्मिला**
डॉ. वसंत वऱ्हाडपांडे ● १०० रु.
११७. **धमधोकार**
प्रकाश पेठे ● १२० रु.
११८. **विदेशी खिचडी**
सुधीर शं. कुलकर्णी ● १०० रु.

११९. **हाक/प्रतिसाद**
निदा फाजली,
अनुवाद-इब्राहीम अफगाण● २०० रु.
१२०. **काचेपाठचा समुद्र**
स्मिता भागवत ● १६० रु.
१२१. **निशाणी - डावा अंगठा**
रमेश इंगळे-उत्रादकर ● ३०० रु.
१२२. **रानभूल**
प्रल्हाद जाधव ● १२५ रु.
१२३. **संभव**
माधव चव्हाण ● १५० रु.
१२४. **विवेकीजनीं ह्या मज जागविलें**
प्र.ब. कुळकर्णी ● २०० रु.
१२५. **सिंहासन**
अरुण साधू ● २५० रु.
१२६. **मोरपिस**
अनुराधा गानू ● १६० रु.
१२७. **प्रकाशवाट**
वंदना करंबेळकर ● १२५ रु.
१२८. **संचिताची कोजागिरी**
यशवंत पाठक ● ३०० रु.
१२९. **लोकोत्तर गाडगेबाबा : जीवन आणि कार्य**
प्रा. द.ता. भोसले ● ३०० रु.
१३०. **विज्ञान विशारदा**
वसुमती धुरू ● १२५ रु.
१३१. **भारतातील स्टेनलेस स्टील संस्कृतीचे जनक**
संकलन-संपादन
शरयू ठाकूर, दिनकर गांगल● २५० रु.
१३२. **महारूद्र** (आंतरराष्ट्रीय फूटबॉलमधला मराठमोळा झंझावात!)
जी.बी. देशमुख ● १२० रु.
१३३. **गांधी**
नलिनी पंडित ● २०० रु.
१३४. **लालबाग**
आदिनाथ हरवंदे ● ४०० रु.
१३५. **विज्ञानशिक्षण - नव्या वाटा**
डॉ. हेमचंद्र प्रधान ● १६० रु.
१३६. **का कराचं शिकून?**
लक्ष्मण माने ● ५० रु.
१३७. **शिक्षण : आनंदक्षण**
रमेश पानसे ● २०० रु.
१३८. **शिक्षणातील लावण्य**
लीला पाटील ● १०० रु.
१३९. **बालकहक्क**
लीला पाटील ● २२५ रु.

१४०. **शाळा आहे शिक्षण नाही**
हेरंब कुलकर्णी ● १०० रु.
१४१. **सुरवंटाचे फुलपाखरू**
डॉ. लक्ष्मण नारायण गोडबोले● १२० रु.
१४२. **कळी उमलताना**
अनुराधा गोरे ● २०० रु.
१४३. **आजीच्या गोष्टी (भाग १)**
कै. सीताबाई दातार ● ६० रु.
१४४. **आजीच्या गोष्टी (भाग २)**
कै. सीताबाई दातार ● ६० रु.
१४५. **टेलिफोन ते मोबाईल**
चिन्मय थत्ते ● ६० रु.
१४६. **गोईण**
राणी बंग ● १६० रु.
१४७. **शीळ**
सरोज जोशी ● १५० रु.
१४८. **वाहतूक ठप्प**
अशोक दातार ● १२० रु.
१४९. **हत्या**
राकेश भडंग ● ३५० रु.
१५०. **संत तुकोबाची रोजनिशी**
रवींद्र पाटील ● ४०० रु.
१५१. **आभरान**
पार्थ पोळके ● २०० रु.
१५२. **असाही एक महाराष्ट्र**
संदेश भांडारे ● ३५० रु.
१५३. **माणूस नावाचे जगणे**
डॉ. रवीन थत्ते ● ८० रु.
१५४. **आरोग्याचा अर्थ**
डॉ. आनंद नाडकर्णी ● २०० रु.
१५५. **धुंद-स्वच्छंद**
वसंत वसंत लिमये ● ६० रु.
१५६. **ध्येयनिष्ठ कर्मयोगी**
अरविंद पोतनीस ● २५० रु.
१५७. **जगप्रसिद्ध पुलांच्या कहाण्या**
सुधीर शं. कुलकर्णी ● १५० रु.
१५८. **मनोहारी**
विठ्ठल देशपांडे ● १२५ रु.
१५९. **आठवणीतले बाबासाहेब**
योगीराज बागूल ● ३०० रु.
१६०. **चंदनाची पाखर**
यशवंत पाठक ● २०० रु.
१६१. **आभाळाचे अनुष्ठान**
यशवंत पाठक ● २०० रु.
१६२. **येणे बोधे आम्हा**
यशवंत पाठक ● २०० रु.
१६३. **खेळ मांडला**
विभावरी दांडेकर ● १५० रु.

## ग्रंथाली-ज्ञानयज्ञ पुस्तके

१६४. **पहिला भारतीय वैमानिक**
रत्नाकर वाशीकर,
आ.रा. मराठे ● ४५ रु.
१६५. **गुणवान मुलांचे संगोपन**
अरुणा भिडे ● ५० रु.
१६६. **सदानंद!**
डॉ. सुरेश नाडकर्णी ● ५० रु.
१६७. **आजची समाजरचना, तिचे स्वरूप व पुनर्बांधणी**
भवरलाल जैन ● ४५ रु.
१६८. **परराष्ट्रधोरण : भारत व जागतिक संबंध**
ना.य. डोळे ● ४५ रु.
१६९. **परराष्ट्रधोरण : आपले शेजारी**
ना.य. डोळे ● ४५ रु.
१७०. **सागर-महासागर**
शैलजा सांगळे ● ४५ रु.
१७१. **लहरी हवामान**
डॉ. कुमार कुलकर्णी ● ४५ रु.
१७२. **वेळंब**
डॉ. कमलाकर देवधर ● ४५ रु.
१७३. **पिंपरी-चिंचवड : जुनं-नवं**
मीरा जोशी ● ४५ रु.
१७४. **संख्यादर्शन**
स. पां. देशपांडे ● ४५ रु.
१७५. **कांगारूंचे मराठी आप्त**
कमलिनी काटदरे
निरंजन उजगरे● ४५ रु.
१७६. **फळांचा राजा**
स्मिता देवधर ● ५० रु.
१७७. **एक आटपाट लोकमान्य नगर**
दिलीप काटदरे ● ५० रु.
१७८. **सहनैसर्गिक जीवनशैली**
डॉ. श्याम जोशी ● ५० रु.
१७९. **क्षुधाशांती ते मॅकडोनाल्ड**
सु.गो. तपस्वी ● ५० रु.
१८०. **प्रगती पुलांची**
सुधीर शं. कुलकर्णी ● ५० रु.
१८१. **प्रार्थनाविचार**
माधवी कवी/घनश्याम कवी● ५० रु.
१८२. **सुशेगाद् गोवा**
नंदिनी महाडेश्वर ● ५० रु.
१८३. **पुस मॉथ ते डॅश-४००**
रत्नाकर महाजन ● ५० रु.
१८४. **एड्स-कथा आणि व्यथा**
डॉ. दीप्ती डोणगावकर ● ५० रु.
१८५. **इस्रायलची मराठी लेकरे**
संध्या जोशी ● ५० रु.

१८६. **आकाशगामी**
रत्नाकर महाजन ● ५० रु.
१८७. **देव जाणिला कुणी?**
प्रेमला काळे ● ५० रु.
१८८. **आधुनिक एकलव्य**
डॉ. सुरेश नाडकर्णी ● ५० रु.
१८९. **स्वीय शेती**
गो. ह. दंडवते ● ५० रु.
१९०. **नेवासे**
संजय बोरुडे ● ५० रु.
१९१. **नाटळ**
मनोहर सावंते ● ५० रु.
१९२. **आधुनिक अर्थशास्त्राचे निर्माते**
यशवंत पंडितराव ● १०० रु.
१९३. **बालकल्याण ते बालहक्क**
माधुरी भिडे ● ५० रु.
१९४. **इराण**
पद्मा कऱ्हाडे/
पुरुषोत्तम कऱ्हाडे ● ५० रु.
१९५. **चांगलं मरण**
डॉ. कमलाकर देवधरे ● ५० रु.
१९६. **वृद्धत्वः देशोदेशी**
पी. के. मुत्तगी/
पद्माकर नागपूरकर ● ५० रु.
१९७. **चित्रसंवाद**
संदीप देवल ● ८० रु.
१९८. **नाशिक**
डॉ. सरल धारणकर ● ५० रु.
१९९. **कऱ्हाड**
विजय माळी ● १०० रु.
२००. **रँग्लरचं ग्लॅमर**
स.पां. देशपांडे ● ४५ रु.
२०१. **मनाचे मनोगत**
साधना कामत ● ५० रु.
२०२. **हरित वसईचा लढा**
मार्कुस डाबरे ● १५० रु.
२०३. **स्मृतीच्या हिंदोळ्यावर**
साधना कामत ● १५० रु.
२०४. **ना खंत कशाची!**
भगवंत पंत ● १०० रु.
२०५. **स्वप्नांची बाग**
डॉ. उषा हरदास ● ८० रु.
२०६. **तांबडं रक्त**
अरुण मोकाशी ● ४०० रु.

**मातृभूमी सेवा ट्रस्ट पुस्तके**

२०७. **ओऽ कॅनडा!**
स्मिता भागवत ● १२० रु.
२०८. **स्थानभ्रष्ट**
डॉ. शांतिलाल धनिक,
शब्दांकन : स्मिता भागवत ● ३०० रु.
२०९. **पहिला स्वातंत्र्यसंग्राम आणि तात्या टोपे**
स्मिता भागवत ● ६० रु.
२१०. **जीवनदान**
राजीव जोशी ● १०० रु.

**१६२ पुस्तके संच क्रमांक २ मूळ किंमत ३२,२६५ रु.**
**सवलतीत संचाची किंमत १६००० रु.**

१. **शांताराम व्यक्ती आणि वाङ्मय**
सुरेखा सबनीस ● २५० रु.
२. **दिवस असे की...**
प्रवीण बर्दापूरकर ● २२५ रु.
३. **नोंदी डायरीनंतरच्या**
प्रवीण बर्दापूरकर ● २०० रु.
४. **टिळक ते गांधी मार्गेखाडिलकर**
मुकुंद वझे ● १२० रु.
५. **मराठी भाषेतीलअसभ्य म्हणी आणि वाक्प्रचार**
अ.द. मराठे ● २५० रु.
६. **अहिराणी लोकपरंपरा**
डॉ. सुधीर देवरे ● १५० रु.
७. **आठवणींची साठवण**
डॉ. सुरेश नाडकर्णी ● १८० रु.
८. **माझ्या मनाचा मुरांबा**
वसुमती धुरू ● २७५ रु.
९. **संवादने**
विद्या हर्डीकर-सप्रे ● १५० रु.
१०. **परक्या भूमीवर घर**
स्मिता भागवत ● १५० रु.
११. **तेजस्विनी**
स्मिता भागवत ● १५० रु.
१२. **मनातल्या वावटळी**
प्रगती कोळगे ● १०० रु.
१३. **आकार**
सदाशिव साठे ● २५० रु.
१४. **तमाशा : विठाबाईच्या आयुष्याचा**
योगीराज बागूल ● २५० रु.
१५. **आचंद्र-सूर्य नांदो**
अनुराधा गोरे ● १६० रु.
१६. **गाऊ त्यांना आरती**
अनुराधा गोरे ● ३०० रु.
१७. **बाळाची चाहूल**
अनुराधा गांगल ● ६० रु.
१८. **भारतीय सृष्टी**
अनुराधा गांगल ● १२० रु.
१९. **संस्कार**
अनुराधा गांगल ● ६० रु.
२०. **रांगोळी**
अनुराधा गांगल ● १८० रु.
२१. **महाराष्ट्राची सुवर्णगाथा**
वसंत देशपांडे ● १८० रु.
२२. **मी विंदा बोलतेय**
जयमाला देसाई ● १२० रु.
२३. **शांबरिका खरोलिक**
श्रीकांत पेटकर ● ६० रु.
२४. **प्रेरक संघर्षाचा अमृतमयी ठेवा**
बाबासाहेब पाटील ● १८० रु.
२५. **आनंदाकार**
प्रकाश पेठे ● १०० रु.
२६. **हवा, पानी और...**
भारत गजेंद्रगडकर ● ७५ रु.
२७. **एका पत्रकाराची दुनिया**
भारत गजेंद्रगडकर ● १५० रु.
२८. **भयशून्य चित्त जेथ...**
अनुवाद व संपादन
डॉ. नरेंद्र जाधव ● ५०० रु.
२९. **आठवणींच्या जगात : जर्मनीतील तीन तपांचा अनुभव**
निरुपमा सोनाळकर ● ३०० रु.
३०. **ईश्वरविरहित जीवन (खंड १)**
शरद बेडेकर ● १८० रु.
३१. **ईश्वरविरहित जीवन (खंड २)**
शरद बेडेकर ● २०० रु.
३२. **नोबेलनगरीतील नवलस्वप्ने-२०११**
सुधीर-नंदिनी थत्ते ● ८० रु.
३३. **अस्फुट आवाजांचा प्रदेश**
डॉ. जयश्री गोडसे ● १८० रु.
३४. **अजब सहवास**
गो.आ. भट ● १०० रु.
३५. **सव्वाशे बोधकथा**
दिलीप पांढरपट्टे ● १२० रु.

३६. **यशवंतराव चव्हाण : माणूस आणि लेखक**
डॉ. प्रकाश दुकळे ● २५० रु.

३७. **वेचक व्हिएतनामी लोककथा**
प्रभा पुरोहित ● ७५ रु.

३८. **कथा जगप्रसिद्ध पुलांच्या**
सुधीर कुलकर्णी ● ३५० रु.

३९. **विचारवंतांचा विवेकविशेष**
शरद बेडेकर ● १०० रु.

४०. **उंबरठ्यावरचे दिवस**
भाऊ गावंडे ● ५०० रु.

४१. **आठवा चिरंजीव**
डॉ. प्रतिभा मुडगेरीकर ● १५० रु.

४२. **वडोदरा**
प्रकाश पेठे ● ८० रु.

४३. **दीपस्तंभ**
दीपक घारे/रंजन र. जोशी ● ३५० रु.

४४. **आधुनिक युगातील विचारसरणी**
डॉ. विजय/जयश्री जोशी ● १०० रु.

४५. **साहित्य : आस्वाद आणि अनुभव**
डॉ. द.ता. भोसले ● २०० रु.

४६. **मनस्वी**
बाबूराव चंदावार ● ५०० रु.

४७. **झुंज आणि झेप**
गो.मा. वाघमारे (गुरुजी) ● १०० रु.

४८. **एका कवीचे जीवनगाणे वामन कर्डक यांची चरित्रकथा**
बबन लोंढे ● १६० रु.

४९. **आठवणीतील पाऊले**
डॉ. मो.शि. तथा बापुसाहेब रेगे ● ३०० रु.

५०. **अखेर न्याय मिळाला**
नीलिमा कानेटकर ● ३५० रु.

५१. **नाझी नरसंहार**
कुमार नवाथे ● १५० रु.

५२. **डायरी**
प्रवीण बर्दापूरकर ● १८० रु.

५३. **लॉक ग्रिफिन**
वसंत वसंत लिमये ● ५०० रु.

५४. **दि मॅन इन ऑलिव्ह ग्रीन्स**
कर्नल सुधीर नाफड ● २२५ रु.

५५. **पश्चिम घाट बचाओ मोहीम**
जगदीश गोडबोले ● २०० रु.

५६. **जीवन आणि स्वास्थ्य**
डॉ. प्रेमानंद रामाणी ● ८० रु.

५७. **जेनेटिक्स कशाशी खातात?**
डॉ. उज्ज्वला दळवी ● २५० रु.

५८. **नाही चिरा नाही पणती**
स्मिता भागवत ● २०० रु.

५९. **वानुळा**
साहेबराव चवरे ● १०० रु.

६०. **आत्मा हा भ्रम, परमात्मा हा महाभ्रम, तर मग अध्यात्म ते काय?**
शरद बेडेकर ● १२० रु.

६१. **नोबेलनगरीतील नवलस्वप्ने २०१२**
सुधीर-नंदिनी थत्ते ● ८० रु.

६२. **पहाटसरी**
यशवंत पाठक ● ३५० रु.

६३. **अंतरीचे धावे**
यशवंत पाठक ● १५० रु.

६४. **वेगळा विदर्भ**
श्रीपाद जोशी ● २०० रु.

६५. **तिचं अवकाश**
नीलिमा कानेटकर ● ३०० रु.

६६. **हुंदके टाळण्यासाठी**
नीलिमा कानेटकर ● २०० रु.

६७. **शोध**
डॉ. बी.जी. शेखर ● १५० रु.

६८. **कालिदास : एका गुराख्याचे महाकाव्य**
मयूर देवल ● १०० रु.

६९. **देश, परदेश आणि मी**
गजानन सबनीस ● २०० रु.

७०. **समाजरंग**
ज्ञान मयूर/अनिता कुलकर्णी ● २५० रु.

७१. **माझा देहूरोड बॉम्बस्फोट खटला, १९४३**
नारायण आठवले ● २२५ रु.

७२. **रंग दे बसंती चोला**
स्मिता भागवत ● २०० रु.

७३. **कथा इन्सुलिनच्या शोधाची**
विजय आजगांवकर ● १५० रु.

७४. **ॲबसर्ड थिएटर**
माणिक कानेड ● १६० रु.

७५. **नगरमंथन**
प्रकाश पेठे ● २०० रु.

७६. **घडत गेलेली गोष्ट**
विजया राजाध्यक्ष ● २२५ रु.

७७. **माझं साहित्यिक खटलं**
ॲड. यशवंत हडप ● २२५ रु.

७८. **दत्तकवेणा**
प्रगती कोळगे ● १५० रु.

७९. **क्षितिज पश्चिमेचे**
विनता कुलकर्णी ● २५० रु.

८०. **यशवंतराव चव्हाण : आठवणी-आख्यायिका**
लक्ष्मण माने ● २५० रु.

८१. **तांडव हरवताना**
रवी परांजपे ● २५० रु.

८२. **लसावि**
डॉ. नरेंद्र जाधव ● ४०० रु.

८३. **सारांश शून्य**
संजय कळमकर ● ३०० रु.

८४. **मनाचे कवडसे**
विश्वास काकडे ● १०० रु.

८५. **१९७१चा रणसंग्राम**
अनुराधा गोरे ● ३५० रु.

८६. **अंतरंग**
विजया राजाध्यक्ष ● १२५ रु.

८७. **ओंजळ काव्यफुलांची**
सुभाषचंद्र मयेकर ● १२५ रु.

८८. **प्रिय आयुष्यास सप्रेम नमस्कार**
संगीता धायगुडे ● ८० रु.

८९. **कवडसे**
महेश केळुस्कर ● ७० रु.

९०. **वर्तुळ पुसून टाकताना...**
शारदा नवले ● ८० रु.

९१. **ओळखीची वाट**
नीला सत्यनारायण ● १५० रु.

९२. **दु:ख माझे कोवळे**
प्रतिभा सराफ ● ६० रु.

९३. **मनोमनी**
जयश्री भिसे ● ७५ रु.

९४. **अरूपाचे रूप**
माणिक गुट्टे ● १२५ रु.

९५. **एक अजब कोलाहल**
चंद्रशेखर सानेकर ● ८० रु.

९६. **काळिजगुंफा**
सदानंद डबीर ● ७५ रु.

९७. **कवितेची वही**
सलोनी धुरी ● ८० रु.

९८. **फुलवेडी**
अरुण शेवते ● ६० रु.

९९. **शब्द तर कुली आहेत**
राजेंद्र काटदरे ● १०० रु.

१००. **तृष्णाकाठ**
वैभव देशमुख ● १०० रु.

१०१. **रवींद्रनाथ टागोर : युगनिर्माता विश्वमानव**
डॉ. नरेंद्र जाधव ● ४०० रु.

१०२. **रवींद्रनाथ टागोर : समग्र साहित्यदर्शन**
डॉ. नरेंद्र जाधव ● ३०० रु.
१०३. **बोल महामानवाचे भाग १**
डॉ. नरेंद्र जाधव ● २५० रु.
१०४. **बोल महामानवाचे भाग २**
डॉ. नरेंद्र जाधव ● ६०० रु.
१०५. **बोल महामानवाचे भाग ३**
डॉ. नरेंद्र जाधव ● ३५० रु.
१०६. **प्रज्ञा महामानवाचे भाग १**
डॉ. नरेंद्र जाधव ● ३५० रु.
१०७. **प्रज्ञा महामानवाचे भाग २**
डॉ. नरेंद्र जाधव ● २०० रु.
१०८. **प्रज्ञा महामानवाचे भाग ३**
डॉ. नरेंद्र जाधव ● २२५ रु.
१०९. **प्रज्ञा महामानवाचे भाग ४**
डॉ. नरेंद्र जाधव ● ७५ रु.
११०. **आंबेडकरी विचारधारा**
बबन लोंढे ● ६०० रु.
सुधाकर गायकवाड
१११. **काळोखगर्भ**
बबन लोंढे ● २५० रु.
सुधाकर गायकवाड
११२. **निर्णायक युद्धानंतर**
बबन लोंढे ● १२५ रु.
सुधाकर गायकवाड
११३. **संकल्पना कोश भाग १**
सुरेश वाघे ● ६०० रु.
११४. **संकल्पना कोश भाग २**
सुरेश वाघे ● ७५० रु.
११५. **संकल्पना कोश भाग ३**
सुरेश वाघे ● ५५० रु.
११६. **संकल्पना कोश भाग ४**
सुरेश वाघे ● ५५० रु.
११७. **संकल्पना कोश भाग ५**
सुरेश वाघे ● ७५० रु.
११८. **जीवनदान**
राजीव जोशी ● १०० रु.
११९. **मी मवाली तुझ्या हवाली**
सुभाषचंद्र मयेकर ● १२० रु.
१२०. **निरन्वय**
नीरजा ● १०० रु.
१२१. **स्त्रीगणेशा**
नीरजा ● १०० रु.
१२२. **बुद्ध परंपरा आणि बोधीवृक्ष**
हेमा साने ● १५० रु.
१२३. **जॅक ऑफ ऑल**
अनुराधा गोरे ● १३० रु.
१२४. **परिक्षेची भीती कशाला?**
अनुराधा गोरे ● २५० रु.
१२५. **ताबंट**
प्रल्हाद जाधव ● १५० रु.
१२६. **जिद्द**
सरोज जोशी ● ८० रु.
१२७. **फिदा स्वत:वर**
सरोज जोशी ● ८० रु.
१२८. **भारतीय बौद्धिक संपदेचा उद्‌गाता डॉ. रघुनाथ माशेलकर**
अ.पां. देशपांडे ● २२५ रु.
१२९. **जैतापूरचे अणुमंथन**
राजा पटवर्धन ● ३०० रु.
१३०. **हमान**
संगीता धायगुडे ● ३५० रु.
१३१. **शापित भूमी**
उमेश कदम ● २५० रु.
१३२. **मला समजलेले पाच हिंदू धर्म**
शरद बेडेकर ● १६० रु.
१३३. **सव्वाशे बोधकथा भाग २**
दिलीप पांढरपट्टे ● १५० रु.
१३४. **नोबेलनगरी नवलस्वप्ने २०१३**
सुधीर/नंदिनी थत्ते ● ८० रु.
१३५. **गुलजारांच्या कविता**
रवींद्र रुक्मिणी पंढरीनाथ
अनुराधा मोहनी ● १२५ रु.
१३६. **स्पर्श हरवलेले**
डॉ. सुलभा कोरे ● १०० रु.
१३७. **पंजाबराव देशमुख जीवनकालपट**
डॉ. रमेश पानसे ● १२० रु.
१३८. **झोके अमेरिकेतले**
डॉ. अनंत लाभसेटवार ● २५० रु.
१३९. **आवाज कुणाचा**
दीपक वेलणकर ● ५० रु.
१४०. **विकासाचे निष्कर्ष**
सु.गो. तपस्वी ● ३०० रु.
१४१. **संस्कारहीन**
निर्मला डांगे ● १०० रु.

**दोन्ही संच एकत्रित घेतल्यास २७००० रुपयांत मिळेल**

१४२. **ॲबगेल ॲडम्स**
माणिक कानेड ● ८० रु.
१४३. **स्वरोत्सव**
डॉ. लीना आगाशे ● १५० रु.
१४४. **महाराष्ट्राचा लेखाजोखा**
संकलन : दिलीप चावरे ● १६० रु.
१४५. **एक अवकाश माझंही**
छाया कोरेगावकर ● ६० रु.
१४६. **संवाद**
डॉ. नीना सावंत ● १०० रु.
१४७. **साकुरा**
पूजा मलुष्टे ● २०० रु.
१४८ **बोलावें ते आम्ही**
श्रीकांत देशमुख ● १८० रु.
१४९. **मे आय कम इन**
कु. तन्वी दिनेश डोके ● १२५ रु.
१५०. **शून्याचं मोल अमोल**
स्मिता भागवत ● १५० रु.
१५१. **बी.एन.**
भारत गजेंद्रगडकर ● १०० रु.
१५२. **ग्रामीण बोलीचा शब्दकोश**
डॉ. द.ता. भोसले ● २०० रु.
१५३. **हाँगकाँग सफारी**
पद्मा कऱ्हाडे ● १२० रु.
१५४. **वैश्विक उपचार**
विपिन मेहता
अनुवाद–विजया बापट
संपादन : अपर्णा वेलणकर ● १८० रु.
१५५. **चॅनेल 4 लाईव्ह**
समीरण वाळवेकर ● ४०० रु.
१५६. **स्पर्श दिव्यत्वाचा**
सुलभा वर्दे
उषा धर्माधिकारी ● १०० रु.
१५७. **आस्तिकता नास्तिकता दोन्ही अंधश्रद्धा**
दि.म. संत ● १२५ रु.
१५८. **आनंदभैरवी**
सदानंद डबीर ● ८० रु.
१५९. **साकिया**
सदानंद डबीर ● ८० रु.
१६०. **दुरावा**
गणेश बरगे ● १०० रु.
१६१. **पडघम**
अरुण साधू ● १२५ रु.
१६२. **सोल्जर इन मी**
शिल्पा जितेंद्र खेर ● २५० रु.




**ॲड. सतीश शेळके, सुदेश हिंगलासपूरकर, लेखक भारत गजेंद्रगडकर, ॲड. सुखदेव शेळके, कुसुमताई देशमुख, न्यायमूर्ती बी.एन. देशमुख, अण्णा हजारे आणि सुधीर गव्हाणे**


## नुकतेच प्रसिद्ध झाले...

# संवाद – डॉ. नीना सावंत





आपल्या भावना, आपली श्रवणशक्ती, अनुभव घेण्याची क्षमता आणि व्यक्त होण्याची कला यामुळे अन्य प्राणिमात्रांपेक्षा आपण वेगळे ठरतो आणि म्हणूनच आयुष्यातील सर्वाधिक गोष्टी एकमेकांशी सुसंवाद साधून करतो. मात्र आजच्या धकाधकीच्या आयुष्यात हे संवादाचे नाते विस्कटत चालले आहे. संवाद साधण्याची प्रत्येकाची स्वतंत्र शैली असते. आपण कोणाशी कसे बोलावे व कसे बोलू नये याचे भान ठेवले पाहिजे. तरच संवादाचे सुसंवादात रूपांतर होऊ शकेल. या पुस्तकाच्या निमित्ताने, संवाद हे अभिव्यक्त होण्याचे उत्तम माध्यम असून त्याचा वापर करताना तो अधिक प्रभावी कसा होऊ शकेल हे सांगण्याचा मी प्रयत्न केला आहे. एकीकडे चॅटिंग, दुसरीकडे एकमेकांमधील संवाद हरवत चालला आहे. अजून खूप खूप बोलायचे आहे, बरेच काही सांगायचे आहे आणि हे संपणार नाही...

**– डॉ. नीना सावंत**

**मूळ किंमत १०० रु.   सवलतीत ६० रु.**

RNI No. MAHMAR/2013/50137 Postal Registration No. MH/MR/WEST/310/2013-2015
Published on 10th of Every Month. Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office, Mumbai-400001 on 10th of Every Month.



'प्रज्ञासूर्य डॉ. आंबेडकर : समग्र वैचारिक चरित्र' ग्रंथप्रकाशनसमयी सुदेश हिंगलासपूरकर, लेखक डॉ. नरेंद्र जाधव, शरद काळे आणि कुमार केतकर




'चॅनेल 4 Live' कादंबरीचे प्रकाशन – लेखक समीरण वाळवेकर, राज ठाकरे, डॉ. जब्बार पटेल, अरुण साधू आणि राजीव खांडेकर

मुद्रक, प्रकाशक, संपादक : सुदेश राजाराम हिंगलासपूरकर यांनी ग्रंथाली विश्वस्त संस्थेच्या वतीने, 'शब्द रुची' हे मासिक इंडिया प्रिंटिंग वर्क्स, इंडिया प्रिंटिंग हाऊस, ४२, जी.डी. आंबेकर मार्ग, वडाळा, मुंबई ४०००३१ येथे छापून ग्रंथाली विश्वस्त संस्थाच्या वतीने, वुलन मिल म्युनिसिपल स्कूल, खोली नं. ९, तळमजला, जे. के. सावंत मार्ग, यशवंत नाट्यमंदिराशेजारी, माटुंगा (प), मुंबई ४०००१६ येथे प्रकाशित केले.